रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३५३ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ३० मे २०२४

किंमत ४ ₹


## आव्हाडांकडून मनुस्मृतीचे दहन

**महाड :** नव्या शैक्षणिक आराखड्यातील मनुस्मृतीच्या उल्लेखाला विरोध करत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी महाडमध्ये मनुस्मृती दहन आंदोलन केले. मनुस्मृतीमध्ये शूद्र व स्त्रीबाबत चुकीच्या पद्धतीने लिखाण केले. त्या संदर्भाला पुन्हा नव्याने जागृत करण्याचे काम राज्य सरकार पाठ्यपुस्तकातून करत आहे. पुरोगामी देशाला पाच हजार वर्षे मागे नेण्याचे काम सरकार आहे, अशी टीका आव्हाड यांनी सरकारवर केली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, 'एससीईआरटी'ने राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात 'मनुस्मृती'मधील दोन श्लोकांचा समावेश करण्याचा प्रस्ताव मांडला पान २ वर




## सरकार कंफ्यूज? महाडमध्ये एनडीआरएफ की एसडीआरएफ?

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी महाड येथे एनडीआरएफचा बेस कॅम्प उभारण्याची घोषणा करण्यात आली होती. जिल्ह्यात पावसाळ्यातच मोठ्या प्रमाणात आपत्ती निर्माण होते. त्यामुळे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचा (एनडीआरएफ) तळ येथे उभारण्यास सरकार फारसे अनुकूल नसल्याचे चित्र आहे. त्याऐवजी या ठिकाणी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचा (एसडीआरएफ) तळ उभारण्याबाबत सरकार विचार करत आहे.





एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या गोंधळात जिल्ह्यावर आपत्ती येणार नाही ना याची दक्षता तातडीने घेणे गरजेचे आहे.

रायगड जिल्हा हा नेहमीच आपत्तीच्या केंद्रस्थानी राहिला आहे. विशेष करुन महाड, पोलादपूर तालुक्यातील नागरिक तर जीव मुठीत घेऊन वास्तव्य करतात. १९८९ साली पाली तालुक्यातील जांभुळपाडा येथे महापूर आला होता. त्यामध्ये शेकडो नागरिकांचा जीव गेला होता, तर हजारो नागरिक बेघर झाले होते. त्यानंतर महाड तालुक्यातील पारमाची या गावामध्ये १९९४ मध्ये पहिली दरड कोसळल्यानंतर रायगड जिल्ह्यामध्ये नैसर्गिक आपत्तीला सुरुवात झाली. २००५ च्या नैसर्गिक आपत्तीमध्ये महाड तालुक्यातील दासगाव, जुई, कोंडीवते व रोहन गावामध्ये दरड कोसळून १९२ जणांचा मृत्यू झाला होता. २०२१ मध्ये तळिये येथे दरड कोसळून ८६ जणांचा मृत्यू झाला होता. तर, गेल्या वर्षी इर्शाळवाडीत दरड कोसळून ८४ जण गाडले गेले होते. आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी एनडीआरएफला सातत्याने पाचारण करावे लागत होते. जिल्ह्याला आपत्तीची अशी काळी किनार असल्याने महाड येथे कायमस्वरुपी एनडीआरएफचा तळ असावा यासाठी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने प्रयत्न केले. त्यानुसार महाड येथे सुमारे चार एकर जागा मंजूरदेखील करण्यात आली होती. एनडीआरएफचे पान २ वर

> महाड येथे एनडीआरएफ की, एसडीआरएफचा तळ सुरु करणे याचा निर्णय सरकार घेणार आहे. जुलै महिन्यात आपल्याकडे एनडीआरएफचे पथक मदतीसाठी येणार आहे.
> – सागर पाठक, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, रायगड

जिल्ह्यामध्ये मोठ्या संख्येने केमिकल कंपन्या आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी सातत्याने आपत्तीच्या घटना घडत असतात. त्यामध्ये एखादी मोठी आपत्ती झाली, तर एनडीआरएफच्या पथकाला काय आयत्या वेळी बोलावणार का, असा प्रश्न आहे. शिवाय, तळिये येथे कोसळलेल्या दरडीमध्ये एनडीआरएफला पोहोचण्यास बराच कालावधी गेला होता, हे विसरुन चालणार नाही. त्यामुळे एनडीआरएफ की एसडीआरएफ, याबाबत सरकारने तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे.

## ६८५ पैकी ३०० आदिवासीवाड्या तहानलेल्या
# पाण्यावाचून तडफड

■ प्रशासन थोपटतंय स्वत:चीच पाठ

■ आदिवासी बांधवांमध्ये संतापाचे वातावरण

**। आविष्कार देसाई ।**
**। रायगड ।**

**जिल्ह्यात तब्बल ६८५ आदिवासीवाड्या आहेत. पैकी ३०० हून अधिक आदिवासीवाड्यांवरील नागरिक शुद्ध पाण्यावाचून तडफडत आहेत, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी कृषीवलशी बोलताना दिली. रोहा तालुक्यातील ताम्हाणशेत आदिवासीवाडीला पाणी दिले म्हणून रायगड जिल्हा परिषद स्वत:च स्वत:ची पाठ थोपटून धन्यता मानत असल्याने त्यांनी संताप व्यक्त केला आहे.**



रोहा तालुक्यातील तांबडी ग्रामपंचायत हद्दीत जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजना कार्यान्वित झाल्याने ताम्हाणशेत आदिवासीवाडी पाणीदार झाली आहे. या आदिवासीवडिवरील ३०४ कुटुंबांना घरोघरी नळ कनेक्शन देऊन पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सदर वाडीला पाणीपुरवठा करण्यासाठी पाणी साठवण विहीर बांधण्यात आली असून, सदर विहिरीत पुरेसे पाणी शिल्लक आहे, असा दावा जिल्हा परिषदेने केला आहे. ही बाब जरी चांगली असली, तरी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या प्रशासनाने अन्य आदिवासीवाड्यांवरील प्रश्नाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील या विदारक चित्राची पान २ वर

### भीषणटंचाईग्रस्त वाड्या

खालापूर– करंबेळी ठाकूर वाडी, खडई, तांबाटी, नावंडे, पेण– प्रधानवाडी, दर्गावाडी, निफाळ, काजूचीवाडी, उंबरमाळ, पनवेल– घेरावाडी, कोरळवाडी यांसह जिल्ह्यातील अन्य वाड्यांचा समावेश आहे.

> खालापूर तालुक्यातील करंबेळी ठाकूरवाडीवर पाण्याची भीषण समस्या निर्माण झाली आहे. महिलांना दररोज दोन किलोमीटरची पायपीट करुन पिण्याचे पाणी आणावे लागत आहे. ज्या डबक्यातून (पाण्याचे स्त्रोत) पाणी आणले जाते. ते पाणी अशुद्ध आहे; परंतु आम्हाला तेच पाणी पिण्यासाठी वापरावे लागते. जलजीवनचे काम प्रस्तावित असल्याचे सरकारी अधिकारी सांगतात. आम्हाला मुबलक आणि शुद्ध पाणी देण्याची सरकार आणि प्रशासनाची जबाबदारी आहे.
> – संतोष घाटे, खालापूर–करंबेळी आदिवासीवाडी

> जिल्ह्यात ६८५ आदिवासीवाड्यांपैकी ३०० हून अधिक आदिवासीवाड्यांवर सध्या पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत आहे. जलजीवन मिशनच्या योजना राबवण्यात येत असल्या तरी, या ठिकाणी त्या कधी पोहोचणार? आदिवासीवाड्यांवर माणसं राहात नाहीत का?
> – संतोष ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते



## दोन दिवसात मान्सून केरळात

**पुणे :** मान्सूनचे भारताच्या मुख्य भूमीत म्हणजेच केरळमध्ये येत्या तीन ते चार दिवसात आगमन होण्याची शक्यता नागपूर हवामान विभागाचे संचालक मोहन शाहू यांनी वर्तविली आहे. दरम्यान, रेमल चक्रीवादळाचा कोणताही परिणाम मान्सूनवर पडणार नसून, त्याचे मार्गक्रमण जोरदार सुरू असल्याची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. दरम्यान, ३१ मेपर्यंत मान्सून केरळात येणार आहे. दरवर्षी मान्सूनचे केरळमध्ये एक जूनला आगमन होत असते. यंदा मात्र तो एक दिवस आधीच केरळात दाखल होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदादेखील सात जूनच्या सुमारास महाराष्ट्रात मान्सून आगमनाची शक्यता आहे. तळकोकणात दाखल झाल्यानंतर मान्सून ११ जूनच्या सुमारास मुंबईला पोहोचणार आहे आणि पुढे १५ जूनच्या आसपास संपूर्ण महाराष्ट्र व्यापेल, अशी शक्यता असल्याची माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे.

## अंदाज चुकला, गाडीखाली आला
### दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ओव्हरटेक करण्याच्या नादात अंदाज चुकल्याने झालेल्या भीषण अपघातात आयवा गाडीखाली येऊन दुचाकीस्वार तरुणाचा जागीच मृत्यू झाला. हा भीषण अपघात बुधवारी (दि. २९) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या दरम्यान रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अलिबाग-रोहा मुख्य रस्त्यावर मल्याण फाट्यानजीक झाला.


मल्याण फाट्यानजीक भीषण अपघात

याबाबत पोलिसांनी सांगितलेली हकीकत अशी की, सायंकाळी साडेसातच्या वाजताच्या दरम्यान रोहा बाजूकडून अलिबागकडे पिकअप जात होता. दरम्यान, त्याच्या मागोमाग दुचाकीस्वार मार्गक्रमण करीत होता. त्याचवेळी आयवा पान २ वर

## काशीद समुद्रात तरुण बुडाला

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील काशिद समुद्रात बुडून एका तरुणाचा मृत्यू झाला. हा तरुण मुंबई-लोअर परेल येथून आपल्या मित्रांसोबत फिरायला आला होता. पोहायला उतरला असताना पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडली.

मुंबईलोअरपरेलयेथेराहणाऱ्या दहा जणांचा चमू मंगळवार, २८ मे रोजी सायंकाळच्या सुमारास काशिद समुद्रकिनारी फिरावयास आला होता. येथे आल्यानंतर यातील काही जणांना समुद्रात पोहण्याचा मोह आवरला नाही. ते नवीन जेट्टी विकसित होत असलेल्या भागात पोहण्यासाठी समुद्रात उतरले. मात्र, १७ वर्षीय ऋषभ दास याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो पान २ वर

### भिरा कुंडलिका नदीपात्रात
## तरुणाचा मृतदेह

**माणगाव :** तालुक्यातील भिरा गावाच्या हद्दीत शासकीय वसाहतीशेजारी कुंडलिका नदीच्या पात्रात एका २१ वर्षीय तरुणाचा मृतदेह सापडल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली. ही घटना शनिवार, दि.२५ मे रोजी सायंकाळी सात वाजण्याच्यापूर्वी घडली. पान २ वर

**आजचा अग्रलेख**
**सदन शिवाचे कोसळते**

### वेधक

## ससूनचे दोन डॉक्टर, वॉर्डबॉय निलंबित

**पुणे :** पुणे पोर्शे कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीचं रक्ताचे नमुने बदलणाऱ्या तीन जणांवर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ससून रुग्णालयाचे डॉक्टर अजय तावरे आणि श्रीहरी हरनोळसह शिपाई अतुल घटकांबळेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. अजय तावरेंच्या सांगण्यावरून हरनोळ आणि घटकांबळेंनं आरोपीचे रक्ताचे नमुने बदलल्याचं उघडकीस आलं आहे. त्यामुळे या कटाचा मास्टरमाईंड ससूनचा डॉक्टर तावरेच असल्याचं समोर आलं आहे. अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवालने अजय तावरेशी तब्बल दोन तासांत १४ वेळा फोन केल्याचं उघड झालं आहे.

### गुरुजी, सांगा आम्ही खेळायचे कुठे?
# तीनशे शाळा मैदानाविना

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३०४ शाळा मैदानाविना असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या शाळेतील पाच हजारहून अधिक विद्यार्थी मैदानी खेळापासून वंचित राहण्याचे चित्र दिसून येत आहे. विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण व खेळाविषयी आवड निर्माण व्हावी, यासाठी शाळांना मैदान असणे आवश्यक आहे. तसा नियमही आहे. परंतु, जिल्ह्यातील शेकडो शाळांना मैदानेच नाहीत, याबाबतचे वास्तव नवीन शैक्षणिक वर्ष सुरू व्हायला काही दिवस बाकी असतानाच कृषीवलने उघडकीस आणले आहे.

रायगगड जिल्हा परिषदेच्या पहिली ते आठवीपर्यंतच्या अडीच हजारांहून अधिक शाळा आहेत. या शाळांमध्ये एक लाखाहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळांच्या वेळापत्रकात आठवड्यात दोन ते चार तास खेळाचे असतात. पण, मैदानच नसल्याने खेळायचे कुठे, असा प्रश्न मुलांना पडतो.

जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढावी, विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळेचे महत्त्व पटावे यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत पान २ वर



### काही मैदाने खासगी जागेत

जिल्हा परिषदेच्या काही शाळांमध्ये हक्काचे मैदान नाही. त्यामुळे शाळेशेजारी असलेल्या खासगी मोकळ्या जागेत शाळांचे मैदान उभारण्यात आले. त्याची नोंद शाळेतील मैदान म्हणून केले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील काही शाळा मैदान नसूनदेखील असल्याचे दाखविले जात आहेत.

### मैदानाच्या जागेत बांधकाम

जिल्हा परिषदेच्या शाळांच्या समोर भले मोठे मैदान यापूर्वी होते. मैदानाच्या चारही बाजूला फुलांचे गार्डन, तर मध्यभागी खेळण्यासाठी मैदान होते. मात्र, या मैदानाच्या जागेत नवीन वर्ग सुरू करण्यासाठी बांधकाम करण्यात आले. त्यामुळे मैदानाची जागा बांधकामात गेली. परिणामी, मैदानच गायब झाल्याचे दिसून येत आहे.

### पर्यटकांना मिळणार उत्तम सुविधा; मध्य रेल्वेकडून हालचालींना वेग
# माथेरानमध्ये लवकरच 'पॉड हॉटेल' सेवा

**। माथेरान । वार्ताहर।**

माथेरान येथे येणाऱ्या पर्यटकांना उत्तम सुविधा पुरवण्यासाठी तसेच आरामदायी आणि किफायतशीर निवासाचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाकडून पॉड हॉटेल सुरू करण्यात येणार आहे. ऑगस्ट महिन्यात ही सुविधा पर्यटकांसाठी खुली करण्याच्या दृष्टीने मध्य रेल्वे प्रशासनाकडून हालचाली सुरू झाल्या असून, पर्यटकांना सर्वोत्तम सेवा देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

माथेरान पर्यटनस्थळ मुंबई, पुण्याच्या हाकेच्या अंतरावर आहे. मुंबई, पुणेकरांना एकदिवसीय सहलीसाठी हे थंड हवेचे ठिकाण खूपच प्रसिद्ध आहे. मध्य रेल्वेच्या नेरळ स्थानकापासून २१ कि.मी अंतरावर माथेरान आहे. येथून मिनिट्रेन, बस किंवा टॅक्सीद्वारे माथेरानला जाता येते. माथेरान पर्यटनस्थळाला भेट देणाऱ्यात देशविदेशातील पर्यटकांची संख्या लक्षणीय आहे. तसेच येथील सर्वच प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी दोन ते चार दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांना राहण्यासाठी व सर्वोत्तम सुविधा प्रदान करण्याच्या उद्देशाने मध्य रेल्वे प्रशासनाकडून पॉड हॉटेल सुरू करण्यात येणार आहे.

माथेरान येथे दरवर्षी लाखोंच्या संख्येने पर्यटक येतात. याठिकाणी राहण्यासाठी छोटी-मोठी हॉटेल उपलब्ध आहेत. परंतु, पर्यटकांना एकाच ठिकाणी सर्व अत्याधुनिक सुविधा प्रदान करण्यासाठी एकेरी, दुहेरी आणि कौटुंबिक पॉड्स उभारण्याचे काम सुरू आहे. या पॉड हॉटेलचे काम वेगात सुरू असून, येत्या ऑगस्ट महिन्यात ही कामे पूर्ण होतील. त्यानंतर पर्यटकांना पॉडची सुविधा उपलब्ध होईल, अशी माहिती येथे सूत्रांकडून देण्यात येत आहे.





### मुंबईत पहिले पॉड हॉटेल

पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकावर पहिले पॉड हॉटेल सुरू करण्यात आले आहे. त्यानंतर मध्य रेल्वेच्या सीएसएमटी स्थानकामध्येदेखील पॉड हॉटेलची सुविधा आहे. हे पॉड हॉटेल इतर हॉटेल्सच्या तुलनेने खूप स्वस्त असल्या कारणामुळे त्यांना सर्वाधिक पसंती मिळते. पर्यटकांना उत्तम सेवा देण्याच्या उद्देशाने माथेरानमध्ये हा निर्णय घेतला असून, पर्यटकांकडून त्याचे स्वागत करण्यात आले आहे.



# ग्रामपंचायतींनी थकवले पाण्याचे पैसे

**। उरण । वार्ताहर ।**

**तालुक्यातील २० ग्रामपंचायतींना एमआयडीसीच्या रानसई धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, या २० पैकी १७ ग्रामपंचायतींनी एमआयडीसीचे गेले कित्येक वर्षे पाणी बिल भरले नसल्याने त्यांच्याकडे कोट्यवधी रूपयांची पाणी बिलाची थकबाकी आहे. या ग्रामपंचायतींकडे एमआयडीसीची मार्च २०२४ अखेर पाणी बिलाची २७ कोटी ६३ लाख ३४ हजार १५५ रुपये इतकी थकबाकी आहे. तसेच उरण नगरपरिषदेकडे ३१ कोटी ६७ लाख ०५ हजार १७१ रुपये इतकी थकबाकी आहे. त्यामुळे एमआयडीसीच्या विकासकामांना गती मिळत नाही.**




- **उरणमधील १७ ग्रामपंचायती, नगरपरिषदेचा समावेश**
- **एमआयडीसीचे ५९ कोटी ३० लाख रूपये देणे बाकी**

उरण तालुक्यातील औद्योगिक क्षेत्र आणि २० ग्रामपंचायत हद्दीतील गावातील रहिवाशांना एमआयडीसीच्या माध्यमातून रानसई धरणातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे.त्यासाठी थकबाकीदार ग्रामपंचायती या नागरीकांकडून नित्य नियमाने पाणीपट्टी वसूल करण्याचे काम करत आहेत. तसेच जेएनपीए, ओएनजीसी, बीपीसीएल, महावितरण कंपनी, इतर प्रकल्पांसह गाव परिसरात निर्माण झालेल्या मालाची हाताळणी करणाऱ्या गोदाम यार्डमुळे अनेक ग्रामपंचायती या आर्थिकदृष्ट्या सधन झाल्या आहेत. मात्र, तरीही एमआयडीसीला पाण्याचे बिल भरण्यामध्ये टाळाटाळ केली जाते. त्यामुळे या ग्रामपंचायतींकडे कोट्यवधींची थकबाकी साठून राहात असल्याचे दिसून येत आहे. या ग्रामपंचायतीने थकबाकी भरल्यास त्यांची मीटर नादुरूस्त दंड, मंजूर कोटा दंड, मीटर भाडे आणि विलंब शुल्क माफ करण्याचे एमआयडीसीने या अगोदर जाहीरही केले आहे. मात्र, ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक हे जाणूनबुजून पाणी पट्टी भरण्यासाठी चालढकल पणा करत आहेत, अशी बाब थकीत पाणीपट्टीच्या माध्यमातून समोर येत आहे.

तालुक्यातील नवीन शेवा- १ कोटी ११ लाख ८४ हजार ११५, हनुमान कोळीवाडा- ४२ लाख ६६ हजार ९९६, करळ-९७ लाख ४८ हजार २७६, धुतुम- १ कोटी ४१ लाख ९३ हजार ९४४, जसखार-२ कोटी २४ लाख ५९ हजार १६२, बोकडविरा -१४ लाख ५९ हजार ७९६, फुंडे- ३ कोटी ३६ लाख ९६ हजार ३२६, सावरखार- ६० लाख ६३ हजार २७१, डोंगरी-६८ लाख ३३ हजार ४७७, सोनारी- ३४ लाख ८१ हजार ९८२, भेंडखळ- १५ हजार ५९३, नागाव-१ कोटी ६१ लाख ७४ हजार ४५०, चाणजे- ९ लाख ११ लाख ८७ हजार ८४५, पाणजे ९ लाख ११ हजार २२७, चिर्ले- २ कोटी ३० लाख २१ हजार २६९, केगाव- २ कोटी २० लाख ९५ हजार २०५, म्हातवली- ९५ लाख ४१ हजार २२२, या १७ औद्योगिकीकरण आणि सिडकोच्या हद्दीतील ग्रामपंचायतींनी एमआयडीसीचे करोडो रुपये थकवले आहेत. तसेच उरण नगरपरिषदेकडे ३१ कोटी ६७ लाख ०५ हजार १७१ रुपयांची थकबाकी आहे.

पाणीपट्टी वसुलीसाठी थकबाकीदार असलेल्या ग्रामपंचायतींना सातत्याने नोटीसाही बजावण्यात येत आहेत. तसेच वारंवार पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनाही त्यासंदर्भात माहिती देण्यात येत आहे. सोनारी ग्रामपंचायतीकडून थकीत बिलाची रक्कम भरण्यात आली असल्याने सदर ग्रामपंचायतीच्या बिलात सूट देण्यात आली. जर उर्वरित ग्रामपंचायतीने थकीत बिलाची रक्कम भरण्यास पुढाकार घेतला, तर त्यांनाही बिलात सूट देण्यात येणार आहे. मात्र, असे असतानाही थकबाकीदार ग्रामपंचायतीकडून थकबाकीची रक्कम जमा करण्यास टाळाटाळ केली जात आहे. त्याचा फटका हा एमआयडीसीच्या विकासकामांना निश्चित बसत आहे, अशी माहिती एमआयडीसीचे उपअभियंता वि.पां. पाचपुंडे यांनी दिली, तसेच थकबाकीदार ग्रामपंचायतीनी वीज देयके भरल्यास त्यांची दंडाची, मीटर नादुरस्त शुल्क, विलंब शुल्क आदी माफ करण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींनी आपली पाणीपट्टी लवकरात लवकर भरावी, असे आवाहनही उपअभियंता वि.पां. पाचपुंडे यांनी तालुक्यातील थकबाकीदार ग्रामपंचायतींना केले आहे.

# बोअरिंग मारुन पाण्याची समस्या सोडवण्यावर भर

**। पनवेल । वार्ताहर ।**

महानगर पालिका क्षेत्रात सिडको नोडमध्ये पाण्याची सम स्या मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. पाण्याची समस्या सोडवण्यासाठी कामोठे सेक्टर ३५ येथील सोसायटीने बोअरिंग मारण्यास सुरुवात केली आहे.



गेल्या काही महिन्यांपासून राज्याच्या विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मैलोन् मैलाचा प्रवास करावा लागत आहे. तसेच गुराढोरांच्या पाण्याचीदेखील त्यांना व्यवस्था करावी लागत आहे. सध्या ग्रामीण भागापासून शहरापर्यंत असेच विदारक चित्र पाहायला मिळत आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रातदेखील पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. पाण्यासाठी सर्वांचीच दमछाक होत आहे. यावर उपाय म्हणून सोसयटीने त्यांच्याच आवारात बोअरिंग मारण्याला सुरुवात केली आहे. या ठिकाणी पाणी लागले, तर नागरिकांची पाण्याची सोय होणार आहे. विशेष करुन महिलांचे पाण्यावाचून होणारे हाल थांबणार आहेत.

# २० हजार मेट्रिक टन खताची मागणी

**। अलिबाग । वार्ताहर ।**

जिल्ह्यात १ लाख १ हजार ५१० हेक्टरवर यंदा खरीपाची लागवड करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. खरीप हंगामासाठी यावर्षी साधारणपणे २० हजार मेट्रीक टन खतांची मागणी शासनाकडे रायगड जिल्हा कृषी विभागाने केली आहे.



प्रामुख्याने ९८ हजार ४८७ हेक्टरवर भाताची लागवड केली जाणार आहे. तर ३ हजार ०२३ हेक्टरवर नागली लागवडीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. गेल्या वर्षी ९० हजार हेक्टरवर भाताची लागवड करण्यात आली होती. यावर्षी त्यात वाढ करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी सुमारे २५ हजार क्विंटल बियाण्यांची मागणी करण्यात आली आहे. यात जवळपास २२ हजार क्विंटल सुधारीत तर २५० क्विंटल संकरीत भात बियाण्याचा समावेश आहे. कृषी निविष्ठांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथक स्थापन करण्यात आली आहेत.

खरिप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी देखील कामाला लागला आहे. पावसाळ्यापूर्वी मशागतीची कामे शेतकऱ्यांनी सुरु केली आहेत. दक्षिण रायगडात धूळपेरणीची कामे सुरु झाली आहेत. याशिवाय बांधबंदिस्ती, चर मारणे यासारखी कामे सुरु झाली आहेत.

जिल्ह्यात वाढते औद्योगिकरण, शहरीकरण, शेतमजूरांची कमतरता यावेळी दरवर्षी भातलागवडीखालील शेती क्षेत्रात घट होत आहे. भात लागवडीचे क्षेत्र १ लाख २४ हजार हेक्टरवरून १ लाख १ हजार हेक्टवर येऊन ठेपले आहे. शेतकरी शेतीपासून दूरावल्याचे दिसून येते.

# ''रंग वैशाखाचे'' ही साहित्यिक मैफिल

**कोर्लई :** कोकण मराठी साहित्य परिषद मुरूड जंजिरा शाखेतर्फे मुरूडच्या दत्तमंदिर टेकडीवर शिदोरी फुडस् या ठिकाणी ''रंग वैशाखाचे'' ही साहित्यिक मैफिल आयोजित करण्यात आली होती. प्रथम को.म.सा.प.शाखा मुरूड अध्यक्ष संजयजी गुंजाळ, उपाध्यक्षा उषा खोत, कार्याध्यक्ष अरूणजी बागडे,सचिव नैनिता कर्णिक, नगरपरिषद प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर प्रमुख अतिथी देवदत्त साने, डॉ. रवींद्र नामजोशी व अन्य मान्यवरांकडून दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. सर्वांचे सुवर्ण चंपक देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर ''रंग वैशाखाचे'' ही साहित्यिक मैफिल सुरु झाली. यात गझलकार सिद्धेश लखमदे, लेखक व कवी देवदत्त साने, दिपाली दिवेकर, रुद्धी भगत, वासंती उमरोटकर, उषा खोत, नैनिता कर्णिक, प्राची केने, योगेश दवटे, आशिष पाटील, आशुतोष कर्णिक, शकुंतला रोटकर संजय गुंजाळ यांनी भाग घेतला.

गीतगायनामध्ये डॉ.नामजोशी यांच्या गीतांना अरूणजी बागडे यांनी तबला व देवदत्त साने यांनी हार्मोनियमची साथ दिली. कोमल देशमुखने मैफिलीचे छान स्केच करून ते मुरुड शाखेला भेट दिले.

# पाणी पंपिंग स्टेशनची पाहणी

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान शहराचे पाणीपुरवठा नियोजन सुरळीत करण्यासाठी माथेरानवासियांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देऊन पंपिंग स्टेशन ठिकाणी जनरेटर सुविधा उपलब्ध करा अशी मागणी करण्यात आली होती. त्या अनुषंगाने या पाणी पंपिंग स्टेशनवर माथेरान लोकप्रतिनिधी यांनी अधिकारी वर्गासोबत स्वतः जाऊन पाहणी केली.



नियमित पाणी बिल अदा करूनदेखील येथे सुरळीत पाणी पुरवठा होत नाही. काही तासांसाठी जरी येथील विद्युत पुरवठा खंडित झाल्यास याचा परिणाम मात्र शहराच्या पाणी नियोजनावर होतो. याकरिता जिथे माथेरान पाणी पंपिंग ठिकाणे आहेत, त्याठिकाणी पूर्वी प्रमाणे जनरेटर सुविधा सुरू करा अशी मागणी येथे माथेरानवासियांकडून करण्यात आली होती. यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकारी तसेच माथेरान नगरपालिका अधिकारी वर्ग यांच्यासह माथेरानचे माजी नगराध्यक्ष अजय सावंत, व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष राजेश चौधरी, हॉटेल असोसिएशनचे उमेश दुबल, माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव आदी मंडळींनी पाणी पंपिंग स्टेशनची पाहणी केली. यावेळी अधिकारी वर्गासोबत बैठक घेऊन या गंभीर विषयावर चर्चा करून लवकरात लवकर यावर ठोस उपाययोजना कराव्यात, असे सांगण्यात आले.

# अडीच लाखांचा ऐवज लुटला

**। पेण । वार्ताहर ।**

तालुक्यातील काश्मिरे गावातील बंद घरातून दोन लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज दिवसाढवळ्या लांबविल्याची घटना घडली आहे. फिर्यादी लक्ष्मण कमळ म्हात्रे (४९, रा. काश्मिरे,पो. कांदळे पाडा, पेण) यांनी दिलेल्या माहितीनुसार शुक्रवार २४ मे रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ च्या दरम्यान ते पाटणेशर येथे सत्यनारायणाच्या पूजेस गेले होते. त्यांची पत्नी योगिता म्हात्रे ही शेतावर गेली होती.

यादरम्यान अज्ञात चोरट्याने घराच्या वरच्या मजल्यावरील खिडकीतून प्रवेश करून घरातील कपाटात ठेवलेले सोन्या-चांदीचे एकूण २ लाख ५५ हजार रुपयाचे दागिने चोरुन नेले. याबाबत लक्ष्मण म्हात्रे यांनी पेण पोलीस ठाण्यात तक्रार केली असून अज्ञात चोरट्या विरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

चोरट्याने अंदाजे ५ तोळ्याचे सोन्याचे गंठण (किंमत अंदाजे १ लाख ५० हजार), दीड तोळ्याचोकानातील सोन्याचे झुमके, (किंमत अंदाजे ४५ हजार), १ तोळ्याची सोन्याची चैन (किंमत अंदाजे ३० हजार), २ ग्रॅम सोन्याच गळ्यातील पान, २ ग्रॅम गळयातील सोन्याची डवल, १ ग्रॅम नाकातील सोन्याची नथ (किंमत अंदाजे ३० हजार रुपये) याचा समावेश आहे.

दरम्यान, घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी डॉग स्काड, फिंगरप्रिंट पथक यांनी भेट देऊन नमुने घेतले आहेत. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# काराव हद्दीतील ब्लास्टिंग गुलदस्त्यात

**। पेण । प्रतिनिधी ।**

काराव ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कारावगावाशेजारी जेएसडब्ल्यू स्टील कंपनीच्या गृहनिर्माण वसाहतीचे काम सुरु असून, या बांधकामामध्ये अडथळा येणाऱ्या दगडांना बाजूला करण्यासाठी विनापरवाना ब्लास्टिंग करण्यात आली. याबाबत कोणतीही अधिकृत परवानगी नसताना करण्यात ब्लास्टिंग केलीच कशी, हा प्रश्न गुलदस्त्यातच आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे, कोणत्याही गावाशेजारी एक किलोमीटरच्या अंतरावर ब्लास्टिंग करण्याची परवानगीच नसते. खरं पाहता, बांधकाम करायचे असेल तर मशीनच्या सहाय्याने दगड फोडून बाजूला करणे गरजचे असते. असे असतानादेखील कारावगावाशेजारी ब्लास्टिंग करण्यात आली. त्यानंतर ग्रामसभेने ही ब्लास्टिंग बंद केली. त्यावेळी मोठा गदारोळ त्याठिकाणी झाला. पोलिसांनी मध्यस्थी करुन काम थांबवण्यात आले.

जेएसडब्ल्यू कंपनीकडून सांगण्यात आले की, ब्लास्टिंगची परवानही नाही. मग ब्लास्टिंग झालीच कशी? याविषयी सखोल माहिती घेतल्यानंतर राकेश नामक व्यक्तीने भाईगिरी करुन ही ब्लास्टिंग केल्याची चर्चा आहे. ब्लास्टिंग करणाऱ्याकडे ब्लास्टिंग करण्याचा परवाना होता; परंतु, ब्लास्टिंग ज्या ठिकाणी करायची होती, त्या ठिकाणचा परवाना नव्हता, हेही तेवढेच सत्य आहे. वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी मध्यस्थी करताना महसूल खात्याबरोबर बैठक घेण्याचे सांगितले होते. परंतु, प्रांत कार्यालयात चौकशी केली असता ब्लास्टिंगसंदर्भात कोणत्याही बैठकीचे आयोजन करण्यात आले नाही, हे सांगण्यात आले. तर, तहसीलदार तानाजी शेजाळ यांना विचारणा केली असता ब्लास्टिंग कोठे झाली, केव्हा झाली, याबाबत कोणतीही माहिती कार्यालयात नाही, तसेच कोणताही परवाना कार्यालयाकडून घेतला नाही, असे सांगण्यात आले.

याचाच अर्थ, अवैधरित्या करण्यात आलेल्या ब्लास्टिंगबाबत दोषींवर कारवाई न होता 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' असा प्रकार झाल्याचा आढळून आलेला आहे. शुक्रवारी उशिरा बैठक झाली, त्यामध्ये तीन दिवसात तहसीलदार पाहणी करणार असल्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु, तीन दिवसांत पाहणी करणार असले तरी दोषींवर कारवाईचे काय? राकेश नामक व्यक्तीवर कारवाई होईल का? जेएसडब्ल्यू कंपनीजवळ ब्लास्टिंगची परवानगी नसताना ठेकेदाराने स्वतःच्या मनाने ब्लास्टिंग का केली? अथवा ठेकेदाराचा बोलवता धनी कोण? तहसीलदारांकडून कोणती पाहणी होणार? यासह अनेक प्रश्न गुलदस्त्यात आहेत.

# ६०० किलो कचरा केला गोळा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मांडवी समुद्र किनाऱ्यावर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी ६०० किलो कचरा संकलित करण्यात आला आहे. प्लास्टिक कचरा वेगळा केला असून विघटनासाठी पाठविण्यात आला आहे. आपली मांडवी, स्वच्छ मांडवी' या सोशल मीडियावर केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत मांडवीतील स्थानिक व्यापारी, उद्योजक, रत्नागिरीकर यासाठी एकत्र आले होते. उन्हाळी सुट्टीमुळे शहरात पर्यटकांची गर्दी वाढली आहे. मांडवी समुद्रकिनारी स्थानिकांबरोबरच पर्यटकांची वर्दळ वाढत आहे. संध्याकाळी किनाऱ्यावर फेरफटका मारणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. पर्यटक, फिरायला येणाऱ्या नागरिकांकडून किनाऱ्यावर कचरा टाकण्याचा प्रकार वाढला आहे.

**दी नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

नोंदणीकृत व प्रशासकीय कार्यालय : २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई -२१. वसुली विभाग : प्लॉट क्र. ८/सी, सेक्टर - १३, १ ला मजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.) - ४१० २०६. दूरध्वनी क्र ०२२-२७४५८६२८ ई-मेल पत्ता : recovery@ncbmumbai.com

रजि. एडी

संदर्भ क्र. : NCB/HO/REC/४८/२०२४-२५, Date : २९.०५.२०२४

प्रति,
**श्री. अशोक भुजंग चव्हाण**
खोली क्र. ९४, मु. पो. धामणी, ता. खालापूर, खोपोली, जि. रायगड - ४१० २०२.

महोदय,

विषय : सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत सूचना

तुमच्या विनंतीवर तुम्हाला दि. ०९.०१.२०२३ रोजी बँकेद्वारे खाते क्र. एचएसएलएन - १० (१५-४३२-१०) अंतर्गत गृहकर्ज सुविधा मंजूर करण्यात आली होती व त्यांच्या उलवे शाखेच्या माध्यमातून बँकेच्या नावे संपत्तीअंतर्गत प्रतिभूत हितसंबंधांची निर्मिती करून रु. २१.७० लाख वितरीत करण्यात आले आहे. सदर गृहकर्ज सुविधेचा संबंधित तपशील व तुमच्याद्वारे केलेला प्रतिभूत करार/ दस्तावेज हे अनुक्रमे अनुसूची ए व बी मध्ये नमूद आहेत. सदर करार/दस्तावेजांच्या अटीअंतर्गत सदर वित्तीय सहाय्याच्या पुन:प्रदानाकरिता कराराअंतर्गत तुम्ही वित्तीय सहाय्य प्राप्त केले होते. पुढे सदर वित्तीय सहाय्य प्राप्त करतेवेळेस बँकेच्या नावे प्रतिभूत हक्क दस्तावेज जमा करून/नोंदणीकृत गहाण प्रतिभूत हितसंबंध निर्मित करून गहाण तयार कण्यात आले होते. सदर गहाणासंदर्भातील दस्तावेजही अनुसूची बी मध्ये नमूद आहेत. प्रतिभूत संपत्तीचा संबंधित तपशील अनुसूची 'सी' मध्ये नमूद आहे. वरील सदर वित्तीयसहाय्य/पत सुविधांचे नियोजन अनियमित झाले व भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे वेळोवेळी जारी संपत्ती वर्गीकरणासंदर्भातील निर्देश - मार्गदर्शक सूचनांनुसार दि. १९.०९.२०२३ रोजी सदर कर्ज हे निष्क्रीय संपत्ती म्हणून वर्गीकृत कण्यात आले. सदर वित्तीय सहाय्य हे
१) श्रीमती मालिनी अशोक चव्हाण, २) श्री. अमर दादाराम चव्हाण यांच्या व्यक्तिगत हमीद्वारेही सुरक्षित आहे.

सातत्याने विनंती करूनही तुम्ही सदर देणी/थकबाकीच्या दायित्वाचे पूर्तता करण्यात कसूर केली आहे व दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे सदर कायद्याच्या अनु. १३ (२) अंतर्गत बँक तुम्हाला सूचना जारी करून निर्देश देत आहे की तुम्ही सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत बँकेकडे वरील निर्देशित तुमच्या संपूर्ण दायित्वाचे प्रदान करावे.

बँकेकडे असलेले तुमचे दायित्व दि. ३०.०४.२०२४ रोजीनुसार रु. २३,३१,१७७.०० (रु. तेवीस लाख एकतीस हजार एकशे सत्याहत्तर मात्र) इतके असून तुम्हाला दि. ०१.०५२०२४ पासून सदर रकमेवरील कंत्राटी दराने पुढील व्याज तसेच प्रासंगिक खर्च, मूल्य, प्रभार आदींचेही प्रदान करावे लागेल.

तुमच्याकडून वरील रक्कम रु. २३,३१,१७७.०० (रु. तेवीस लाख एकतीस हजार एकशे सत्याहत्तर मात्र) अधिक पुढील व्याज - प्रासंगिक खर्च, मूल्य यांचे प्रदान करण्यात कसूर झाल्यास कायद्याच्या अनु.१३ (२) अंतर्गत बँक अनुच्छेद १३ च्या उप अनुच्छेद ४ अंतर्गत तसेच सदर कायद्याच्या अन्य लागू तरतुदींअंतर्गत सर्व वा कोणत्याही अधिकाराचा बँक वापर करील.

अनुच्छेद १३ च्या उप अनुच्छेद १३ अंतर्गत विहित केल्यानुसार तुम्हाला अशीही सूचना देण्यात येत आहे की बँकेकडून लेखी संमती प्राप्त केल्यानुसार सदर सूचनेच्या अनुसूची सी मध्ये विवरणीत सदर प्रतिभूत संपत्तीची विक्री, भाडेकरार वा अन्य स्वरूपात तुम्ही हस्तांतरण करू शकणार नाही.

सदर सूचना ही आवश्यकता भासल्यास कायद्याच्या कोणत्याही लागू तरतुदींअंतर्गत अशा अन्य वा कायदेशीर कारवाई सुरू करण्याच्या बँकेच्या हक्कांना बाधा न आणता आहे.

धन्यवाद
**(श्रीमती मधुरा ए. राऊळ), प्राधिकृत अधिकारी**

प्रत रवाना :
१. श्रीमती मालिनी अशोक चव्हाण
पत्ता : घर क्र. ९४, मु. पो. धामणी, ता. खालापूर, खोपोली, जि. रायगड - ४१०२०२.
२. श्री. अमर दादाराम चव्हाण
पत्ता : घर क्र. १२०६, मु. पो. परळी, ता. पाली, सुधागड, जि. रायगड - ४१० २०६.
तुम्हाला निर्देश देण्यात येत आहे की तुम्ही केलेल्या हमीच्या अटीअंतर्गत सूचनेत निर्देशित रकमेचे तुम्ही प्रदान करावे.
**(श्रीमती मधुरा ए. राऊळ), प्राधिकृत अधिकारी**

**अनुसूची ए**

| सुविधेचे नाव | गृहकर्ज खाते क्र. १०, दि. ०९.०१.२०२३ रोजी मंजूर. |
|---|---|
| दि. ३०.०४२०२४ रोजीनुसार थकित रक्कम, व्याजासहित | रु. २३,३१,१७७.०० (रु. तेवीस लाख एकतीस हजार एकशे सत्याहत्तर मात्र) |

**अनुसूची बी**
(प्रतिभूत दस्तावेजांचा तपशील, सर्व सहाय्यक दस्तावेज, गहाण निर्मितीच्या पुराव्याच्या दस्तावेजांसमवेत).

| अ.क्र. | दस्तावेजाचे नाव | निर्मिती दिनांक | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| | एचएसएलएन - १० (१५-४३२-१०) | | |
| १. | डीमांड प्रॉमिसरी नोट | १२.०१.२०२३ | रु. २१,७०,०००.०० |
| २. | कर्ज करार | -,,- | -,,- |
| ३. | लेटर ऑफ लिएन व सेट ऑफ | -,,- | -,,- |
| ४. | लेटर ऑफ गॅरन्टी | -,,- | -,,- |
| ५. | हमीदार - को-ऑब्रिगेटर यांच्याकडून लेटर ऑफ | -,,- | -,,- |
| | लिएन व लेट ऑफ | | |

**अनुसूची सी**
**भाग - १ बँकेकडील प्राथमिक सीक्युरिटीचा तपशील**
संपत्तीचे नाव व त्यांचे विवरण
मालमत्तेचे नोंदणीकृत गहाण : फ्लॅट क्र. २०३, २ रा मजला, बी विंग, इमारतीचे नाव साई रेसिडेन्सी, प्लॉट क्र. १० व १२, सर्व्हे क्र. ५६ + ५७ + ५८, सीटीएस क्र. १६६०, १६६२, १६६३ ,१७८०, गाव चिंचवी शेकीन, तालुका खालापूर, खोपोली, जि. रायगड, मोजमापित ३६.६९ चौ. मी.
**वरील मालमत्तांच्या गहाणाकरिता दस्तावेजांचा तपशील :**
ए) मे. रेश्मा एन्टरप्रायझेस - त्यांच्या प्रोप्रायटर श्रीमती शालन तानाजी डामरे व श्री. नासीर हुसैन बागवान यांच्या दरम्यान नोंदणीकरण क्र. केएलआर - १६०४ - २०२१ व पावती क्र. २१८९, दि. ०८.०३.२०२१ अंतर्गत केलेला मूळ विक्री करार दि. ०४.०३.२०२१
बी) रेश्मा एन्टरप्रायझेस सिव्हिल इंजिनीयर व कंत्राटदार आणि श्री. नासीर हुसैन बागवान यांच्या दरम्यानचे मूळ ताबा पत्र दि. ३१.१०.२०२१
सी) श्री. नासीर हुसैन बागवान व श्री. अशोक भुजंग चव्हाण यांच्या दरम्यान नोंदणीकरण क्र. केएलआर - ५९१९-२०२२ व पावती क्र. ९२४० अंतर्गत दि. २८.१२.२०२२ रोजी केलेला मूळ विक्री करार दि. २७.१२.२०२२.
डी) मे. रेश्मा एन्टर प्रायझेस बिल्डर व विकासक यांच्याद्वारे बँकेच्या नावे केलेले नाहरकत प्रमाणपत्र दि. १६.१२२०२२ व लिएन प्रमाणपत्र दि. १७.१२.२०२२.
ई) श्री. अशोक भुजंग चव्हाण व दी नॅशनल को-ऑप. बँक लि. यांच्यादरम्यान नोंदणीकरण क्र. केएलआर - २१८-२०२३ व पावती क्र. ४१६, दि. १२.०१.२०२३ अंतर्गत केलेले मूळ गहाण करार दि. १२.०१.२०२३.
एफ) श्री. नासीर हुसैन बागवान यांच्याद्वारे दि. १८.०१.२०२३ रोजी प्राप्त प्रदानासंदर्भातील स्वाक्षरीत रु. ३,००,०००.०० (रु. तीन लाख मात्र) ची पावती.
जी) सेरसाई नोंदणीकरण दि. ३१.०१.२०२३.

पान १ वरुन

## आव्हाडांकडून मनुस्मृतीचे दहन

आहे. त्यावर आक्षेप आणि सूचनाही मागवण्यात आल्या आहेत. अनेक पुरोगामी संघटना आणि राजकीय पक्षांनी राज्य सरकारच्या या प्रस्तावास विरोध दर्शवला आहे. विरोधकांनी राज्य सरकारविरोधात टीकेची झोड उठवली आहे. आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही याविरोधात आक्रमक भूमिका घेत महाड येथील चवदार तळ्यावर जाऊन मनुस्मृती ग्रंथाचं दहन केलं. १९२७ साली महाडमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन केले होते, त्याचठिकाणी बुधवारी जितेंद्र आव्हाड यांनी मनस्मृतीचे दहन केले. मनुस्मृतीतील दोन श्लोक शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केले जात आहेत. हळूहळू मनुस्मृतीचा समावेश शालेय अभ्यासक्रमात होईल, असे आव्हाड यावेळी म्हणाले. सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी मिलिंद टिपणीस यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## पाण्यावाचून तडफड

माहिती डॉ. बास्टेवाड यांना त्यांचे संबंधित अधिकारी देतात की नाही, हेदेखील तपासून पाहिले पाहिजे.रायगड जिल्ह्यामध्ये दरवर्षी साडेतीन हजार मि.मी. पाऊस पडतो. आपल्याकडे पुरेशा प्रमाणात मोठी धरणं नसल्याने कोट्यवधी लीटर पाणी हे समुद्राला जाऊन मिळते. तसेच 'पाणी आडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना आता विस्मृतीत गेली का, असाही प्रश्न पडतो. उपलब्ध असणाऱ्या धरणांची क्षमता कमी असल्याने त्यामध्ये कमी पाणीसाठा होता. त्यामुळे डिसेंबर महिन्यापासूनच पाणीटंचाईच्या झळा जाणवायला सुरुवात होते.

## एनडीआरएफ की एसडीआरएफ?

तळ सुरु होणार असे वाटत असतानच अचानक या प्रक्रियेला ब्रेक लागला आहे.पावसाळ्यामध्येच प्रामुख्याने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आपत्तीच्या घडना घडत असतात. त्यामुळे अन्य महिन्यात एनडीआरएफ काय करणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे कायमस्वरुपी तळ देण्याबाबत सरकार फेरविचार करत असल्याचे सूत्रांनी सांगितले. त्याऐवजी त्याच जागेवर एसडीआरएफचा तळ उभारण्याबाबत सरकार अनुकूल असल्याचेही सूत्रांनी स्पष्ट केले.

## तीनशे शाळा मैदानाविना

शाळांमध्ये वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. आठवड्यातील एक वार दप्तराविनासारखे उपक्रम घेऊन मुलांमधील शारीरिक व बौद्धिक क्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच मैदानी खेळाची आवड निर्माण व्हावी यासाठी वेगवेगळे खेळ भरविले जात आहेत. मात्र, रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शेकडो शाळा मैदानाविना असल्याचे आकडेवारीनुसार समोर आले आहे.

जिल्ह्यातील दोन हजार ५६६ शाळांपैकी ३०४ शाळा मैदानाविनाच आहेत. त्यामध्ये कर्जतमध्ये ३२, माणगावमध्ये ३४, पनवेलमध्ये ५७, पोलादपूरमध्ये ४७, रोहामध्ये ३५, महाडमध्ये वीस, म्हसळामध्ये १८, अलिबागमध्ये १५, खालापूर, श्रीवर्धनमध्ये प्रत्येकी नऊ, मुरूडमध्ये आठ, सुधागडमध्ये तीन, उरणमध्ये दोन, आणि पेणमध्ये एक अशा एकूण ३०४ शाळांसमोर मैदान नसल्याचे स्पष्ट झाले आहेत. त्यामध्ये पनवेल, कर्जत, माणगाव, पोलादपूर, रोहा या तालुक्यातील शाळांचा अधिक समावेश आहे. मैदानी खेळाअभावी विद्यार्थ्यांना शाळेत खेळ खेळण्यास अडचणी निर्माण होत आहे.

## तरुणाचा मृतदेह

याबाबतची खबर पोलीस पाटील प्रदीप महीपत म्हामुणकर (५०) रा.म्हसेवाडी, ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.या घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील मयत इसम संकेत संजय परळकर (२१) रा. बहादूरपुरा कंधार, जि. नांदेड, सध्या रा. दत्तवाडी, जि. पुणे हा भिरा गावाच्या हद्दीत शासकीय वसाहतीशेजारी कुंडलिका नदीच्या पात्रात बुडालेल्या अवस्थेत मिळून आला. त्यास उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून मयत झाल्याचे सांगितले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार पावर हे करीत आहेत.

## काशीद समुद्रात तरुण बुडाला

गटांगळ्या खाऊ लागला. यापैकी काही जण कसेबसे पाण्याबाहेर निघाले, परंतु ऋषभ हा काही कळायच्या आतच पाण्यात बुडाला. त्याला शोधण्याचा प्रयत्न केला, परंतु काही तासानंतर तो सापडला. त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. तरुणाच्या मृत्यूने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. काशीद येथे पर्यटक मोठ्या प्रमाणात येत आहेत. त्यांना वाचवण्यासाठी निदान एक स्पीड बोट तैनात करावी, अशी मागणी असंख्य पर्यटकांनी महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डाकडे केली आहे.

## अंदाज चुकला, गाडीखाली आला

गाडी अलिबाकडून रोह्याकडे येत होती. दरम्यान, मल्याण फाटानजीक ही वाहने आली असता पिकअपच्या मागून येणाऱ्या दुचाकीस्वाने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. त्याच सुमारास समोरुन येणाऱ्या आयवा गाडीची जोरदार धडक दुचाकीस्वारास बसली. त्यामुळे तो गाडीखाली चिरडला. त्याची दुचाकी पिकअप टेम्पोच्या खाडी जाऊन तिचाही चक्काचूर झाला. या भीषण अपघातानंतर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. त्यानंतर घटनास्थळी आलेल्या पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली. तसेच मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. दरम्यान, मृतदेह छिन्नविच्छन्न झाल्याने त्याची ओळख पटली नाही. याबाबत अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# गंजलेल्या विजेचे खांब धोकादायक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नसरापूर ग्रामपंचायतीमधील चांधई गावातील विजेचे खांब १९८० मध्ये उभे केले आहेत. त्या विजेच्या खांबांचे आयुष्यमान संपून गेले आहे. त्यामुळे ते विजेचे खांब बदलण्याची आवश्यकता असून, महावितरण कंपनी अपघात होण्याची वाट पाहात आहे का, असा प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत.



चांधई खुर्द आणि बुद्रुक या गावांमध्ये महावितरणकडून १९८०मध्ये वीज पोहोचली. त्यावेळी महाराष्ट्र विद्युत कंपनीकडून लोखंडी विजेचे खांब वीजवाहिन्या खेचण्यासाठी उभे केले जायचे. त्या खांबांची स्थिती आज कधी कोसळतील अशी झाली आहे. दहा वर्षांपूर्वी कर्जत तालुक्यात इन्फ्रा प्रकल्पांतर्गत बहुसंख्य गावांमधील विजेचे खांब तसेच कंडक्टर बदलण्यात आले. मात्र, यापैकी कोणतीही कामे चांधई या दोन्ही गावांमध्ये झाली नाहीत. त्यावेळी स्थानिक ग्रामस्थांकडून जुने विजेचे हे खांब काढून नव्याने उभारण्याची मागणी झाली होती. मात्र, महावितरणकडून चांदई येथील दोन्ही गावे विजेच्या नवीन खांबांपासून दूर आहे. काही दिवसांपूर्वी आलेल्या वादळी वाऱ्याने नसरापूर ग्रामपंचायतीमधील विजेचे खांब कोसळले होते आणि त्यानंतर पाच दिवस या ग्रामपंचायतीमधील सर्व गावांची वीज खंडित होती. परिणामी, पिण्याचे पाणीदेखील गावात पोहोचले नव्हते.

मागील दहा वर्षे स्थानिक ग्रामपंचायतीकडून सातत्याने नवीन विजेचे खांब बदलले जात नाहीत. त्यात या दोन्ही गावांतील विजेचे खांब हे पूर्णपणे गंजले असून, ते या पावसाळ्यात वादळात कोसळू शकतात. दोन्ही गावातील खांबांच्या आजूबाजूला लोकवस्ती आणि त्यामुळे विजेचे खांब कोसळून मोठा अपघात होऊ शकतो. त्यामुळे महावितरणकडून चांधई गावामधील विजेचे खांब बदलण्याची कार्यवाही लवकरात लवकर करावी, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत. ग्रामस्थांनी त्याबाबत अनेकवेळा पत्रव्यवहारदेखील केला आहे. मात्र, महावितरणकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे स्थानिक संतप्त असून, महावितरण कंपनी अपघात होण्याची वाट पाहात आहे काय, असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

निवडक

## नेकलेस नेला चोरून

**पनवेल :** सामान शिफ्ट करणाऱ्या कर्मचाऱ्यानेच दिड लाखाचा नेकलेस चोरुन नेल्याची घटना घडली. खुशबु सिंग सेक्टर ११ येथे राहत होत्या. त्यानुसार त्यांनी आपले सामान आणण्यासाठी ५ जणांसह टेम्पो भाड्याने घेतला होता. सामान शिफ्ट करत असताना त्यांनी सोन्याचे दागिने डब्यात काढून ते बॅगेत ठेवून ती बॅग कपाटात ठेवली होती. सामान शिफ्ट झाल्यावर त्यांनी बॅग उघडली असता सोन्याचा नेकलेस आढळून न आल्याने सदर नेकलेस चोरी गेल्याची तक्रार त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात दिली आहे.

## ६१ लाखांचा ऐवज लंपास

**पनवेल :** एका बंद घरात झालेल्या घरफोडीत जवळपास सोन्या-चांदी व हिऱ्याचे दागिने तसेच रोख रक्कम असा ६१ लाखाचा ऐवज लंपास केल्याची घटना तक्का येथे घडली आहे.डॉ.मनोज जैन हे बाहेरगावी गेल्याचे पाहून त्यांच्या घरात घरफोडी झाली. ६१ लाख रूपयांचा ऐवज रोख रकमेसह चोरीस गेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून सीसीटीव्ही फुटेज व इतर माहितीच्या आधारे सदर चोरट्यांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

## विद्यार्थी समुपदेशन कार्यशाळा

**पनवेल :** भारत विकास परिषद, रोटरी क्लब ऑफ सेंट्रल व ठकेकर क्लास यांच्या संयुक्त विद्यमानाने विद्यार्थी समुपदेशन कार्यशाळा हा उपक्रम पनवेल शहरातील गोखले सभागृह येथे अतिशय उत्साहात संपन्न झाला. कार्यशाळेत १११ विद्यार्थांनी हजेरी लावली होती. अंदाजे ५० पालक तर भाविप, रोटरी व ठकेकर क्लासचे कार्यकर्ते सदस्य ४० असे कार्यक्रमात एकूण २०० सदस्य सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात आभा जांबेकर व मैत्रेयी कुलकर्णी यांनी वंदेमातरम् गीत गायनाने केली.

## ‘अनलॉकिंग’चे आयोजन

**पनवेल :** अनलॉकिंग इंजिनिअरिंग २०२४ चे आयोजन पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगद्वारे केले जात आहे. पीसीई एक प्रतिष्ठित स्वायत्त, मान्यताप्राप्त आणि एकमेव नॅक ए+ श्रेणीबद्ध अभियांत्रिकी महाविद्यालय आहे.पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालयाने अनलॉक इंजिनियरिंग मालिका यशस्वीरित्या सुरू केली आहे. पहिले सत्र २३ ते ३१ जुलै २०२० आणि त्यानंतर दुसरे सत्र १९ ते ३० जुलै २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. आगामी सत्र ३ जून ते ८ जून २०२४ या कालावधीत होणार आहे.

## सहा लाखांची घरफोडी

**पनवेल :** कामोठे वसाहतीमधील साई किरण सोसायटीमध्ये सोमवारी दुपारी तब्बल सहा लाख रुपयांची घरफोडी झाली आहे. कामोठे येथील साईकिरण सोसायटी मधील सदनिका क्रमांक २०३ मध्ये सुमित शिंदे राहतात. शिंदे हे सोमवारी घराबाहेर असताना ही चोरी झाली. चोरट्यांनी शिंदे यांच्या घराचे कुलूप कशाने तरी उघडून ही चोरी केल्याने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत शिंदे यांनी म्हटले आहे. या चोरीत चोरट्यांनी १२० ग्रॅमचे सोन्याचे दागिने चोरले.

# रायगडात घटले खरीपाचे क्षेत्र

## हवामान बदलाचा फटका; कृषी विभागासमोर आव्हान

। रायगड । प्रतिनिधी ।

बदलणारे हवामान, अवकाळी पाऊस, मजुरांचा अभाव, कमी झालेले उत्पादन यामुळे शेतकऱ्यांनी शेतीकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे रायगडमधील खरीप हंगामातील क्षेत्र दोन वर्षांत १० हजार ५९१ हेक्टरने घटले आहे. ही स्थिती अशीच कायम राहिल्यास भाताचे कोठार ही रायगडची ओळख नाकाशावरून पुसली जाण्याची शक्यता आहे. पावसाळा उंबरठ्यावर असल्याने कृषी विभागाकडून खरीप हंगामासाठी नियोजन केले जात आहे. असेअसलेतरी कृषी विभागासमोर कृषी क्षेत्र टिकवण्याचे मोठे आव्हान उभे राहणार आहे.



यंदा रायगड जिल्ह्यात एकूण एक लाख तीन हजार हेक्टर क्षेत्रावर लागवड होणार असून नागली, तूर, उडीद पिकाचे क्षेत्र वाढवण्याचे कृषी विभागाचे प्रयत्न आहेत. निवडणूक आचारसंहितेमुळे खते, बियाणे यांचे वितरण करण्यात विलंब होत आहे. यासाठी २० मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेली सभाही रद्द करण्यात आली. शेतकऱ्यांना खते, बियाणे वेळेत मिळणे आवश्यक असल्याने यासाठी कृषी विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत. रायगडमधील ९५ टक्के शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. मात्र पावसाचा लहरीपणा वाढत असल्याने शेतीला फटका बसतो आहे. वाढलेले मजुरीचे दर, कमी झालेली उत्पादकता, सतत येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींमुळे हैराण झालेले शेतकरी पारंपरिक भात शेतीपासून दूर जात असल्याचेही चित्र जिल्ह्यात आहे.

शेतीचे सर्वाधिक घटते प्रमाण पनवेल, उरण, पेण, अलिबाग या नागरिकरण होत असलेल्या तालुक्यांमध्ये आहे. पावसाळ्यापूर्वी खरीप हंगामातील नियोजनाकडे संपूर्ण जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष असते. यंदा ९८ हजार ९१८ हेक्टर क्षेत्रात भात लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात खते, बियाणे आदींची कमतरता जाणवणार नाही, बोगस बियाणांची वाहतूक व विक्री होणार नाही, ई-केवायसी याबाबत कृषी विभागाला आतापासूनच नियोजन करावे लागणार आहे. जेवढे खरिपाचे क्षेत्र आहे, त्यापेक्षा जास्त क्षेत्राचा विम्यामध्ये समावेश असू नये, यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी लागेल. कृषी विषयक माहिती शेतकऱ्यांना बांधावर मिळण्यासाठी प्रात्यक्षिकांची संख्या वाढवावी, अशा सूचना कृषी अधिक्षक कार्यालयाकडून केल्या जात आहेत.

> अलिबाग तालुक्यातील २० हेक्टर क्षेत्रावर नावीन्यपूर्ण उपक्रमातून सरी वरंबा पद्धतीने हळद लागवड केली जाणार आहे, त्याचबरोबर शेततळ्यातील मत्स्योत्पादन प्रकल्पातून ३० शेतकऱ्यांना सहाय्य केले जाणार आहे. पेणमध्ये जेएसडब्ल्यू कंपनीच्या सहकार्याने २० हेक्टर क्षेत्रावर करटुलीची लागवड करण्याचे नियोजन आहे. मुरूडमध्ये नारळी-सुपारीच्या बागांमध्ये आंतरपीक म्हणून काळीमिरीचे पीक १० हेक्टर क्षेत्रातील बागायतदारांनी घ्यावे, यासाठी कृषी विभागाचे प्रयत्न आहेत.
>
> - वंदना शिंदे, कृषी अधिक्षक, जिल्हा अधिकारी कार्यालय

हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करापाऊस पडेल, या अपेक्षेने शेतकरी पेरणी करतात. मात्र बऱ्याचवेळा पाऊस वेळेवर येत नाही, यामुळे शेतकऱ्यांची तारांबळ उडते. हे टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी कृषी व हवामान विभागांच्या सूचनांकडे वेळोवेळी लक्ष देणे आवश्यक आहे. पीक लागवडीपूर्वी कृषी अधिकाऱ्यांचा सल्ला घेणे फायद्याचे ठरते. अनेकदा पेरणी केल्यावर पावसाला विलंब झाल्यास शेतकऱ्यांनी बी-बियाणांवर केलेला खर्च वाया जातो. दुबार पेरणीची वेळ येते, अशी परिस्थिती टाळण्यासाठी हवामान खात्याच्या सूचनांकडे लक्ष देणे गरजेचे असते.

जिल्ह्यात २४ हजार ६०० मेट्रिक टन इतक्या रासायनिक खतांची आवश्यकता असून त्याप्रमाणे कृषी विभागाकडे मागणी नोंदवण्यात आली आहे. तसेच ३४ हजार ९०० लिटर्स कीटकनाशके व बुरशीनाशकांची आवश्यकता आहे. भाताच्या बियाण्याची आवश्यकता १५ हजार १५५ क्विंटल इतकी आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून तयार करण्यात येत आहे.

जिल्ह्यात खरीप हंगामासाठी कृषी निविष्ठांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर दोन तर प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १७ भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना अधिक दर्जेदार निविष्ठा मिळाव्यात, यासाठी उत्पादन व साठवणूक स्थळावरील नमुने घेऊन तपासणी करण्याच्या सूचना निरीक्षकांना देण्यात आल्या आहेत. सदोष नमुने आढळल्यास ते जप्त करण्याचे निर्देश दिले आहेत.

## पदवीधर निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांची बैठक



। पनवेल । प्रतिनिधी ।

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मुंबई शिक्षक, मुंबई पदवीधर आणि कोकण विभाग पदवीधर विधानपरिषद मतदारसंघाच्या निवडणुकी संदर्भात माहिती व सूचना देण्याकरिता विविध पक्षाच्या प्रतिनिधींची उपआयुक्त (सा.प्र.)कोकण विभाग तथा सह. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी बैठक घेतली.

या बैठकीस उपआयुक्त संजीव पालांडे, कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ.गणेश मुळे, भारतीय जनता पक्ष, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गट, शेतकरी कामगार पक्ष, जनता दल, बहुजन समाजवादी पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना अशा विविध पक्षाचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.या बैठकीत उपआयुक्त (सा.प्र.) कोकण विभाग तथा सह. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी उपस्थित राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना निवडणूक कार्यक्रम संदर्भात माहिती दिली. तसेच अनामत रक्कमे संबधित माहिती, नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे, शपथ पत्रातील सूचना, आदर्श आचारसंहितेसंबधी माहिती, मतदान केंद्रांची माहिती, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची माहिती या बाबत तपशीलवार माहिती दिली.

यावेळी निवडणुकीसंदर्भात पक्षाच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या शंकांचे उपआयुक्त अमोल यादव यांनी सोप्या शब्दात निरसन केले.

# नेरळ ग्रामपंचायतीत नालेसफाईला वेग

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ ग्रामपंचायतीने नाल्यांची साफसफाई आणि मान्सून पूर्व कामांना करताना सुरुवात केली आहे. नेरळ ग्रामपंचायतीकडून गावातील मोठ्या नाल्यांमधील कचरा काढण्यासाठी जेसीबी मशीनचे सहाय्य घेतले जात आहे.

नेरळ गावात माथेरान डोंगरातून वाहणारे पाणी हे तीन वेगवेगळ्या नाल्यांमधून नेरळ ग्रामपंचायत हद्दी मधून उल्हास नदीकडे जाते.या नाल्यांमधून सांडपाणी वाहून नेणारे पाणी वाहून जात असते. त्यामुळे नाल्यांमध्ये झाडे झुडपे यांची वाढ होते. त्याचवेळी पावसाळ्यात वाहून येणारे दगड तसेच गाळ यांच्यामुळे नाल्यातून पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नाहीत. दरवर्षी नाल्यांची साफसफाई नेरळ ग्रामपंचायतीकडून केली जाते. नेरळ ग्रामपंचायतीकडे ४० स्वच्छता कर्मचारी असून त्यांच्याकडून दररोज बाजारपेठ भागातील गटारे स्वच्छ केली जातात. मात्र नाल्यांची सफाई होत नाही, ती स्वच्छता मान्सून पूर्व काळातील कामे म्हणून नेरळ ग्रामपंचायत प्रशासन करीत असते.

नाल्यांची वार्षिक सफाई करण्याचे काम करण्याबाबत ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच आणि सदस्यांना नाले सफाईबाबत कल्पना देण्यात आली आहे. त्या त्या प्रभागातील ग्रामपंचायत सदस्यांकडून नालेसफाईची पाहणीदेखील सुरू आहे.



**दैनिक कृषिवलच्या बातमीचा दणका..**

नेरळ ग्रामपंचायतीमध्ये नालेसफाई नाही अशा आशयाची बातमी दैनिक कृषिवलमध्ये सोमवार २७ मे रोजी प्रसिद्ध झाली होती. त्यांनतर नेरळ ग्रामपंचायतीकडून त्याच दिवशी नालेसफाई करण्यास सुरुवात झाली आहे.

> २७ मे पासून नेरळ ग्रामपंचायतीकडून मान्सून पूर्व कामांना सुरुवात झाली आहे. मातोश्रीनगर, निर्माण नगरी, बस स्थानक हा नाला पूर्व भागातील असून मोहाची वाडी आणि गणेश घाट येथून येणारे दोन्ही नाले खांडा पूल येथे एकत्र येतात. तेथून पुढे उल्हास नदी असा त्यांचा प्रवास असतो. मातोश्री नगर भागातील नाल्यांची सफाई ग्रामपंचायतीकडून जेसीबी मशीनच्या सहाय्याने कचरा गोळा करण्याचे काम सुरु आहे. ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून तीन दिवसापूर्वी नाल्यांची स्वच्छता सोमवारपासून हाती घेण्यात येईल अशी माहिती देण्यात आली होतीत्यानुसार नाल्यांची सफाई सुरु झाली आहे.
>
> – अरुण कार्ले, ग्रामविकास अधिकारी

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे पन्नास टक्के शाळा बंद होतील

। कर्जत । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वागतार्ह आणि कौतुकास्पद आहे. त्याला विरोध असण्याचे कारण नाही. त्यामुळे चांगले विद्यार्थी घडतील यात शंका नाही. मात्र शासनाने जर हे धोरण जसेच्या तसे आणल्यास राज्यातील पन्नास टक्के शाळा बंद होतील आणि त्यामध्ये लाखो विद्यार्थ्यांचे खूप नुकसान होईल. शासनाने हरकती सुचविण्यासाठी दिलेली ३ जून २०२४ ही अंतिम तारीख खूप मर्यादित आहे. ती वाढवून द्यावी,



**श्रीराम पुरोहित यांचे मत**

अशी सूचना अभिनव ज्ञान मंदिर संस्थेचे कार्याध्यक्ष व शिक्षणतज्ञ श्रीराम पुरोहित यांनी केली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० याबाबत ब्राह्मण सभा कर्जतचे उपाध्यक्ष महेश वैद्य यांनी पुढाकार घेऊन चर्चासत्राचे आयोजन केले होते. याप्रसंगी व्यासपीठावर राज्य अभ्यासक्रम आराखडा तज्ञ समिती सदस्य डॉ. स्नेहा उपाध्ये, मुंबई विद्यापीठाचे समन्वयक डॉ. पराग कारुळकर, श्रीराम पुरोहित, रमेश चव्हाण, कर्जत एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रवीण गांगल व्यासपीठावर उपस्थित होते.

# मोळ्या जाळून शेतकऱ्याने केला प्रशासनाचा निषेध

## अवकाळी पावसाने शेतकऱ्याचे झाले होते नुकसान

। नेरळ । वार्ताहर ।

अवकाळी पावसाने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाला शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी करायला वेळ नाही तर नुकसानभरपाई मिळणार कधी म्हणून राग अनावर झालेल्या या शेतकऱ्याने भात पेंढ्याच्या मोळीला आग लावून प्रशासनाचा निषेध केला.कर्जत तालुक्यातील सावेळे या ग्रामपंचायत हद्दीतील ही घटना घडली.



सावेळे ग्रामपंचायत हद्दीतील सापेले गावात राहणाऱ्या शेतकऱ्याने संतप्त होत आपल्या शेतात जनावरांसाठी साठवून ठेवलेला भात पिकाचा पेंढा आग लावून पेटवून दिला. नितीन विचारे असे या शेतकऱ्याचे नाव आहे. पन्नास हजाराहून अधिक रुपये किमतीचा चारा शेतकरी विचारे यांनी जनावरांसाठी साठवून ठेवला होता.परंतु आता हा चारा भिजून शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले होते. या घटनेला आठवडा उलटूनही प्रशासन, तलाठी, तहसीलदार, अधिकारी कुठे शेतकऱ्याच्या व्यथा जाणून घेण्यासाठी बांधावर पोहचलेला दिसला नाही. अखेर राग अनावर झालेल्या या शेतकऱ्याने आपल्या शेतातच भिजलेल्या भात पेंढ्यांच्या मोळीला आग लावली.

तलाठी, तहसीलदार तर संबंधित प्रशासन अधिकारी आर्थिक कारवाईचा दृष्टीने शेतकऱ्यांच्या बांधावर धावलेली कधी काळी पाहिली परंतु, तिच यंत्रणा नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यासाठी कधी कार्यतत्परतेने धावलेली दिसली नाही.

## तेलंगे ३१ मे रोजी होणार सेवानिवृत्त

**पनवेल :** म्हसळ्याचे निवासी नायब तहसीलदार असलेले गणेश मारुती तेलंगे हे येत्या ३१ मे ला सेवानिवृत्त होत आहेत.१ जून १९८५ पासून तलाठी पदावर तेलंगे यांची नियुक्ती झाली. प्रथम तलाठी सजा गाढे येथे त्यांना नियुक्ती मिळाली. पदोन्नतीने डिसेंबर २०११ मध्ये मंडळ अधिकारी कासुनियुक्ती मिळाली. सन २०१४ मध्ये मंडळ अधिकारी संवर्गातून बदलीने अव्वल कारकून संवर्गात एम. आर. इ. जी. एस. अव्वल कारकून सुधागड पाली येथे त्यांची बदली झाली. शासन आदेशानुसार पदोन्नतीने निवासी नायब तहसीलदार म्हणून म्हसळा येथे ते हजर झाले.

# महाडमध्ये सात वाड्यांना पाणी टंचाईच्या झळा

। महाड । प्रतिनिधी ।

करोडो रुपयांच्या योजना राबवल्या गेल्या असल्या तरी महाड तालुक्यातील पाणी टंचाई आजही कायम आहे. औद्योगिक क्षेत्रातील शेल गावातील आदिवासी वाड्यांसह अन्य वाड्यादेखील तहानलेल्याच आहेत. यामुळे महिलांना पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे.

तालुक्यातील प्रत्येक गावात जलजीवनच्या करोडो रुपयांच्या योजना राबवल्या गेल्या आहेत. योजनांतून ठेकेदार अधिकारी गब्बर झाले आहेत. मात्र गोरगरीब जनतेला आजही पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. अशीच अवस्था शेल आदिवासी वाडीवरील महिलांची आहे. याठिकाणी सुदर्शन केमिकल कंपनीने आपल्या सी.एस.आर. च्या माध्यमातून पाणी टंचाई दूर करण्यासाठी विहीर, टाकी आणि पाईपलाईन टाकण्याचे काम केले आहे. मात्र ही योजना ग्रामस्थांना विश्वासात न घेता केल्याने सपशेल फोल ठरली असल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले. शिवाय जलजिवन योजनेतून देखील करोडो रुपये खर्ची घातले आहेत. मात्र या आदिवासी वाडीवर आणि इतर सात वाड्यांवरदेखील अद्याप पाणी पोहोचलेले नाही. आदिवासी वाडीवर पिण्याचे पाणी नसल्याने पंचायत समितीच्या माध्यमातून टँकर सुरू करण्यात आला आहे. हा टँकरदेखील चार दिवसांनी गावात येतो. आदिवासी महिलांना डोक्यावर हांडे घेवून सुमारे एक किमी अंतरावरील एका खाजगी बोअरवेलवरून पाणी आणावे लागत आहे. याकरिता त्यांना प्रती हांड्याला रुपये मोजावे लागत आहेत. पिण्याच्या पाण्याची समस्या अत्यंत गंभीर असल्याने आदिवासी महिलांनी संताप व्यक्त केला आहे.



> शेल आदिवासी वाडीवर पिण्याचे दुर्भिक्ष्य कमी व्हावे अशीच मागणी स्थानिक आदिवासी महिला करत आहेत. शेल आदिवासी वाडीवर कंपनीने पाईप टाकले मात्र विहिरीत पाणीच नाही. गावातील पाइपलाइन पण वाडीत आलेली नाही म्हणून पाण्यासाठी जवळ असलेली खाजगी बोअरवेलवर जावे लागते
>
> –कमल काटेकर, माजी सरपंच शेल

## शिवसेना ठाकरे गट उपजिल्हा प्रमुखांकडून टँकरने पाणी पुरवठा

। नेरळ । प्रतिनिधी ।

शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत यांच्या माध्यमातून ४३ ठिकाणी टँकर पाठवून पिण्याचे पाणी पुरविले जात आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत आहे.

या तालुक्यात शासनाच्या वतीने तब्बल ३० गावे वाड्या या ठिकाणी पिण्याचे पाणी टँकरचे साहाय्याने पुरविले जात आहे. त्यानंतर देखील शासनाच्या यादी मध्ये टंचाईग्रस्त गावांच्या यादीत समावेश नसल्याने अनेक गावे वाड्या यांना शासनाचे टँकर पाठवता येत नाहीत.त्या ठिकाणी तसेच भीषण पाणी टंचाई जाणवत असलेल्या ठिकाणी खासगी व्यक्तींकडून पाण्याचे टँकर सुरू आहेत.

शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत यांच्या माध्यमातून ४३ ठिकाणी पाण्याचे टँकर पाठवले जात आहेत. मिरचूलवाडी, बोरीचीवाडी, कळंब कुंभारआळी, दिवाळवाडी, मेंगाळवाडी, टेपाचीवाडी, वडाचीवाडी, पादिरवाडी, चाफेवाडी, पेटारवाडी, काठेवाडी, अंभेरपाडा, ओलमन, झूगरेवाडी, बोडशेत, पेंढरी, कोतवालवाडी, पाचखकवाडी, धनगरवाडा, नवसूचीवाडी, करकुलवाडी, हरयाचीवाडी, जांभूळवाडी, गुढवन, सराईवाडी, खानदपिंगलस, फणसवाडी, भक्ताचीवाडी, मोग्रज, जांभूलवाडी, धामणी, उक्रुल समृध्दी कॉम्प्लेक्स डीकसल, आषणेवाडी, उमरोलीवाडी, खरबाचीवाडी, धोत्रेवाडी, लोभेवाडी, धोत्रे, धारेवाडी, चांधई या ठिकाणी टँकर पाठवले जात आहेत.

# मला इस्त्रोमध्ये शास्त्रज्ञ व्हायचंय

## श्रावणी थळेने व्यक्त केली इच्छा

। चौल । प्रतिनिधी ।

**‘मला इस्त्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेत शास्त्रज्ञ व्हायचं असून, देशाची सेवा करायची आहे’, अशी इच्छा पनवेल तालुक्यातील सीकेटी विद्यालयात इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत ९८.८० टक्के गुण मिळवणाऱ्या श्रावणी अमर थळे या विद्यार्थिनीने व्यक्त केली. नुकताच दहावीचा निकाल लागला असून, त्यामध्ये श्रावणीने उत्तुंग यशाला गवसणी घातली आहे. ‘सतत अभ्यास करत राहा, स्वतःवर विश्वास ठेवा आणि कोणताही तणाव न घेता मोकळ्या मनानं अभ्यास करा, असं श्रावणी सांगते.**

श्रावणी ही मूळची अलिबाग तालुक्यातील पंतनगर येथील रहिवासी असून, तिचे आईवडील नोकरीनिमित्त पनवेल तालुक्यात स्थायिक आहेत. श्रावणीने मिळवलेल्या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून, सीकेटी विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, वर्गशिक्षिका मंजुषा भगत, पर्यवेक्षिका निरजा अधुरी, आई-वडील, आजी आणि आजोबा यांना तिनं यशाचं श्रेय दिले आहे. श्रावणीचे वडील अमर थळे हे मॅक्लोईड फार्मा या औषधनिर्मिती कंपनीमध्ये उच्च पदस्थ अधिकारी असून, आई रिना थळे ह्या सीकेटी विद्यालयामध्ये शिक्षिका आहे. श्रावणीचे आजोबा राम थळे सेवानिवृत्त सरकारी कर्मचारी असून, उत्कृष्ट कबड्डीपटू म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या संघाचेही प्रतिनिधीत्व केले आहे. संपूर्ण कुटुंबाला शैक्षणिक वारसा लाभल्याने त्याचा फायदा मला माझ्या वर्षभराच्या अभ्यासात झाल्याचे श्रावणीने अभिमानाने सांगितले. शाळेतील शिक्षकांनी घेतलेली मेहनत, वेळोवेळी केलेले मार्गदर्शन, आई-पप्पांनी दिलेला पाठिंबा आणि त्या जोडीला नियमित केलेला अभ्यास यामुळेच चांगले गुण मिळवण्यात यशस्वी झाले, असेही श्रावणी म्हणाली. सध्या जेईईची तयारी सुरू असून, भविष्यात इस्त्रोमध्ये शास्त्रज्ञ म्हणून मला काम करुन देशाची सेवा करायची आहे, असेही श्रावणीने सांगितले.



**अलिबागची कन्या पनवेलमध्ये चमकली**

श्रावणी मूळची अलिबाग-पंतनगरची रहिवासी आहे. मेढेखार तिच्या आजोबांचे गाव आहे. तिने मिळवलेल्या उत्तुंग यशामुळे संपूर्ण राज्यासह रायगड जिल्ह्याबरोबरच अलिबाग आणि पनवेल तालुक्याच्या नावलौकिकात भर घातली. श्रावणी उत्कृष्ट भरतनाट्यम् नृत्यांगना असून, आतापर्यंत आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच जिल्हा आणि तालुका पातळीवर विविध पुरस्कार प्राप्त केले आहेत. नृत्य स्पर्धेत ती पुणे विद्यापीठाची सुवर्णपदक विजेती आहे. अभ्यास आणि नृत्य या दोन्हींमध्ये तिने आपल्या मेहनतीने नावलौकिक प्राप्त केला आहे. येत्या १ जून रोजी तिच्या संपूर्ण टीमला अयोध्येला नृत्य सादरीकरणासाठी पाचारण करण्यात आले आहे.

> मेहनत घेण्याची तयारी ठेवा, यश निश्चित मिळेल, असेच मी माझ्या सर्व मित्र-मैत्रिणींना सांगेन. माझ्या यशामागे शिक्षकांचा जसा मोठा वाटा आहे, तसाच माझ्या आई-पप्पांचा आहे. अभ्यासाबरोबरच माझा नृत्याचा सरावही कायमच सुरू होता. आई-पप्पांनी मला कधीच हे कर, ते करु नकोस, असा दबाव टाकला नाही. कायम दोन्ही क्षेत्रात पाठिंबा आणि मोकळीक दिली. म्हणूनच मी जे काही यश संपादन केले, त्याचं श्रेय त्यांना आहे.
>
> – श्रावणी थळे

# सदन शिवाचे कोसळते

हिमालय म्हणजे महादेवाचे वसतिस्थान. माणसांचा उपद्रव नको म्हणून त्या स्मशानयोग्याने दूर हिमालयात मुक्काम ठोकला. पण आता माणसाने त्या जगन्नियंत्यालाही एकटे सोडायचे नाही असे ठरवले आहे. चहूकडून त्याला वेढून टाकले आहे. त्याचे परिणाम सर्वत्र दिसू लागले आहे. १९६२ च्या चिनी आक्रमणाचे वर्णन करताना कवी वसंत बापट यांनी सदन शिवाचे कोसळते असे म्हटले होते. आता वेगळ्या कारणास्तव पुन्हा तेच म्हणण्याची वेळ आलेली आहे. हिमालयातील हिमनद्यांची लांबी-रुंदी झपाट्याने कमी होते आहे. त्यातून उगम पावणाऱ्या नद्यांचे पाणी नाहीसे होऊ लागले आहे. गंगोत्री, यमुनोत्री ही हिमालयातील अतिउंचावरील हिमनद्यांची ठिकाणे आहेत. पण त्यांच्यातील बर्फ एकीकडे वितळून या नद्यांना अकस्मात पूर येतात. मात्र एकुणात या नद्यांचे पाणी कमी होते आहे. काश्मीर, हिमाचल, उत्तर प्रदेशापासून ते बिहार-बंगालपर्यंतचे प्रदेश या नद्यांवर अवलंबून आहेत. भविष्यात त्यांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते. ठिकाणचा उन्हाळा चांगलाच असह्य होऊ लागला आहे. या परिसरातील अनेक ठिकाणी तापमान ३० ते ३५ अंश सेल्सिअस नोंदले जात आहे. या भागातील लोकांना इतक्या कडक चटक्यांची सवय नाही. हिमालयाच्या खाली उत्तर भारतातल्या बहुसंख्य शहरांमध्ये उष्णतेची जी प्रचंड लाट आली आहे त्याचे कारणही तेच आहे. आता माणसाने आपले मार्ग न बदलल्यास पर्यावरणेश्वराचा कोप होण्याची शक्यता आहे. श्री शंकर हा या सृष्टीचा निर्माता आहे. मात्र कोपला तर तोच तिचा संहारही करू शकतो. भारतीय परंपरेमध्ये हे सर्व ज्ञान सांगितलेले आहे. त्याची पोपटपंची इथले अनेक लोक करीत असतात. पण प्रत्यक्षात ते आपले मार्ग बदलायला तयार नाहीत. उलट ते निसर्गाचा अगदी अंत पाहत आहेत. दोन वर्षांपूर्वी जोशीमठ या प्रसिध्द पर्यटनस्थळी जमीन खचली व घरे, हॉटेले खाली गेली. हा त्याचाच परिणाम होता.

### एव्हरेस्टवरची गर्दी

अलिकडे याचीच आणखी एक चुणूक एव्हरेस्टवर दिसली. एव्हरेस्ट किंवा सागरमाथा हे जगातील सर्वात उंच शिखर मानले जाते. उंची ८८४८ मीटर किंवा सुमारे २६ हजार फूट. एकेकाळी एव्हरेस्टवर चढाई करणे म्हणजे अत्युच्च दर्जाचा पराक्रम मानला जाई. ते चित्र आता बदलले. यंदाच्या २१ मे रोजी एव्हरेस्टच्या शिखराजवळ अंतिम टप्प्यातील चढाईसाठी एका क्षणी दोनशे जण रांगेत उभे असल्याचे फोटो नुकतेच सर्वत्र झळकले. शनिवार-रविवारी, अलिबाग किंवा जंजिरा-मुरुडला जशी गर्दी होते तसाच हा प्रकार होता. तिकडे उंच पर्वतावरच्या गिर्यारोहणाला समुद्रकिनाऱ्यांवरच्या पर्यटनाची कळा, किंवा खरे तर, अवकळा यावी हे एकविसाव्या शतकातले दारुण चित्र आहे. गिर्यारोहणासाठीचे उत्तम बूट, बर्फातून बचावासाठी उत्तम पोषाख, बर्फात गाडले जाऊ नये म्हणून उत्तम साधने, ऑक्सिजन पुरवठ्यासाठी हलके सिलिंडर, गिर्यारोहकांच्या मदतीसाठी सदैव सज्ज असणारी हेलिकॉप्टर्स, सॅटेलाईट फोन इत्यादींमुळे एव्हरेस्ट किंवा तत्सम शिखरांवरच्या चढाया तुलनेने सोप्या झाल्या आहेत. गिर्यारोहकांने पुरेशी चिकाटी व सहनशीलता दाखवली तर तो हमखास यश मिळवू शकतो हे दिसून आले आहे. एव्हरेस्टवर चढाईसाठीचा तळाचा पहिला पडाव किंवा बेस कॅम्प नेपाळात आहे. त्यामुळे या चढाई मोहिमांसाठी नेपाळ सरकारकडून परवानग्या दिल्या जातात. त्यासाठी भरपूर पैसे आकारले जातात. त्या सरकारच्या उत्पन्नाचे ते एक महत्त्वाचे साधन आहे. एव्हरेस्टवर चढाईचा दुसरा मार्ग चीनमधून आहे. आणि, चीनचे प्रवासावरचे निर्बंध बरेच आहेत. मात्र यामुळे सर्वांची नजर नेपाळातील तळावरून पुढे झेपावण्याचे असते. नेपाळ सरकारने या व्यवसायात बरीच गुंतवणूकही करून ठेवली आहे. मात्र आता हा धंदा, पैसा आणि कीर्तीची हाव हिमालयाच्या नाजूक पर्यावरणासाठी घातक ठरू लागले आहे. एव्हरेस्टवर गिर्यारोहकांकडून होणारा कचरा साफ करण्यासाठी लक्षावधी रुपयांचा खर्च येत असतो. ऑक्सिजनची संपलेली नळकांडी, खाद्यपदार्थांचे खोके इत्यादी वस्तू इतस्ततः फेकल्या जातात. यंदा विक्रमी ४१९ जणांना एव्हरेस्ट चढाईची परवानगी दिली गेली होती. दरवर्षी ही संख्या झपाट्याने वाढत आहे.

### अहंकार घात करील

एव्हरेस्टसारख्या अप्राप्य कड्याची अशी दुर्दशा झालेली असेल तर बाकीच्या हिमालयाची काय स्थिती असेल याची कल्पना केलेली बरी. तेथील पर्यटन तसेच उंचच उंच शिखरांपर्यंत पोचलेली देवळे, हॉटेले आणि माणसांच्या वस्त्या यामुळे तेथील निसर्ग नष्ट होत आहे. सरासरी तापमान वाढत चालले आहे. काश्मिरात गेल्या काही वर्षांपासून तीव्र उन्हाळा जाणवू लागला आहे. पृथ्वीवरील हा स्वर्ग नरकामध्ये बदलू लागला आहे. तेथील डोंगर उघडेबोडके होऊ लागले आहेत. कधी नव्हे इतकी धूळ सर्वत्र पसरते आहे. त्यातच वर्षाचे बाराही महिने टिकतील असे असंख्य रस्ते करण्यासाठी काश्मीर, हिमाचल प्रदेश व उत्तराखंड येथे जागोजागी डोंगर पोखरले जात आहेत. स्थानिक जनतेच्या विरोधाला काहीही अर्थ उरलेला नाही. विकासाच्या नावाखाली जेसीबी आणि सिमेंटचे सर्वत्र थैमान चालू आहे. वाटेल तसे रस्ते व नवनव्या इमारती बेधडक उभ्या केल्या जात आहेत. दिवाळीच्या काळात अशाच एका रस्त्याच्या कामातील बोगद्यामध्ये काही मजूर अडकले होते. त्या बोगद्याचे काम नियम धाब्यावर बसवून चालू असल्याचे निष्पन्न झाले होते. मात्र त्या कंत्राटदारावर कारवाई केली गेली नाही. उलट त्याच्याकडून सर्व पक्षांना निवडणूक रोख्यांच्या रुपात कोट्यवधींच्या देणग्या दिल्या गेल्याचे उघड झाले. याच कंत्राटदाराला मुंबईतील रस्त्यांचीही कामे दिली गेली आहेत. लोकसभा निवडणुकीचा इतका सर्व प्रचार झाला. मात्र अशा गोष्टींना चाप लावू आणि पर्यावरण रक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊ असे एकाही राजकीय पक्षाने म्हटले नाही. आज निसर्ग अधूनमधून धोक्याचे इशारे देतो. सह्याद्रीचे कडे कोसळून गावे गाडली जातात. किंवा हिमालयात वारंवार ढगफुटीच्या घटना घडतात. पण तरीही आपण सर्वच जण या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करतो. तंत्रज्ञानाच्या जोरावर आपण काहीही करू शकतो असे आपल्याला वाटू लागले आहे. हा अहंकारच आपला काळ ठरू शकतो.

**विचार**

# भारतीय फुटबॉलचा आधारस्तंभ

***बंगळुरू एफसी आणि भारतीय राष्ट्रीय संघासाठी स्ट्राइकर म्हणून खेळणारा सुनिल छेत्री 'कॅप्टन फेंटॅस्टीक' म्हणूनही ओळखला जातो. देशातील तमाम फुटबॉलपटूंसाठी आदर्श ठरलेला हा खेळाडू लवकरच कारकिर्दीतला शेवटचा सामना खेळणार आहे. ३९ वर्षीय सुनिल भारतीय फुटबॉल संघाचा एक महत्त्वाचा भाग राहिला. फुटबॉलपटू म्हणून निवृत्ती जाहीर करणाऱ्या या अव्वल खेळाडूच्या कारकिर्दीचा हा मागोवा.***

जगात भारतीय फूटबॉल संघाचा वरचष्मा असा निर्माण झाला नाही. या खेळात देशाने अव्वल स्थान मिळवले आहे, असेही झाले नाही. क्रिकेट, बॅडमिंटन, टेनिस आदी खेळांना मिळणारे वलय भारतीय फूटबॉलला कधीच मिळाले नाही. आपल्याकडे फुटबॉलबद्दल भरपूर आवड असलेले अनेकजण आढळतील, रात्र-रात्र जागून किंवा एखाद्या सार्वजनिक ठिकाणी स्पर्धेचा जोश अनुभवणारेही सापडतील, मात्र आवर्जून फूटबॉल खेळणारे आणि देशाला या खेळामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर नेणारे खेळाडू तसे विरळच. मात्र तरीही बायचुंग भुतिया किंवा सुनिल छेत्रीसारखे खेळाडू या खेळात आपला ठसा उमटवतात. जागतिक पातळीवर दखल घेतली जावी अशी खेळी ते करतात. त्यांचे नाव सतत कानावर पडत राहते, त्यांच्या कामगिरीची दखल अवघे क्रीडाविश्व घेत असल्याचेही पहायला मिळत राहते, मात्र देशात एका मर्यादेपर्यंतच या खेळाचा प्रसार असल्याने उत्कृष्ट कामगिरी करुनही हे खेळाडू गळ्यातला ताईत वगैरे बनत नाहीत किंवा प्रचंड लोकप्रिय होत नाहीत. अर्थात त्यामुळे त्यांच्या खेळीचे महत्व कमी होत नाही.

माजी कर्णधार आणि अनुभवी स्ट्रायकर बायचुंग भूतियाच्या निवृत्तीनंतर, सुनील छेत्रीने टीम इंडियाच्या खेळाची जबाबदारीही घेतली आणि एकट्याने भारतीय संघाला अनेक सामन्यांमध्ये विजय मिळवून दिला. २००५ मध्ये फुटबॉल क्षेत्रामध्ये पदार्पण करणाऱ्या सुनीलने ६ जूनला होणाऱ्या कोलकतामधील सॉल्ट लेक स्टेडियमवर कुवेत विरुद्ध भारताच्या दुसऱ्या फेरीतील विश्वचषक पात्रता सामन्यामध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळणार असल्याची घोषणा केली. बंगळुरू एफसी आणि भारतीय राष्ट्रीय संघासाठी स्ट्राइकर म्हणून खेळणारा छेत्री 'कॅप्टन फेंटॅस्टीक' म्हणूनही ओळखला जातो. देशातील तमाम फुटबॉलपटूंसाठी आदर्श ठरलेल्या या खेळाडूचा हा शेवटचा सामना असणार आहे. हा ३९ वर्षीय खेळाडू भारतीय फुटबॉल संघाचा एक महत्त्वाचा भाग राहिला. त्याने आतापर्यंत देशासाठी १५० सामन्यांमध्ये ९४ गोल केले असून सर्वोत्कृष्ट फुटबॉलपटू म्हणून तो सध्या चौथ्या स्थानावर आहे. नुकतीच त्याने फुटबॉल कारकीर्दीमधून निवृत्ती जाहीर केली. देशासाठी सर्वाधिक गोल-करणारा अशी ओळख असलेल्या छेत्रीचे संघामध्ये नसणे संघाला जाणवणार आहे, कारण कारकीर्दीच्या शेवटच्या टप्प्यातही संघ त्याच्याच कामगिरीवर अवलंबून आहे, असे दिसते. भारतीय फुटबॉलच्या भविष्यावर बोलताना तो म्हणतो, आता देशावर नवव्या क्रमांकाचा खेळाडू शोधण्याची वेळ आली आहे. सध्या संघामधला एकही खेळाडू मुख्य स्ट्रायकर म्हणून खेळत नाही, हे इथे लक्षात घ्यायला हवे.



**सायली शिगवण**

छेत्रीने २०११ मध्ये एफसी आशियाई चषक स्पर्धेत भाग घेतला होता आणि २०१२ चॅलेंज कप पात्रता स्पर्धेत त्याची राष्ट्रीय संघाचा कर्णधार म्हणून निवड झाली. त्याच्या नेतृत्वाखाली २००८ मध्ये भारताने चॅलेंज कप जिंकला. छेत्रीने २०११, २०१५, २०२१ आणि २०२३ मध्ये सॅफ चॅम्पियनशिप स्पर्धेचे विजेतेपद जिंकून दक्षिण आशियाई फुटबॉलमध्ये भारताला प्रबळ शक्ती म्हणून स्थापित करण्यात मदत केली. तसेच भारताने २००७, २००९ आणि २०१२ असा तीन वेळा नेहरु चषक जिंकला. छेत्री २०१८ आणि २०२३ मध्ये भारताच्या इंटरकॉन्टिनेंटल चषकाचाही एक भाग होता. सक्रिय फुटबॉलपटूंमध्ये ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि लिओनेल मेस्सी यांच्या बरोबरीने सुनील छेत्रीचेही नाव घेतले जाते. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये सर्वाधिक गोल करणारा सुनील छेत्री हा दुसरा आशियाई खेळाडू आहे. या बाबतीत इराणचा अली दाई पहिल्या क्रमांकावर आहे. कर्णधारपदी असताना बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे छेत्रीला भारत सरकारकडून दोनदा सन्मानित करण्यात आले. २०११ मध्ये त्याला पहिल्यांदा अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यानंतर २०२१ मध्ये 'खेलरत्न' हा देशातील सर्वात मोठा क्रीडा सन्मान पुरस्कारही त्याला मिळाला. छेत्रीने २००७, २०११, २०१३, २०१४, २०१७, २०१८-१९ आणि २०२१-२२ या हंगामांमध्ये एकूण सात वेळा प्रतिष्ठित ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनचा 'प्लेयर ऑफ द इयर' हा किताब जिंकला. तसेच २००९, २०१८ आणि २०१९ मध्ये एफपीआय इंडियन प्लेयर ऑफ द इयर पुरस्कार देखील जिंकला. मैदानामध्ये प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम करणाऱ्या कुशल चाली रचणे हे सुनील छेत्रीचे वैशिष्ट्य आहे. त्याचबरोबर त्याचा फिटनेस अनेक खेळाडूंना प्रेरणा देणारा आहे. त्याने नेहमीच फिटनेसकडे लक्ष दिले. कोणत्याही खेळाडूला यशस्वी होण्यासाठी फिटनेस आणि डाएटची शिस्त पाळणे आवश्यक असते, हे त्याने सोदाहरण दाखवून दिले. आपल्या दोन दशकांच्या कारकिर्दीमध्ये छेत्रीने ३६५ क्लब सामन्यांमध्ये १५८ गोल केले. त्याने कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानविरुद्ध जून २००५ मध्ये भारतातर्फे पदार्पण केले आणि पहिल्याच सामन्यात गोल डागला. देशासाठी पहिला सामना खेळण्याच्या आधीचे काही क्षण खूप महत्त्वपूर्ण असतात. तो अनुभव सांगताना सुनील म्हणतो, सामन्याच्या दिवशी सकाळी भारतीय संघाचे पहिले प्रशिक्षक घरी आले आणि ते म्हणाले, या सामन्यात तू खेळणार आहेस. हे ऐकताच तो काहीही विचार न करता जर्सी घालून, परफ्यूम स्प्रे करून निघाला. पदार्पणाच्या सामन्यात ८० व्या मिनिटाला पहिला गोल करण्यापर्यंतचा दिवस तो कदाचित कधीच विसरणार नाही. हा त्याच्या संघाच्या प्रवासातील सर्वोत्तम दिवस. एकीकडे खेळताना असलेला दबाव आणि दुसरीकडे गोल झाल्यानंतर किंवा सामना जिंकल्यानंतर झालेला प्रचंड आनंद यांच्यामध्ये एक अतिशय सुंदर संगम आहे, असे तो सांगतो. त्याने कधीही स्वत:पुरता विचार केला नाही. कायम खेळाचा दर्जा राखण्याचा त्याचा प्रयत्न असायचा. निवृत्ती घेण्याच्या विचारात असताना आतापर्यंतचा जीवनपट त्याच्या डोळ्यांसमोर तरळत होता. प्रत्येक सामना, त्याला आवश्यक प्रशिक्षण देणारे वेगवेगळे प्रशिक्षक, संघ, मैदान, खेळताना झालेल्या चुका या सर्व गोष्टी त्याला आठवू लागल्या.

'माझं मन म्हणतंय मी योग्य निर्णय घेतला आहे, पण माझ्या आतला खेळाडू देशासाठी खेळण्याची एक शेवटची संधी नाकारू शकत नाही.' असेही तो म्हणतो. इथून पुढे राष्ट्रीय संघासोबत घेतलेल्या प्रशिक्षणाचा, शेवटच्या सामन्याचा आनंद त्याला घ्यायचा आहे. त्याच्या कारकिर्दीतला शेवटचा ठरणारा कुवेतविरुद्धचा सामना सोपा नसणार आहे. परंतु, त्याने दडपण घेतलेले नाही. विश्वचषकाच्या तिसऱ्या फेरीसाठी पात्र होण्यासाठी देशाला तीन गुणांची आवश्यकता आहे. भारतीय संघासाठी हे खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे हा शेवटचा सामना छेत्री पूर्ण ताकदीनिशी खेळेल, अशी खात्री चाहत्यांना वाटते. चाहत्यांकडून उदंड प्रेम, आपुलकी आणि कौतुक मिळवणारा फुटबॉलपटू मीच असेन, असेही तो म्हणतो. त्याच्या निवृत्तीनंतर संघातील इतर खेळाडू त्यांची कामगिरी चोख बजावतील. प्रत्येक खेळाडू काही तरी प्रेरणा घेऊनच मैदानावर १०० टक्के योगदान देण्याचा प्रयत्न करत असतो. ती प्रेरणा कधी एखादी व्यक्ती असू शकते किंवा एखादी घटना. सुनीलला फुटबॉल खेळण्याची प्रेरणा देणारी व्यक्ती म्हणजे त्याची आई. सुशीला छेत्री याही एक प्रसिद्ध फुटबॉलपटू होत्या. नेपाळच्या फुटबॉल संघाकडून त्या खेळल्या आहेत. वडील सैन्यदलात असल्यामुळे सतत बदली होत असे. त्यामुळे तो अनेक शाळांमध्ये शिकला. असे असले तरी त्याने फुटबॉलची साथ कधीच सोडली नाही. त्याच बरोबरीने त्याच्या आईनेही त्याला मोलाची साथ दिली. सुनील आणि त्याची बहिण बंदना या दोघांनाही फुटबॉलची गोडी लागली. पण खेळाबरोबर अभ्यासही तितकाच महत्त्वाचा असल्यामुळे खेळ आणि अभ्यास शिस्तीत आणि ठरलेल्या वेळीच व्हावा, अशी आईंची इच्छा होती.

सुनिल छेत्री सांगतो, माझी आईच माझी पहिली कोच आणि पहिली प्रतिस्पर्धी होती. आईला हरलेले अजिबात आवडायचे नाही. त्यामुळे सतत लढण्याचा आणि विजयाला गवसणी घालण्याचा गुण सुनीलमध्ये आईकडूनच आला आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. २०२२ च्या एशिया कप स्पर्धेत त्याने महिला फुटबॉल संघाला प्रशिक्षण दिले. भारतीय क्रिकेट संघाचा फलंदाज विराट कोहलीने सुनील छेत्रीच्या पोस्टवर कमेंट करून 'माझ्या भावा, आम्हाला तुझा अभिमान आहे' असे म्हटले तर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ट्विट केले की तुमची कारकीर्द असामान्यपेक्षा कमी नाही आणि तुम्ही भारतीय फुटबॉल आणि भारतीय खेळांसाठी एक अभूतपूर्व आयकॉन आहात.

**आजकाल**

# मोदींची जादू : कधी नव्हतीच तर चालणार कुठून ?

तथाकथित जागतिक लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या प्रधानमंत्री मोदी यांची २०४७ च्या 'विक्षित भारत' ची राजकीय खेळी आणि भाजपाचे तथाकथित चाणक्य अमित शहा यांचा आत्तापर्यंत यशस्वी झालेला सोशल इंजिनिअरिंग चा सामाजिक डाव मतदानाच्या पहिल्या टप्प्यातच उद्ध्वस्त झाला. याचा आधीच अंदाज असल्याने मोदी आणि शहा यांनी सर्वोच्च न्यायालयाचा आदेश बहुमताच्या जोरावर मोडीत काढून ''निवडणूक आयोग'' ताब्यात घेऊन त्याला कामाला लावले खरे पण या सरकारचे जे नोकरशहा आणि त्यांचे विभाग आहेत त्यांना हेच सरकार पुन्हा सत्तेवर येईल याची आता बिलकूल खात्री राहिली नाही ! तेही त्यांना अडचणीत आणू शकतील अशा फायलींची निरवा-निरव करू लागल्याची चर्चा आहे. न्यायालयात ''मतदानाची प्रत्यक्षातली आकडेवारी देता येणार नाही.'' असे सांगणाऱ्या निवडणूक आयोगाने दोनच दिवसात ती स्वतःहून जाहीर केली याचाही अर्थ तोच आहे .

गृहखाते व आयकर विभागात लागलेल्या आगी या मोदी सरकार कितीही म्हणत असले की '' आम्हीच येणार ''तरी मोदी - शहा या दोन 'गेम मेकर' नेत्यानाही याची खात्री नाही, हेच सिध्द करते. ही नोकरशहा मंडळी धास्तावलेली तर आहेच शिवाय या सरकारने डिव्हिडंड म्हणून जे नुकतेच दोन लाख कोटी... कडून काढून घेतले त्यावरूनही त्यांची ही धास्ती कमालीची वाढलेली आहे असा अंदाज तज्ज्ञ मंडळी व्यक्त करत आहे. मात्र मोदी यांच्या प्रायोजित अशा तब्बल ७१ मुलाखती, मिडीयाची चरणचुंबनाची भूमिका आणि निवडणूक आयोगाचे सरकारप्रती निर्माण झालेले समर्पण यातून ''आयेगा तो मोदीही'' हा ध्वनी पुन्हा उमटू लागला आहे. ''मोदी का जादू चलनेवाला है'' असा मिडीयाचा , समर्थकांचा आणि 'पेड' विश्लेषकांचा जोरदार प्रचार चालू आहे. जनतेत 'निकालाबाबत' संभ्रम निर्माण करून आपल्याला 'हवा तो' निकाल आणायचा असे हे नियोजन आहे, जेणेकरून जनतेमध्ये 'उद्रेक' होऊ नये!

मूलतः देशात आज मोदी-भाजपा विरोधातील वातावरण अत्यंत शिगेला पोहचलेले आहे. २०१९ च्या तुलनेने मतदानाची टक्केवारी कमी झाली आहे हे खरे ! पण ज्या राज्यांमध्ये भाजपाचे सरकार आहे त्याच राज्यांमध्ये ही टक्केवारी कमी झालीय आणि अन्य राज्यांमध्ये ती वाढलेली आहे हे काय दर्शविते? उदा. उत्तर प्रदेश, हरयाणा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आदी ! आज देशात सर्वत्र गर्मीचे थैमान असले तरी ''गर्मी'' हे कारण लागू होत नाही ! हे कारण फार तर भाजपाने वा त्यांच्या समर्थकांनी आत्मसंतुष्टीसाठी मानायला हरकत नाही.

**विजय घोरपडे**

दुसरा मुद्दा येतो तो ''मोदी का जादू'' हा! तर हा मुद्दाच मूळी मिडीया आणि प्रोपोगंडा यातून उभा करण्यात आला आहे. ज्या गुजरातचा विकास मोदीच्या १२/१३ वर्षाच्या काळात कधी झालाच नाही त्याचेही या मिडीयाने जसे ''विकास मॉडेल'' केले तसेच हे ''मोदी का जादू'' चे आहे. गेल्या १० वर्षाचा चिकित्सकपणे आढावा घेतला तर हे कोणालाही पटू शकेल!

२०१४ ला प्रधानमंत्री उमेदवार म्हणून मोदीची ने निवड केली ती केवळ ''गोध्रा कांड'' या मुस्लिम विरोधी दंगलीमुळे ! लालकृष्ण अडवाणी जे बाद झाले ते त्यांनी 'बॅरिस्टर जिना' यांच्या मजारला भेट दिली म्हणून! भाजपाने अखेर 'हिंदुत्वा' चे सरकार आणले ही प्रतिमा त्यांना हवी होती. गेली १०० वर्षे जे स्वप्न ने जोपासले होते ते जनमानसात बिंबविण्यासाठी मोदी तेंव्हा योग्य ठरले. कारण 'गोध्रा कांडा' बरोबरच त्यांना 'गुजरातचा विकास' हाही चिटकविण्यात आला होता. सुमारे २३ कार्पोरेटस त्यांचे 'व्यावसायिक मित्र ' झाले होते . त्यामुळे ज्यांनी ''राम रथ यात्रा'' काढून आणि भाजपाला संजीवनी दिली ते अडवाणी अडगळीत टाकून देण्यात आले. भाजपा २०१४ ला जिंकली ती मोदीमुळे नव्हे तर काँग्रेसचा तत्कालीन नाकर्तेपणा, भ्रष्ट शासन नसले तरी तसा झालेला जोरदार प्रचार आणि अण्णा आंदोलनाचा जनमानसावर उमटलेला ठसा! जोडीला ''अच्छे दिन आयेंगे''चीप्रचारमोहिमहीदुधात पडलेली साखर! बस्स! मोदी यांच्या जादू चा तेंव्हा कुठे मागमूसही नव्हता! हां! 'हिंदुत्व' वाले मात्र तेंव्हापासूनच अशी जादू निर्माण करण्याच्या प्रयत्नाला लागले .कारण जनमानसात मिरवण्यासाठी त्यांना एक ''कट्टर हिंदुत्वा''चा चेहरा मिळाला होता. आणि मिडीयाला त्यांच्या धंद्यासाठी एक आर्थिक आधार! हिंदुत्व वाले तोपर्यंत आपल्या या कट्टरतेची भूक शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या 'रूपा' ने भागवत होते. आणि ती भागवून त्यांना आपल्या दावणीला बांधून ठेवण्यासाठीच भाजपाच्या षडयंत्री नेतृत्वाने बाळासाहेबांना ''हिंदुहृदय सम्राट'' म्हणत महाराष्ट्रात आपले बूड स्थिर करून घेतले. तेंव्हा ३८ वर्षाचे राहूल गांधी कुठेही पिक्चरमध्ये नव्हते.

मोदीच्या 'अच्छे दिन' ला सुरूवात होते कुठे नाही तोच २०१५ ला दिल्लीने अपशकुन केला. तिथे केजरीवाल यांची ''आप'' सत्तेवर आली. मोदीच्या जादूला आच येऊ नये म्हणून मिडीयाने हे अपयश काँग्रेसचे असा प्रचार केला. मोदीला पिक्चरमध्ये आणलेच नाही ! एवढ्या मोठ्या ''मोदी लहर'' मधून दिल्लीत पोहचलेले मोदी खुद्द दिल्लीतच हारले! ज्या जादूचा वा लहरींचा मिडीयाने इतका प्रचार केला ती अवघ्या वर्षात फुस्स झाली. २०१७ च्या फेब्रुवारीत उत्तर प्रदेशात विधान सभा निवडणुका ! त्यापूर्वी २०१६ ला नोटबंदी आणून मोदीने समाजवादी व बी.एस.पी. या बलदंड पक्षांची आर्थिकदृष्ट्या नाकेबंदी केली. तरीही स.पा.ने ५४ जागा तर ब.स.पा.ने १९ जागा जिंकल्या! याही पूर्वी २०१६ मध्ये प.बंगाल मध्ये १९४ जागांसाठी निवडणुका झाल्या. त्या विधानसभा निवडणुकीत मोदी - भाजपाला एकही जागा मिळाली नाही हे आज तरी लक्षात घ्यायला हवे! २०१४ ची मोदी लहर वा जादू कुठे दिसलीच नाही! आता २०१८ मध्ये ज्या मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान या तीन राज्यांमध्ये ज्या निवडणुका झाल्या त्यात जी काँग्रेस कुठेही नव्हती ती चक्क जिंकून आली. हीच अवस्था बिहारची ! तिथेही भाजपा - मोदी पराभूत ! याच इलेक्शन दरम्यान प्रमुख मोहन भागवत यांनी ''आरक्षणा'' वर भाष्य केले होते ! त्यामूळे मिडीयाने ही जी ''मोदी लहर वा मोदी का जादू'' अशी जनतेची दिशाभूल करणारी थिअरी चालविली आहे तीच मूळी बोगस आहे! मोदी लहर वा जादू या देशात कधी नव्हतीच हे खरे वास्तव आहे आणि ते आज २०२४ च्या या सहा टप्प्यातही उघड झाले आहे.

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**३० मे**

**१८७४:-** इतिहास संशोधक, नाणक परिक्षक वासुदेव अनंत बांबर्डेकर यांचा जन्म. ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे त्यांनी 'कोकणच्या इतिहासाची' साधने भाग १, २ या नावाने प्रसिध्द केली. **१८७५ :** वृत्तपत्र, लेखक, टीकाकार आणि संपादक असणारे बापूजी मार्तंड आंबेकर यांचा जन्म १८७५ साली झाला. इंटरमिजिएटपर्यंतचे शिक्षण पुणे व बडोदा येथे झाल्यानंतर काही काळ शाळेत शिक्षक म्हणून काम केले. त्यानंतर आपले मूळ गाव वाई येथे एक इंग्रजी शाळा काढली. त्याचबरोबर वृत्तसार, मकरंदमाला या नियतकालिकातून पुष्कळ लेखन केले.१९०७ च्या सुमारास ते पुण्यात आले. पुण्यात गोखले यांच्या नेमस्त पक्षाच्या ज्ञानप्रकाश पत्राच्या संपादक मंडळावर त्यांची वर्णी लागली तेव्हापासून आयुष्याच्या अखेरपर्यंत ज्ञानप्रकाशाच्या संगोपन संवर्धनातच त्यांनी रस घेतला. विशेष म्हणजे त्यांनी ज्ञानप्रकाशातून विविध विषय हाताळून ते अधिकाधिक लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला. ज्ञानप्रकाशातील काव्य-शास्त्र-विनोद या लोकप्रिय सदरातील बहुतेक मजकूर बापुजीच लिहित असत.ह.ना.आपटे यांचे चरित्र तसेच त्यांच्या आठवणी ही दोन पुस्तके त्यांनी लिहिली. बापूजींच्या लेखनपद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे मुद्देसूदपणा तसेच त्यांची आवेशयुक्त भाषा सुबोध व प्रौढ असे. त्यांची टीका ही मार्मिक तसेच तीक्ष्ण विखारी असे. याची प्रचिती न. चि. केळकरकृत लो. टिळक यांचे चरित्रावरील बापूजींची लो. टिळक जीवनरहस्य या नावाची टीका लेख वाचनमाला वाचताना स्पष्ट दिसून येते. वयाच्या ५९ व्या वर्षी ३० मे १९३४ रोजी पुणे येथे त्यांचे निधन झाले. **१८८३:-** लोकमान्य टिळकांचे ओवीबध्द चरित्र. 'गरुडपुराण' हे राजकीय आशयाचे दीर्घकाव्य आणि काही विडंबनकाव्ये लिहिणारे वैदर्भीय कवी जयकृष्ण केशव उपाध्ये यांचा जन्म. वयाच्या १६व्या वर्षापासून काव्यरचनेला सुरवात. 'पोपटपंची' हा त्यांच्या स्फूट कवितांचा संग्रह प्रसिध्द. विषयांची विविधता, सफाईदार रचना हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्ये. 'बावळट बाळू' या सारख्या विनोदी व विडंबनात्मक कविताही त्यांनी रचल्या. जयदेवाच्या गीतगोविंदच्या धर्तीवर त्यांचे 'गीतराघव' हे काव्यही मनोवेधक आहे. **१८९४:-** गोमंतकातील पहिले हिंदू इतिहास संशोधक असा लौकिक मिळवणारे डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर यांचा जन्म. फ्रेंच, पोर्तुगीज, संस्कृत, कोकणी व मराठी (मोडी लिपीसह) या भाषा त्यांना अवगत होत्या. पणजीच्या अभिलेखागारात सन १९३१ पासून कार्यरत असणाऱ्या पिसुर्लेकरांनी ग्रंथलेखन केले. ते मात्र पोर्तुगीज भाषेत...त्यापैकी काही ग्रंथांचे मराठी व इंग्रजी अनुवाद प्रसिध्द झाले आहेत. 'ल अन्तागिदाद दु क्रिश्नाइ ज्यु' या ग्रंथातून त्यांनी कृष्णसंप्रदाय हा इसवी सना पूर्वीपासून अस्तित्वात होता, हे साधार सिध्द केले होते. **१९१६:-** चित्रकार, राजकीय व्यंगचित्रकार आणि 'दीपावली' मासिकाचे संस्थापक दीनानाथ दामोदर दलाल यांचा जन्म. **१९३४:-** ह. ना. आपटे यांचे चरित्र व त्यांच्या आठवणीफ अशी पुस्तके लिहिणारे 'ज्ञानप्रकाश'च्या संपादक मंडळातील बापूजी मार्तंड आंबेकर यांचे निधन. याशिवाय त्यांनी 'पंचतंत्र', 'हितोपदेश' ह्या ग्रंथातील कथांची सुरस भाषांतरे त्यांनी केली. वृत्तपत्र लेखक, टीकाकार आणि संपादक म्हणूनही त्यांनी नावलौकिक संपादन केला. मंदारमालेतून त्यांनी बऱ्याच कांदबऱ्या लिहिल्या. तसेच भारतवर्षीय नवरत्नामालेतून बरीचशी चरित्रे त्यांनी लिहिली. ज्ञानप्रकाशमधून विविध विषयांवर त्यांनी शेकडो लेख लिहिले. नेमस्त पक्षातील एक झुंझार मराठी पत्रकार असा नावलौकिक त्यांनी संपादन केला. **१९३८:-** लेखिका सुनीती दत्तात्रेय भट यांचा जन्म. 'समर्थ वाणीतील अमृतवेचे-दासबोधपर' या पुस्तकांसह त्यांच्या अनेक कवितांचा समावेश विविध प्रातिनिधिक काव्यसंग्रहातून केला आहे. **१९४८:-** 'स्वप्न एका वाल्याचे', 'काळोख देत हुंकार' आदी २५ नाटके, ४० कथा, ३० कविता, 'महाद्वार', 'फिनिक्स' अशा एकांकिका लिहिणारे दिलीप परदेशी यांचा जन्म. **१९५०:-** प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृतीचे अभ्यासक पुरातत्वज्ञ देवदत्त रामकृ ष्ण षंडारकर यांचे निधन. **१९५५:-** कामगार नेते, पट्टीचे वक्ते, लेखक नारायण मल्हार जोशी यांचे निधन. **२०१०:-** ज्येष्ठ बासरीवादक, स्वरमंडल वादक व संगीत समीक्षक पंडित अरविंद गजेंद्रगडकर यांचे निधन. संगीत व साहित्य या दोन्ही क्षेत्रांमध्ये त्यांचा वावर होता. 'स्वरमंडल' या वाद्याचे स्वतंत्र वादन करणारे ते एकमेव कलाकार होते. गायकीच्या अंगाने बासरीवादन हे त्यांच्या वादनाचे वैशिष्ट्य होते. संगीत समीक्षेबरोबरच त्यांनी संगीतावर आस्वादक लेखनही केले. 'स्वरांच्या बनात', 'स्वरांची स्मरणयात्रा', 'असे सूर अशी माणसं' मिळून २५ एक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयातदाखल असलेल्यारुग्णांच्याएकानातेवाईकालाजेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**सचिन पवार, स्मरणार्थ**


# गुरुकुल अकॅडमीची नेत्रदिपक कामगिरी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

दहावी शाळांत प्रमाणपत्र परीक्षेत गुरुकुल अकॅडमी महाड शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शाळेची १००% निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. दहावीच्या परीक्षेत गुरुकुलचे एकूण ६७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. हे सर्व विद्यार्थी चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाले. यात अनुक्रमे १४ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून शाळेचे नाव उज्वल केले. त्यामध्ये मयूर नाझरे ९६.६०% मिळवून प्रथम, रूची भोसले ९५.६०% मिळवून द्वितीय, ईश्वरी जंगम ९५% मिळवून तृतीय. तसेच, साई कारंडे ९४.२०%, श्रावणी आवटी ९३.४०%, जिया शहा ९३.४०%, पार्थ शिंदे ९३.२०%, आर्यन पाथरे ९१.८०%, तनिष्का खेडेकर ९१.८०%, अवनी जोशी ९१.६०%, आर्यन सावंत ९१.४०%, अथर्व तटकरे ९०.२०%, अर्पिता रेवाळे ९०.२०% व कशिश जागडे ९०% या क्रमाने उत्तीर्ण झाले आहेत.



यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष किशोरभाई धारिया, संचालिका सोनाली धारिया, मुख्याध्यापिका वासंती राजपण सर्व पदाधिकारी, सर्व शिक्षक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी वृंद व पालकांनी अभिनंदन करून विध्यार्थ्यांना पुढील शैक्षणीक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संस्था पदाधिकारी यांनी विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका वासंती राजपण यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांच्या पालकांना निमंत्रित करून त्यांना पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित केले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# विद्यार्थी समुपदेशन कार्यशाळा

**। पनवेल । वार्ताहर ।**

भारत विकास परिषद, रोटरी क्लब ऑफ सेंट्रल व ठकेकर क्लास यांच्या संयुक्त विद्यमानाने विद्यार्थी समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन मंगळवारी (दि.२८) करण्यात आले होते. या कार्यशाळेत ११० विद्यार्थांनी हजेरी लावली होती. तर, अंदाजे ५० पालक, ४० भाविप, रोटरी व ठकेकर क्लासचे कार्यकर्ते सदस्य असे एकूण २०० सदस्य कार्यक्रमात सहभागी झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात आभा जांबेकर व मैत्रेयी कुलकर्णी यांच्या सुस्वर संपूर्ण वंदेमातरम् गीत गायनाने झाली. दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या व्यासपीठावरील आगमनानंतर भाविप अध्यक्षा डॉ. किर्ती समुद्र यांचे प्रास्ताविक, रोटरी क्लब ऑफ सेंट्रलचे अध्यक्ष श्रीयुत रतनजी खरोल यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे डॉ. गिरीश गुणे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

डॉ. शिल्पा परहर यांनी विद्यार्थी दशेतील ताणतणाव व व्यवस्थापन, मनिष गोडबोले यांनी ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया व येणाऱ्या अडचणी, तर अनिल ठकेकर यांनी आजचा विद्यार्थी व आव्हाने या विषयावर विद्यार्थांना उपयुक्त असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला भारत विकास परिषद पश्चिम क्षेत्राचे जॉईंट सेक्रेटरी महेश शर्मा उपस्थिती लाभली.

# सर्वोत्तम निकालाची परंपरा कायम

**। वावोशी । वार्ताहर ।**

खालापूरातील छत्तिशी विभागातील श्री. छत्रपती विद्यालयाने आपली सर्वोत्तम निकालाची परंपरा कायम ठेवत विद्यालयाचा निकाल ९९.०२% लागला आहे. यावर्षी दहावीच्या परीक्षेसाठी एकूण १०३ विद्यार्थी बसलेले होते. त्यापैकी १०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये श्रावणी नारायण मोरे या विद्यार्थिनीने ४५५ (९१.००%) गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर, करुणा रमेश मंदारे हिने ४३५ (८७.००%) गुणासह द्वितीय क्रमांक मिळवला आहे. तसेच, अपूर्वा अरुण मोरे या विद्यार्थिनीने ४३१ (८६.२०%) गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे. त्यामुळे शाळेच्या या कामगिरीबद्दल शाळा सल्लागार समितीचे अध्यक्ष, सर्व सल्लागार यांनी विद्यार्थी व त्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. तसेच, व्ही.ए. ठाकरे, एस.एम मोरे, पी.बी. शेळके यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# महाजने गावाचा शंभर टक्के निकाल

## दहावीतील सर्वच विद्यार्थी चांगल्या गुणांनी उतीर्ण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

दहावीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. अलिबाग तालुक्यातील महाजने गावातील दहावीचे सर्वच विद्यार्थी चांगल्या गुणांनी उतीर्ण झाले. महाजने गावाचा शंभर टक्के निकाल लागला आहे. त्यामुळ या सर्व विद्यार्थ्यांचे महाजने ग्रामस्थ, महिला मंडळाकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

अलिबागमधील डीकेटी हायस्कूलमध्ये शिक्षण घेणारी संस्कृती रुपेश पाटील हीने ८७ टक्के गुण मिळविले. बेलोशी हायस्कूलमध्ये शिक्षण घेणारी खूशी हरिश्चंद्र पारंगे हीने ८३.८० टक्के, मुंबईमध्ये शिक्षण घेणारी मानवी महेश ठाकूर हीने ८३.६० टक्के, बेलोशी हायस्कूलची विद्यार्थीनी श्रावणी कैलास गुंड हीने ८३ टक्के, पारस शशीकांत पाटील याने ७९ टक्के, रेवदंडा हायस्कूलमधील सारा संदीप पारंगे हीने ७४ टक्के, बेलोशी हायस्कूलमधील अनिश अनिल भोनकर याने ६८.८० टक्के, श्रेया निलेश पाटील हीने ६७ टक्के, मानस बाळाराम जाधव याने ६३ टक्के आणि प्रशिक महेश जाधव याने ६० टक्के, तनिष दिपक पारंगे याने ५५ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले.

# आपत्ती व्यवस्थापनाकडून मॉकड्रिल संपन्न

**। रसायनी । वार्ताहर ।**

जिल्हाधिकारी आणि दंडाधिकारी रायगड यांच्या आदेशान्वये रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माध्यमातून खालापूर तालुक्यातील सावरोली ग्रामपंचायत हद्दीतल्या टाटा स्टील कंपनीमध्ये वायू गळती झाल्याची माहिती देण्यात आली. आपत्ती व्यवस्थापनाकडून ही माहिती मिळताक्षणीच तालुका आपत्ती व्यवस्थापन प्रमुख तहसीलदार आयुब तांबोळी,, निवासी तहसीलदार सुधाकर राठोड,



उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांनी तात्काळ सर्व यंत्रणांना वायुगळती झालेल्या ठिकाणी रवाना होण्याचे आदेश दिले. त्यानुसार तालुका पोलीस यंत्रणा, महसूल विभागाचे विविध अधिकारी, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था, टाटा स्टील कंपनीचे अग्निशमनदल आणि सुरक्षा कर्मचारी त्या ठिकाणी दाखल झाले. रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे अधिकारी एम.के. म्हात्रे यांनी तात्काळ प्रतिसाद दिल्याबद्दल सर्व यंत्रणाचे कौतुक केले आणि अशाच पद्धतीने कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी सतर्क राहण्याचे आदेश दिले.

गेल्या काही दिवसात रसायनी, पातळगंगा, डोंबिवली, महाड इत्यादी ठिकाणी घडलेल्या अग्निप्रलय आणि वायूगळतीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर खालापूर तालुक्यातील यंत्रणा किती सतर्क आहेत याचा आढावा घेण्याच्या दृष्टिकोनातून मॉकड्रीलचे आयोजन करण्यात आल्याची माहिती एम.के. म्हात्रे यांनी दिली.

# रोहन गोसावीचा विशेष सन्मान

**। खांब । वार्ताहर ।**

दहाविच्या परीक्षेत आपल्या जिद्द व चिकाटीच्या जोरावर उज्वल यश संपादन केलेल्या रोहन विनायक गोसावी याचे ग्रामस्थ मंडळ नाथपंथीय गोसावी समाज धानकान्हे यांच्यावतीने अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

आपल्यातील जिद्द चिकाटी व आत्मविश्वास यांच्या जोरावर रोहन याने हे सुयश संपादित केले आहे. प्राथमिक शाळेपासून ते हायस्कूल शिक्षणापर्यंत एक अष्टपैलू विद्यार्थी म्हणून रोहन याची विशेष ओळख आहे.रोहनचे वडील ग्रा.पं.कार्यालयात शिपाई पदावर कार्यरत आहेत. तर, आई गृहिणी आहे. प्रतिकूल परिस्थितीत रोहनने हे यश संपादन करून आपल्याला भावी आयुष्यात डॉक्टर बनण्याचे स्वप्न असल्याचे त्यानी सांगितले. तर, ग्रामस्थ मंडळ



व समाजाकडून त्याचा विशेष सन्मान करून त्याला शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी धोंडू कचरे, पांडुरंग गोसावी, दत्ता हळदे, जनार्दन गोसावी, ज्ञानेश्वर तुपकर, विनायक गोसावी व विशाखा गोसावी आदी उपस्थित होते.

# बा.ना. हायस्कुलमध्ये निधी म्हात्रे प्रथम

**। खारेपाट । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील बा.ना. हायस्कुल आवसचा दहावीचा निकाल ९८.६६% लागला असून प्रथम क्रमांक निधी संदिप म्हात्रे ८६.८०%, द्वितीय क्रमांक वैवी जीतेश पाटील ८३.४०%, तृतीय क्रमांक पोर्णिमा अमरेश वाकडे ८२.६०%, तर चतुर्थ क्रमांक शवरी रिविंद्र नाखवा ७९.६०% व पाचवा क्रमांक काजल मोलाई शर्माला ७८.८०% गुण मिळाले आहेत. या विद्यालयातील ७५ विद्यार्थी बसले होते. त्यातुन ७४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १ विद्यार्थी नापास झाला आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन रणजीत राणे, सरपंच अभिलाषा राणे, अभिजीत राणे व संचालक मंडळ, शिक्षकांकडून करण्यात आले.

# स्वा. सावरकर विद्यालयाचा १००% निकाल

**। रसायनी । वार्ताहर ।**

माजी आ. मनोहर भोईर हे संस्थापक अध्यक्ष असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० % लागला आहे. यामध्ये ऋतुजा अरुण राठोड ही प्रथम, साहिल सत्तराम माने हा द्वितीय तर, अश्विनी शिवाजी जाधव ही तिसरी आली आहे. या निकालामुळे सर्व स्थरांतून विद्यालयाचे कौतुक होत आहे. मुख्याध्यापक संतोष म्हात्रे व गुणवंत विद्यार्थी यांनी माजी आ. मनोहर भोईर यांची भेट घेतली,



त्यांनी सर्व विध्यार्थीना पेढे भरवून व भेट वस्तू देऊन अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या

यावेळी नरेश रहाळकर, संतोष ठाकूर, गणेश म्हात्रे, विनोद म्हात्रे, ॲड. नितेश पाटील, ममता पाटील, वीणा तलरेजा, मुमताज भाटकर, सायरा खान, रूपा सिंग व कडू मॅडम यांनीही गुणवंत विध्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# आर्या उभारे ९२ टक्के मिळवून प्रथम

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील विघवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या विघवली हायस्कुलने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली. या हायस्कुलमधून दहावी परीक्षेकरिता एकूण २५ विद्यार्थी बसले होते. हे सर्व विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण होऊन हायस्कुलचा एकूण निकाल १०० टक्के इतका लागून आर्या अविनाश उभारे या विद्यार्थिनीने ९२ टक्के इतके गुण संपादन करून हायस्कुलमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकाविला. मन मंगेश पवार व ओम कार दत्तराम शिंदे या विध्यर्थ्यांनी अनुक्रमे ८८.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला. ग्रामीण भागातील या हायस्कुल शैक्षणिक दर्जा दरवर्षी उंचावून दहावी शालांत परीक्षेचा निकाल नेत्रदीपक असा लागत असल्याने पालक व विद्यार्थी वर्गात आनंदाचे वातवरण आहे.

# निकम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे उज्वल यश

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील इंदापूरएस.एस. निकम इंग्लिश स्कूलने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली असून या शाळेचा एकूण निकाल १०० टक्के इतका लागला आहे. शाळेत गौरी शैलेश शेठ या विद्यार्थिनीने ९५.२०% गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या शाळेमधून निधी राजेश महाडिक ९१.४०% द्वितीय, राज अशोक सांगले ९१.२०% गुण संपादन करून तृतीय क्रमांक, रिया



विजय सांगले ९०.६०% गुण, अवनी किरण मंचेकर ९०.६०% गुण संपादन करून चतुर्थ क्रमांक, अक्षय राजेश निमूणकर याने ८९.८०% गुण संपादन करून पाचवा क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. या शाळेमधून यावर्षी दहावीच्या परीक्षेसाठी २२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी पाच विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुण संपादन करून उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे पदाधिकारी व शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.

# वडके विद्यालयाचा निकाल ९६.२०%

**। खारेपाट । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाचे स.म.वडके विद्यालय चोंढी-किहीमच्या इयत्ता दहावीचा निकाल ९६.२०% लागला असून विद्यालयात प्रथम क्रमांक रोशनी सुरज घरत ९२.८०% गुण मि ळवून प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. तसेच, तृतीय क्रमांक वैष्णवी महेंद्र हुमणे ९४.४०%, तृतीय क्रमांक समृद्धी सचिन खांडेकर ९१.४०%, चतुर्थ क्रमांक पोर्णीमा नामदेव कोळी ९०.८०%, तसेच पाचवा क्रमांक नुपूर महेंद्र पाटील हिने ८९.४०% गुण मिळिवले.या विद्यालयातुन २११ विद्यार्थी बसले होते. यामधून २०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

# एम.बी.पाटील स्कूलचा १००% निकाल

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा येथील एम.बी. पाटील स्कूलने आपल्या उज्वल निकालाची परंपरा कायम राखत याही वर्षाचा एसएससी परीक्षा मार्च २०२४ बोर्ड परीक्षेचा निकाल १००% लावला आहे. या स्कूलचा गेली अनेक वर्ष दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल हा चांगला लागत असल्याने पालकवर्गातून देखील समाधानाची भावना व्यक्त होताना दिसत आहे. तर, चालू वर्षाच्या निकालात या स्कूलमध्ये प्राप्ती मनोज मोरे या



विद्यार्थ्यीनीने ९१.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकावला आहे. तर, द्वितीय क्रमांक नांदगावकर स्वरा नरेश ८७.४०%, तृतीय क्रमांक कांबळे ओम उत्तेश ८६.८०%, चतुर्थ क्रमांक शेळके कुणाल चंद्रकात ८६.००%, तर पंचम क्रमांक भायदे समीर अचल व चौहान सपना संजय ८५.६०% गुण प्राप्त केले आहेत. विद्यार्थी वर्गाच्या या सुयशाबद्दल मधुकर पाटील, पी. देशपांडे, मच्छिंद्र पाटील, पुनम देसाई यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# वाणदे हायस्कूलच्या नियतीचे यश

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातील वाणदे येथील कोएसो संचलित म.ह.दिवेकर हायस्कूलचा शालान्त परीक्षा निकाल ९४.४४ इतका लागला असून नियती नितीन नाक्ती ही विद्यार्थीनी ४१३ (८२.६०टक्के) गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. द्वितीय क्रमांक शालिनी रमेश गायकर ३९३ (७८.६० टक्के), तृतीय क्रमांक नियती अरुण कांबळे ३७० (७४ टक्के), चतुर्थ क्रमांक अथर्व राजू नाक्ती ३६३ (७२.६० टक्के), पंचम क्रमांक वेदांती सुरेश माळी ३५३ (७०.६० टक्के) असे गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.



म.ह. दिवेकर वाणदे हायस्कूल हे ग्रामिण भागातील दर्जेदार शिक्षण देणारे हायस्कूल असून येथे परिसरातील सुमारे १५ गावांतील विध्यार्थी माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेतात. १९८६ मध्ये या हायस्कूलची स्थापना वाणदे गावी झाली आहे. शाळा समिती अध्यक्ष तुकाराम दामोदर पाटील, मुख्याध्यापक समीर जेठारी आणि सर्व स्टाफ उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.३६ पैकी ३४ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याची माहिती तुकाराम पाटील यांनी दिली.

# विवेकानंद स्कूलचे घवघवीत यश

**। वावोशी । वार्ताहर ।**

खालापूरातील छत्तीशी विभागातील विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल वावोशी या सरकार मान्यता प्राप्त शाळेतील विद्यार्थ्यांनी यंदाच्या इयत्ता दहावीच्या वार्षिक परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेमध्ये विद्यालयाचा निकाल १००% लागला आहे. विशेष कौतुकाची बाब म्हणजे ही या शाळेतील पहिलीच दहावीची बॅच आहे आणि पहिल्याच बॅचमध्ये १००% निकाल हा दुध- शर्करा योगच म्हणावा लागेल. या विद्यार्थ्यांमध्ये अंजली विनोद साहू ८१% गुण प्राप्त करून शाळेमध्ये पहिली येण्याचा मान मिळालेला आहे. अंजलीला अनुक्रमे इंग्रजी ८२, हिंदी ७१, मराठी ८६, विज्ञान आणि तंत्रज्ञान ७६, गणित ८४ आणि सामाजिकशास्त्रे ७८ असे गुण मिळाले आहेत. यापरीक्षेत




अंजलीबरोबरच दिक्षा राजू यादव, तनिष्का सचिन मार्तंडे, आकांक्षा संतोष वर्मा आणि गौरव प्रसाद मनवे या विद्यार्थ्यांनीही चांगल्या गुणांनी यश संपादन केले आहे. या कौतुकास्पद यशासाठी शाळेचे विद्यार्थी, मुख्याध्यापिका मानसी पाटील आणि त्यांच्या सहशिक्षिका यांच्यावर सामाजिक, राजकीय तसेच शैक्षणिक क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी मात्र यशाचे सर्व श्रेय संस्था, संस्थेचे सर्व पदाधिकारी, दहावीला शिकवणारा शिक्षक वर्ग यांना देत स्वतःचा मोठेपणा दाखवला आहे. त्याचबरोबर शिक्षकांवर विश्वास दाखवून मेहनतीने यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे आणि पहिली दहावीची बॅच असूनही शाळेवर दाखवलेल्या विश्वासाबद्दल पालकांचे देखील विशेष कौतुक केले आहे.

# वांगणी हायस्कुलचा १०० टक्के निकाल

**। सुकेळी । वार्ताहर ।**

नागोठणे जवळच असलेल्या सु.ए.सो. माध्यमिक विद्यालय वांगणी या हायस्कुलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला असुन वांगणी हायस्कुलच्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान निकालाची परंपरा कायम ठेवत आपल्या शाळेचे नाव उज्वल केले आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने दहावीच्या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. सोमवारी (दि.२७) दुपारी एक वाजता दहावीच्या परिक्षेचा निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहीर केला. यामध्ये नागोठणे जवळील वांगणी हायस्कूलचा १०० टक्के निकाल लागला असुन यामध्ये विनय शिद याने ८९ टक्के गुण मिळवत शाळममध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. तर, तन्वी तेलंगे हिने ८२.६० टक्के तसेच पुजा वारगुडे हिने ८१.४० टक्के गुण मिळवत अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळविला.

# श्रीमती भागूबाई विद्यालयाचे घवघवीत यश

**। उरण । वार्ताहर ।**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रीमती भागूबाई चांगु ठाकूर विद्यालयाचा इयत्ता दहावीचा १००% निकाल लागला आहे. एकूण ७६ विद्यार्थ्यांपैकी ४४ विद्यार्थी विशेष प्रावीण्य मिळवून, २९ प्रथम श्रेणीत तर ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्याने या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला.




यावेळी श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयातील विद्यार्थी आस्था प्रताप मोकाशी ९५% प्रथम, सारा विजय भगत ९२ % द्वितीय, पायल अनिल घरत व आर्जु निहालासिंग पटेल या दोघांनी ८८.८०% गुण मिळवत तृतीय स्थान पटकावले आहे.

# युईएस इंग्लिश मिडियम स्कूलचा १०० टक्के निकाल

**। उरण । वार्ताहर ।**

या वर्षी जाहिर झालेल्या दहावीच्या निकालात यु.ई.एस. इंग्लिश मिडियम स्कूलचा १०० टक्के निकाल लागला असून, कोशे मुग्धा अमोल हिने ९४.४० टक्के मिळवून पहिला क्रमांक मिळविला. काठे पलक विलास हिने ९४.२० टक्के मिळवून दुसरा क्रमांक मिळविला, तर धुमाळ श्रेयस गिरीष आणि कुमारी म्हात्रे श्रृती समीर या दोघांनी ९३.४० टक्के मिळवून तिसरा क्रमांक मिळविला. तसेच, कांबळे रोनक राजेश याने ९३.२० टक्के मिळवून चौथा क्रमांक व कुमार पाटील अर्चित रामकृष्ण याने ९२.४० टक्के मिळवून पाचवा क्रमांक मिळविला.

यंदाचा १०० टक्के निकाल, हा केवळ संख्यात्मक नसून तो गुणात्मक व उल्लेखनियही आहे. म्हणूनच यु.ई.एस.च्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## निवडक

### मोहाची फळे बाजारात

**पाली :** समृद्ध नैसर्गिक ठेवा लाभलेल्या रायगड जिल्ह्यात विविध प्रकारची झाडे आणि वनस्पती आहेत. यातील रानभाज्या व विविध फळांची भाजी त्या-त्या हंगामात अधिक लोकप्रिय आहे. सध्या मोहाची फळे बाजारात विक्रीसाठी आलेली आहेत. मोहाच्या फळापासून रुचकर व स्वादिष्ट भाजी बनविली जाते. त्यामुळे हि फळे खरेदी करण्यासाठी खवय्यांच्या उड्या पडत आहेत. आदिवासींनादेखिल हि फळे विकून चार पैसे हाती येत आहेत.

### रानडे हायस्कूल थळचे यश

**अलिबाग :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल २७ मे रोजी जाहीर करण्यात आला. त्यामध्ये अलिबाग तालुक्यातील को.ए.सो.कै.वा.ग.रानडे हायस्कूल थळचा निकाल ९३.०३ टक्के लागला. शिव पाटील ८९.८० टक्के मिळवून प्रथम, पूर्वा केमकर ८५.४० टक्के द्वितीय, सई वर्तक ८३.६० टक्के तृतीय, श्रेय भाभी ८३.४० टक्के चतुर्थ आणि स्मित म्हात्रे ७६.४० टक्के पाचवा क्रमांक मिळवला.

### राधाकृष्ण मंदिर शताब्दी

**तळा :** तळा तालुक्यातील रहाटाड कोळीवाडा येथे राधाकृष्ण मंदिर शताब्दी महोत्सवी वर्धापनदिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. सोमवार २७ मे व मंगळवार २८ मे असे दोन दिवस या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.राधाकृष्ण मंदिराच्या वर्धापनदिनाचे यावर्षी शंभरावे वर्ष असल्याने रहाटाड कोळीवाडा ग्रामस्थ व मुंबई मंडळांतर्फे देदीप्यमान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवासाठी मुंबईकर मंडळ मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित राहिले होते.

### वडगांव ग्रामपंचायत अव्वल

**रसायनी :** रसायनी पाताळगंगा वसाहतीतील वडगांव ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा ४.० या अभियानांतर्गत केलेल्या जनजागृतीची सर्वत्र चर्चा असून शासन दरबारीही ग्रामपंचायतीच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे. या ग्रामपंचायतीने कोकणातून अव्वल येण्याचा मान पटकावला असून शासनाने ७५ लाखाचे पारितोषिक देवून कोकणात प्रथम क्रमांकाने पटकावले आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने वडगांव ग्रामपंचायत हद्दीमध्ये व्यवस्थापन करण्यात आले.

### पोशीरचे तरुण मनसेत

**नेरळ :** पोशीर गावातील कार्यकर्त्यांनी मनसेमध्ये प्रवेश केला. जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांचा कार्यालयात झालेल्या पक्ष प्रवेश सोहळ्यात मनसेचे कर्जत तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते. पोशीर गावातील आकुल शिंगटे, मनोज शिंगटे, संतोष शिंगटे, जीवन राणे या तरुण कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत पक्ष प्रवेश केला. यावेळी महेंद्र निगुडकर,समीर चव्हाण, हेमंत चव्हाण, सुभाष नाईक, स्वप्नील शेळके, प्रवीण राणे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# निजामपूर पाणी योजना कागदावर!

## ■ २८ कोटी खर्चातून उभारण्यात येणाऱ्या पाणी योजनेसाठी पुढचं पाऊल कधी

। माणगाव । वार्ताहर ।

**गेले अनेक वर्षापासून निजामपूर जिल्हा परिषद गटातील, कडापे, निजामपूर व कोस्ते खुर्द ग्रामपंचायत, हद्दीतील अनेक गावे पिण्याच्या मुबलक व स्वच्छ पाण्याच्या प्रतीक्षेत होते. दरवर्षी ही गावे वर्षोनुवर्षे शासनाच्या पाणी टंचाई आराखड्यात कोरलेली होती. या तीनही गावाच्या जवळून काळनदी वाहते. मात्र या नदीवर शासनाने बंधारा उभा केला असता तर या गावांना पाणी टंचाईच्या झळा पोहचल्याच नसत्या.**



या गावांना विशेषतः उन्हाळ्यात पाणी टंचाईशी सामना करावा लागत होता. निजामपूर हे गाव वर्षोनुवर्षे पाणीटंचाईग्रस्त म्हणून शासन दरबारी नोंदले गेले आहे. या या गावाचा कायमचा पाणी प्रश्न मिटावा यासाठी निजाम पूर ग्रामपंचायतचे माजी सरपंच व निजामपूर, कडापे, कोस्ते खु. मधील ग्रामस्थांनी योजना मंजूर करून घेतली. सुरुवातीला १४ कोटी रुपये मंजूर झाले होते. मात्र हा निधी अपुरा पडत असल्याने त्यात दुरुस्त्या व वाढ करून पुन्हा या योजनेच्या निधीत वाढ करून २८ कोटी रुपये मंजूर करून घेतली त्यानंतरही या योजनेचे काम अद्यापही झाले नसल्याने ही योजना कागदावरच राहिली आहे. ही योजना पूर्ण करण्यासाठी शासन कधी पुढचं पाऊल टाकणार हा संशोधनाचा विषय बनला आहे.

तांत्रिक मुद्दे लक्षात घेता पुन्हा या निधीत वाढ करून आणखी १४ कोटी रुपये असे एकूण २८ कोटी रुपये मंजूर केले. त्यामुळे निजामपूर कायमचे पाणी टंचाई 'मुक्त' होणार आहे. विळे भागाड एमआयडीसीतील दूषित पाण्याच्या विसर्गामुळे निजामपूर, कडापे, कोस्ते खुर्द ह्या ग्रामपंचायती वर्षानुवर्षे बाधित होत होत्या. या ग्रामपंचायतीमधील नागरिकांनी शासन दरबारी प्रयत्न करून देखील न्याय मिळत नव्हता.

कडापे ग्रामपंचायत, निजामपूर ग्राम पंचायत, कोस्ते खुर्द ग्रामपंचायत या तीनही ग्रामपंचायतीतील गावांना एकटीएमसी पाणी उपलब्ध करून त्यास आवश्यक असणाऱ्या पाणी पुरवठा जल वाहिन्यासाठी सुरवातीला १४ कोटी रुपये मंजूर केले होते. ही पाणीपुरवठा योजना करताना अनेक तांत्रिक बाबी पुढे येत असल्याने हा निधी अपुरा पडू नये म्हणून पुन्हा वाढीव निधी मंजूर करून २८ कोटीचा भरघोस निधी दिला आहे. त्यामुळे हे काम नजीकच्या काळात सुरु होइल अशी आशा नागरिकांना वाटत होती. मात्र उन्हाळा संपला तरी या योजनेचे काम सुरू झाली नसल्याने नागरिकांपुढे प्रश्नचिन्ह उभारले आहे. त्यामुळे निजामपूर ग्रामपंचायत ही टंचाईग्रस्त आराखड्यातून यंदाच्या वर्षी ही मुक्त झालीच नाही. योजना पूर्ण झाल्यास नवीन पाणी योजनेतून तीनही ग्रामपंचायतींना शुद्ध व मुबलक पाणी मिळेल अशी आशा वाटत आहे. निजामपूर ग्राम पंचायतीची भीषण पाणीटंचाई दूर झाल्यास या भागाचा विकास होणार असल्याने नागरिकांच्या आशा आता पल्लवित झाल्या आहेत. पाणी टंचाई आराखड्यात ही गावे असल्याने या गावात व परिसरात व्यापारी, उद्योजक, गुंतवणुकदार, पर्यटक, व्यावसायिक यांनी या गावाकडे पाठ फिरवली होती. विशेषतः जवाहर नवोदय विद्यालय, ग. रा. मेथा माध्यमिक विद्यालय, तलाठी, मंडळ निरीक्षक, शासकीय निमशासकीय अशी कार्यालये असून विद्यार्थी व परिसरातील नागरिक या ठिकाणी दैनंदिन कामासाठी मोठ्या प्रमाणात येतात. त्यामुळे पाण्याच्या दुर्भाक्षामुळे यांची कुचंबणा होत होती. रवाळजे येथील बारमाही पाणी निजामपूर, कोस्ते खुर्द, कडापे ग्रामपंचायतीला मिळणार असल्याने नागरिकांच्या भुवया आता उंचावल्या असल्या तरी ही योजना पूर्ण करण्यासाठी शासन पुढचं पाऊल कधी टाकणार याकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहे.

# दुरुस्तीसाठी नेरळ फाटक बंद

। नेरळ । प्रतिनिधी ।




नेरळ येथील रेल्वे फाटक दुरुस्तीच्या कामासाठी बंद आहे. याच काळात चिंचवली येथील रेल्वे फाटक देखील दुरुस्तीच्या कामासाठी बंद ठेवण्यात आल्याने वाहन चालकांना प्रवास दूरवरून सुरू आहे.

मध्य रेल्वेचे मेन लाईनवर रेल्वेकडून दुरुस्तीची कामे सुरू आहेत.त्यात रेल्वे फाटकामध्ये असलेली जुनी खडी काढून त्यावर नवीन खडी टाकून पुन्हा तो परिसर मजबूत करण्याचा प्रयत्न रेल्वेकडून सुरू आहे. नेरळ कर्जत दरम्यान एकच वेळी दोन रेल्वे फाटक येथे दुरुस्तीचे काम रेल्वेकडून सुरू आहे. त्यातील भिवपुरी रोड रेल्वे स्थानक भागातील चिंचवली गावाजवळ असलेले फाटक क्रमांक २३ हे २८ मे पासून वाहतुकीसाठी बंद आहेत.२८ मे ते ३१ मे या कालावधीत चिंचवली फाटक बंद आहे.त्यात भर नेरळ येथील प्रचंड रहदारी असलेले फाटक क्रमांक २१ हे रात्री पासून बंद ठेवण्यात आले आहे.नेरळ फाटक वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचे असून फाटक बंद झाल्यावर दोन तीन मिनिटात वाहनांची रांग किमान ५०० मिटर लांबपर्यंत जात असते. या फाटकातून दुरुस्तीचे काम २८ मे पासून २ जूनपर्यंत चालणार आहे.

या काळात वाहनांना आपल्या निश्चितस्थळी जाण्यासाठी नेरळ फाटक बंद असल्याने अन्य मार्गाने जावे लागणार आहे. त्यात दामत येथील फाटक २० आणि आंबिवली येथील फाटक २२ यांचा वापर करावा लागणार आहे. मात्र नेरळ फाटक पासून आंबिवली फाटक यातील रस्ते मार्गाचे अंतर हे किमान ८ किलोमीटर आहे तर नेरळ फाटक येथून दामत फाटक हे तीन किलोमीटर अंतरावर आहे.नेरळ फाटक बंद असल्याने वाहनचालक यांना दामत किंवा आंबिवली फाटक येथून जावे लागत असल्याने मोठा फेरा मारावा लागत आहे.

त्यात बाहेरून येणाऱ्या वाहन चालक यांना नेरळ फाटक बंद असल्याची माहिती नसल्याने वाहनचालक यांना पुन्हा पर्यायी फाटक यांचा वापर करण्यासाठी परत जावे लागत आहे.त्यात बोर्ले येथून जाणारा पेशवाई रस्ता याची दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे वाहन चालकांना कर्जतकडे जाण्यासाठी कसरत करावी लागत आहे.

# फणसाड धरणाने गाठला तळ

। रेवदंडा। वार्ताहर ।




फणसाड धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्याने मुरूड तालुक्यातील भोईघर, बोर्ली, मांडळा, कोर्लई, बारशीव आदीसह २८ गावातील ग्राम स्थांची पाण्यासाठी वणवण सुरू झाली आहे. सद्यस्थितीत बोर्ली-मांडळा या ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या गावांना फणसाड धरणातून पंपाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

मुरूड गटविकास अधिकारी यांच्यासह बोर्ली ग्रामपंचायत सरपंच सपना जायपाटील, राजू भोईर, भारत मोती व सहकारी हे फणसाड धरणावर जातीने उपस्थित राहून फणसाड धरणाच्या पाण्याच्या पातळीची पहाणी केली.

फणसाड धरणातील पाणी पुरवठा भोईघरसह २८ गावाना गेले अनेक वर्ष होत आहे. परंतु, एप्रिल, मे महिन्यात पाण्याची पातळी कमी होत असल्याने पाणी पुरवठा करण्यास अडचणीचे ठरत आहे. फणसाड धरणाचे पाणी २८ गावाना मुबलक पुरवठा होत असे परंतु, वाढलेली लोकसंख्या, तसेच मुरूड तालुका पर्यटनक्षेत्र म्हणून प्रसिध्दीस आल्याने येथे हजारो पर्यटक येतात परिणामी फणसाड धरणातील पाण्याचा खप मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे एप्रिल व मे महिन्यात पाण्याची पातळी फारच कमी होते. त्यामुळे पाणी पुरवठा करण्यास समस्या निर्माण होते असे येथील बेलवाडी ग्रामस्थ जीवन काजारे यांनी माहिती दिली.

### रायगड जिल्ह्यात फायरप्लेसची क्रेझ

**पाली :** निसर्गाच्या सानिध्यात राहण्यासाठी पाली सुधागड सह जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात फार्महाऊस विकसित झाले आहेत. येथे आकर्षक घराबरोबर बगीचा व सुशोभीकरण यावर अधिक भर दिला जातो. तसेच रात्रीच्या वेळी आग पेटवून निवांत बसण्यासाठी तसेच मासे, चिकन भाजण्यासाठी आणि शेकोटी व पोपटीसाठी विशेष जागेला पसंती दिली जाते. यासाठी विशेष फायरप्लेस बनविण्याला मागणी आहे. आकर्षक व शास्त्रशुद्ध पद्धतीने बनविलेली फायरप्लेस अनेक फार्महाऊसवर दिसत आहे.

# करंजाडे रहिवाशांना दिड कोटीचा पाणी खर्च

। पनवेल । वार्ताहर ।

सिडकोकडे जबाबदारी असलेल्या करंजाडे येथे भीषण पाणीटंचाई आहे. लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष, सिडको अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणा यामुळे करंजाडे शहरात अपुरा पाणीपुरवठा होता. मागील वर्षभरात शहरातील २०० रहिवाशी सोसायट्यांना खासगी टँकर खरेदी करून तहान भागविण्यासाठी तब्बल दीड कोटी रूपयांचा खर्च आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

शहरांचे नियोजन करून शहरांची निर्मिती करणाऱ्या सिडकोला नागरिकांना पायाभूत आणि मुलभूत सुविधा देण्यास पूर्णपणे अपयश आल्याचे पनवेल महापालिकेच्या स्थापनेनंतर अधोरेखित झाले. पनवेल शहराला लागून असलेल्या परंतु सिडको प्रशासनाच्या अखत्यारित असलेल्या करंजाडे शहरातील नागरिकांचा पाणीप्रश्न मागील अनेक वर्षे रखडलेला आहे. करंजाडे शहरात अनेक सेक्टरमध्ये अत्यंत कमी दाबाने पाणी येते. नळाला सिडकोचे पाणी येत नसल्यामुळे नागरिकांना टँकरने पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी सिडकोची आहे. परंतु नागरिकांना २ हजार रूपये दराने पाणी खरेदी करावे लागते. पाण्यासाठी सोसायट्यांचे किती पैसे गेले याची माहिती मिळावी म्हणून इथल्या काही नागरिकांना गुगलवर लिंक तयार करून सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांना दिली.

### सिडको अधिकाऱ्यांचे हात ओले

**लोकप्रतिनिधींचा कोणताही अंकुश नसलेल्या सिडकोच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकारी आणि टँकरमाफियांचे यामध्ये साटेलोटे असल्याची शंका नागरिकांनी व्यक्त केली आहे. वर्षाला दीड कोटींचा व्यवहार होत असेल तर स्थानिक टँकर माफियांसोबत सिडको अधिकाऱ्यांचे हात ओले होत असल्याचे सांगितले जाते. सोसायटींना पाणी पुरवून सिडकोच्या सर्व थरातील अधिकाऱ्यांना दरमहा वेगळा पुरवठा केला जात असल्याची दावा येथील नागरिक दबक्या आवाजात करीत आहेत.**

सोसायटीला पाणीखर्च किती होतो, सिडकोकडून येणाऱ्या पाण्यात समाधानी आहात का, वर्षाला टँकर खरेदीसाठी किती खर्च झाला असे सर्वेक्षण केले. या लिंकवर जमा झालेल्या माहितीने करंजाडेतील नागरिकांना धक्का बसला आहे. २०० सोसायट्यांनी दिलेल्या माहिती तब्बल १ कोटी ५० लाख ७६ हजार रूपये टँकरसाठी खर्च झाल्याचे या सर्वेक्षणात पुढे आले आहे. विशेष म्हणजे करंजाडेत ५०० पेक्षा जास्त सोसायटी आहेत. सर्वे सोसायट्यांची माहिती मिळाल्यास हा आकडा अधिक वाढू शकतो.

# उत्पादकता वाढविण्याकरिता बीजप्रक्रिया करणे आवश्यक

। पोलादपूर । वार्ताहर ।

पारंपरिक पीक पध्दतीचा अवलंब न करता आधुनिक पध्दतीचा वापर करून शेती करणे गरजेचे असुन उत्पादन आणि उत्पादकता वाढवायचे असेल तर बीज प्रक्रिया करुन बियाण्यांची पेरणी करावी, असा सल्ला कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी शेतकऱ्यांना दिला आहे.

पोलादपूर तालुक्यातील कोतवाल बुद्रुक येथे कालकाई सभागृहामध्ये सरपंच रेखा दळवी यांचे अध्यक्षतेखाली खरीप पूर्व सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपसरपंच राजेश कदम, पोलीस पाटील श्रीधर जाधव, ग्रामरोजगार सेवक संतोष सकपाळ, कृषी मित्र गिरीधर दरेकर, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, कृषी सहाय्यक मनोज जाधव व शेतकरी उपस्थित होते.

सर्व शेतकऱ्यांनी बियाणांची पेरणी करण्यापूर्वी घरी बीज प्रक्रिया करुनच पेरणी करावी, असे मनोज जाधव यांनी मार्गदर्शन केले.

# पोलादपूर शहरातील नालेसफाईला गती

। पोलादपूर । वार्ताहर ।

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या आदर्श आचारसंहितेच्या शिथिलीकरणाची वाट बघत न बसता पोलादपूर शहरातील नालेसफाई आणि गटार बांधकामांना गती देऊन नगरपंचायतीने पावसाळयापुर्वीच्या कामांबाबत सतर्कतेने सक्रियता दर्शविण्यास सुरूवात केली आहे.

पोलादपूर शहरातील गाडीतळ, मटन, मच्छीमार्केट, शिवाजीनगर, मोहल्ला, सिध्देश्वरआळी, सिध्देश्वर शंकरमंदिर, मराठी प्राथमिक शाळा, श्रीदेवी गंगामाता मंदिर, पिंपळपार मारूती, गणेशमंदिरासमोरील घाट, जुना महाबळेश्वर रस्त्यावरील जुनी बाजारपेठ, स्मशानभूमी, प्रभातनगर पूर्वेकडील बाजू, आंबेडकर नगर, रोहिदासनगर, ग्रामीण रूग्णालयाची कर्मचारी वसाहत, हनुमानगर तसेच चरई पुलासमोरील रस्ता अशा ठिकाणी शहरातील सांडपाणी अतिवृष्टीदरम्यान निर्माण होणाऱ्या पुरस्थितीमध्ये गटारांमध्ये येऊन सावित्री नदीपात्रामध्ये मिळत असते. मात्र, या गटारांमध्ये उतार नसल्यास शहरातील रस्त्यांवर सांडपाण्याची डबकी तयार होऊन निचरा होण्यास अडथळा निर्माण होत असल्याने पोलादपूर नगरपंचायतीने यंदा मे



महिन्याअखेरीस नालेसफाईची कामे हाती घेऊन दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा आणि नवीन अपार्टमेंटसची वाढती संख्या लक्षात घेता पोलादपूर नगरपंचायतीकडून सुक्या आणि ओल्या कचऱ्याचे नियोजन करताना खासगी कंत्राटदारांकडून कचरा संकलन करण्यात येत असून खासगी कंत्राटदाराच्या तसेच नगरपंचायतीच्या सफाई कामगारांकडून शहरातील स्वच्छतादेखील हाती घेण्यात आली आहे. पोलादपूर शहरातील शौचालयांच्या सांडपाण्याच्या टाक्यांचा उपसा करण्यासाठी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नसल्याने हे काम महाडमधील काही गाड्यांकडून उपसा करून घेण्यापर्यंत मर्यादित आहे. गटारांलगतचे गवत व तण उपटण्यासाठीदेखील खासगी कंत्राटदाराचे कर्मचारी कार्यरत आहेत.

# हजारो रुग्णांना फिरत्या दवाखान्याचा आधार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाजनेसह अनेक गावांतील हजारो रुग्णांना फिरत्या दवाखान्याचा आधार मिळाला आहे. गेल इंडिया कंपनीच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीतून राबविलेल्या या उपक्रमाला गावे, वाड्यांतील नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

अलिबाग तालुक्यातील गेल इंडिया कंपनीमार्फत महाजने, बेलोशी, वावे, वळवली, घोटवडे, उसर, खानाव परिसरातील अनेक गावे, वाडयांमधील गोरगरीबांसाठी फिरता दवाखाना सुरु करण्यात आला आहे. गेल्या सव्वा वर्षापासून हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमांतून अनेक गावांतील गरीब रुग्णांच्या आरोग्याची प्राथमिक स्तरावर काळजी घेण्याचे काम फिरत्या दवाखान्यातून होत आहे. दर दिवशी वेगवेगळ्या गावांना भेटी देऊन तेथील रुग्णांची समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न रुग्णवाहिकेतील डॉक्टर व परिचारिकांमार्फत केला जात आहे. २०२३पासून सुरु केलेल्या या उपक्रमाला गावागावातून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय२५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- बजाज शोरूम अलिबागमध्ये कामासाठी (टू व्हिलर) मेकॅनिक पाहिजे संपर्क : प्रबोध राऊत ९७०२४५९१५१ बजाज शोरूम बायपास रोड अलिबाग
- अकाउंटट पाहिजे B.com ,Tally ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार- ८००० महिना संपर्क : ९८२३५८५३२१
- अलिबाग फार्म मध्ये येऊन फार्म हाऊससाठी दिवसभर स्त्री अथवा पुरूष कामगार पाहिजे. संपर्क : ९४२३८९०२९५
- अलिबागमधील दुकानात कामासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. संपर्क : ८४२१३५४६४०
- जय गजानन सोसायटी चेंढरे-अलिबाग 1BHK फ्लॅट नं. २०२ भाड्याने देणे आहे. मो.नं. ८०८००५८३७५
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. रिसेप्शन, २. लोकल जेवण बनवण्यासाठी हॉटेल लेडीज स्टाफची आवश्यकता आहे. शिफ्ट टाइमिंग दुपारी २ ते रात्री ११, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसअॅप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- Shop near alibag ST Stand is for sale 9764548679
- Autocad draftsman required in architectural firm. Location :Alibag Comtact no:9970391697

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रामेश्वर येथील पुरातन विहीर झाली पुनरुज्जीवित

*। सुधागड-पाली । वार्ताहर ।*

***सुधागड तालुक्यातील वरचा रामेश्वर येथील जवळपास शंभर वर्षे जमिनीखाली गाडली गेलेली ऐतिहासिक पुरातन विहीर पुनरुज्जीवित करण्यात आली आहे. निसर्गमित्र पनवेल तर्फे शुक्रवार (दि .२४) पासून तीन दिवस ही मोहीम राबविण्यात आली असून यावेळी, निसर्ग व पुरातन वास्तूसंवर्धन सुद्धा करण्यात आले.***





*सुधागड तालुक्यातील उद्धर येथील पुरातन वरचे रामेश्वर मंदिर हे प्राचीन मंदिर आहे. मंदिरावरील शिलालेख पाहता या मंदिराची बांधणी १६६४ सालची आहे. मंदिरासमोरील एक विहीर गाळाने पूर्ण भरलेली होती. गावातील ज्येष्ठांनीदेखील ही विहीर गाळाने बुजलेलीच पाहिली आहे.*

*निसर्ग मित्र संस्थेच्या वार्षिक श्रमदानात ही विहीर पुनरुज्जीवित करण्याचे ठरवले. या मोहिमेचे नेतृत्व सचिन शिंदे व प्रिसिलिया मदन यांनी केले.*

*निसर्ग मित्र संस्थेचे धनंजय मदन यांनी सांगितले की, पाण्याचा प्रश्न जटील होत आहे व भूगर्भातील पाणी आटत चालल्याने त्यावर उपाय म्हणून तरुणांनी समाजाला दिशा दाखविण्याचा हा एक छोटासा प्रयत्न म्हणून याकडे पाहता येईल. सहभागी मुलांना त्यांच्या शारीरिक व मानसिक क्षमतांचा आवाक्याचा त्यांना साक्षात्कार झाला असेल आणि त्यातून त्यांचा आत्मविश्वास दुणावला असेल. मुलांवर दृश्य सकारात्मक संस्कार व्हावेत हा त्यामागचा हेतू होता.*

### निसर्ग व वृक्ष संवर्धन

***या मोहिमेत देवळाच्या परिसरात बहावा, वड, मोह, बेल अशी ८ झाडे लावली गेली. ही झाडे सभासदांनी व संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्री. आशिष ठाकूर यांनी घरी वाढवली होती. जी त्यांना वाढदिवसानिमित्त पराग सरोदे यांनी भेट दिली होती. याशिवाय सोबत नेलेल्या हजारो बिया रिसरात व देवळाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा लावल्या गेल्या.***

### असे केले पुनरुज्जीवित

***निसर्ग संवर्धनाच्या कामानिमित्त सुधागड तालुक्यातील उद्धर रामेश्वर या पर्यटन निसर्ग मित्र संस्थेचे सभासद गेल्यानंतर येथे एक पुरातन असलेली परंतु बुजलेल्या स्थितीत व नामशेष झालेला अवस्थेत असलेली विहीर त्यांच्या निदर्शनास आली. या आजुबाजूच्या परिसरात माहिती घेतली असता सदरची विहीर अनेक वर्षांपासून मातीचा भराव पडल्याने बुजलेल्या अवस्थेत आहे. परंतु या विहिरीत जिवंत पाण्याचा स्त्रोत असल्याचे समजले. निसर्ग मित्र संस्थेच्या सभासदांनी पुढाकार घेऊन या विहिरीतील संपूर्ण माती दगड, गोटे व गाळ उपसून विहिरीतून जलस्त्रोत पुनरूज्जीवित केला. आणि अशा प्रकारे ५० ते ६० फूट खोल आणि सात ते आठ पगयऱ्या असलेल्या वरच्या रामेश्वर येथील ऐतिहासिक विहिरीचे पुनरुज्जीवन झाले.***

### पुरातन वास्तू संवर्धन

***दगडी उंच दीपमाळेचा पार रुंद करून त्याचा पाया अधिक मजबूत केला गेला.***

### जलसंवर्धन कामे

***या मोहिमेत वरच्या रामेश्वर येथील ऐतिहासिक विहिरीचे पुनरूज्जीवन करण्याबरोबरच देवराईत वाहणाऱ्या ओढ्यांवर ३ बंधारे घातले गेले. गणेश कुंडामधील पाणी उपसून गाळ काढण्यात आला.***

# रायगड जिल्ह्यात पेरणीपूर्व मशागतींना वेग

। सुकेळी । वार्ताहर ।



मागील आठवड्यात अनेक ठिकाणी झालेल्या हलक्या व मध्यम स्वरूपाच्या पावसामुळे शेतकर्‍यांकडून पेरणीपुर्व मशागतींच्या कामांना वेग आला आहे. तर काही ठिकाणी खरीप पिकांच्या पेरणीसाठी आवश्यक असणारी शेतीची मशागत जवळपास शेतकर्‍यांनी कडक उन्हाची पर्वा न करता पुर्ण केली आहेत. खरीप पेरणीसाठी शेतकरी राजा सज्ज झाला असुन त्याचे डोळे पाऊस केव्हा पडणार म्हणून आभाळाकडे लागले आहेत. जणु काही शेतकरी पावसाची एका चातकाप्रमाणे वाट पाहत आहे.

रायगड जिल्ह्यातील शेतकरी भातशेती मोठ्या प्रमाणात करतात. त्यामुळेच जिल्ह्यातील रोहा, सुधागड, पेण, अलिबाग, माणगाव, महाड आदी तालुक्यात मान्सूनपूर्व मशागतींना वेग आला असून पावसाने वेळेवर हजेरी लावल्यास शेतकर्‍यांकडून खरीपाची जोरदार तयारी सुरू होणार आहे. या मशागतीच्या कामामध्ये जमीन नांगरणे, ढेकळे फोडणे, शेतातील केरकचरा काढणे, जमीन सपाट करणे, पाण्यासाठी पाट काढणे अशा प्रकारची कामे केली जातात. त्यामुळे सर्वत्र पेरणीपूर्व मशागतींना वेग आला असून बी - बियाणे, खते, औषधे खरेदी करण्यासाठी शेतकर्‍यांची मोठ्या प्रमाणात लगबग सुरु असल्याचे दिसून येत आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री संतोष जयराम गिरकर रा. प्लॉट नंबर ए-८१/३१ लक्ष्मी निवास, सेक्टर नंबर १२, खारघर, नवी मुंबई ४१०२१० यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक ऋषिकेश अरुण गायकवाड रा. कुशिवली ता. कर्जत जि.रायगड व निखिल बाळासाहेब ढमाले यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे कुशिवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ४५/१/क | ०-२१-०० हे.आर.पॉ | ३-१९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ (आठ) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ३०/०५/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता - शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत तिचे मालक मेसर्स श्री कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार ओमकार माणिक म्हात्रे यांचेकडून खरेदी करणेचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णनः**

**मौजे मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत**

| सर्व्हे/हिस्सा नं. | प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १०/१/ब/२/अ | ६ | २-०५-०० | ४.१० |

या बिनशेती प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणत्याही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांत हरकत नोंदवावी. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील बिनशेती प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येवून आमचे अशिल खरेदी- विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

कर्जत
दिनांक ३०/०५/२०२४

**ॲड.साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता: कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीच्या विद्यमान मालक अे.अशोकन यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग, | २११० | ०-१५-५० | ०.५६ |

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहिवाट, रस्ता वहिवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २९/०५/२०२४
मोबा.९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण, पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिल १) सौ.गिता गजानन राऊळ (पुर्वीची शशिकला महादेव माळी) रा.मु.पो.वेश्वी, ता.अलिबाग, जि. रायगड व २) सौ. शर्मिला सुनिल पाटील (पुर्वीची शर्मिला महादेव माळी) रा.मु.थळ डोंगरी, पो. थळ, ता.अलिबाग, जि.रायगड व श्री. मंगेश महादेव माळी, श्री.रविंद्र महादेव माळी, श्री. भरत महादेव माळी, श्री. राजेंद्र महादेव माळी, श्री. अरुण महादेव माळी व श्री. कृष्णा महादेव माळी यांच्या वडिलोपार्जित, अविभक्त हिश्श्याच्या मौजे चेंढरे व मौजे वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड येथे खालील वर्णनाच्या जमिन मिळकती, बिनशेती मिळकती व घर मिळकती आहेत.

**अ) जमिन मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड. | ४५ | १ ब | ०-५३-२<br>पो.ख ०-०१-२<br>०-५४-४ | २.१९ |
| | ३१ | २ अ | १-००-८ | १९.३३ |
| वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड. | ४५ | ३ अ | ०-४६-१ | ६.०३ |

**ब) बिनशेती मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड. | ४५/१/ब/२/१ | ०-०५-२० | १०.४० |
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड. | ४५/१/ब/२/९ | ०-०१-८० | ०३.६० |

**ब) घर मिळकतींचे वर्णन**

| मौजे | ग्रामपंचायत | घर नं. | क्षेत्र (चौ.फूट) | असेसमेंट (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड. | चेंढरे | ४१५ | १०८२ | १८८४ |
| | चेंढरे | ४२० | ८१२ | १२२४ |

सदरहू मिळकतीसंदर्भात आमच्या अशिल सौ.गिता गजानन राऊळ व सौ. शर्मिला सुनिल पाटील यांनी श्री. मंगेश महादेव माळी, श्री. रविंद्र महादेव माळी, श्री. भरत महादेव माळी, श्री. राजेंद्र महादेव माळी, श्री. अरुण महादेव माळी व श्री.कृष्णा महादेव माळी यांच्या विरुध्द अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर मुकदमा नं. १४०/२०२४ ने वाटपाकरीता, स्वतंत्र ताब्याकरीता, निरंतर ताकिदीच्या मनाई हुकुमाकरीता व इतर मागण्यांकरीता दावा दाखल केलेला आहे.

आमच्या अशिलांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांच्या सांगण्यावरुन या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतींसंबंधी कुणीही कोणत्याही प्रकाराचा खरेदी-विक्रीचा, हस्तांतरणाचा व्यवहार करु नये तसेच मिळकतीसुध्दा विकसित करु नये व मिळकतींमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करुन नये. सदरहू व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : २४/०५/२०२४.

**ॲड.सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को.ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ९८६७७१५५२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे शिरसे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सिद्धेश रविंद्र निकुडे यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे शिरसे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १७ | ३ | ०-३५-२० | ६-०० |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ३०/०५/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

माझे आशिल श्री. राजेश सावलचंद बाफना, मु. फ्लॅट नं. ०७, सिध्दीकी इब्राहीम मेंशन, मिनेरवा सिनेमा जवळ ग्रॅन्ट रोड (पूर्व), मुंबई ४००००७ यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते ते खालील प्रमाणे.

**मौजे मांडवे तर्फे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड व ग्रामपंचायत झिराड येथील खालील वर्णनाच्या मिळकती**

| गट/ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ८ | - | ०.६२.०० | १३.६२ |
| ९ | १/अ/३/अ/२ | ०.५९.१० | ११.७५ |

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत या नोटीशीचा विषय असून त्यास यापुढे सोईच्या दृष्टीने ''सदरहू मिळकत'' म्हणून संबोधण्यात येत आहे.

वर नमुद केलेली सदरहू मिळकत सुरेश नारायण कामत यांचे मालकीची होती. सुरेश नारायण कामत यांनी दिनांक ०९.११.२०१६ रोजीचे करारा अन्वये सदरहू मिळकत माझे आशिल यांना विकत देण्याचे कबुल केले होते. सुरेश नारायण कामत यांनी त्या करारा प्रमाणे वागणूक न केल्याने माझे आशिल यांनी सुरेश कामत यांचे विरुद्ध अलिबाग न्यायालयात स्पेशल मुकदमा क. ४५/२०१७ चे प्रकरण दाखल केले. त्या दाव्याचे काम प्रलंबित असताना माझे आशिल व सुरेश नारायण कामत यांचे दरम्यान तडजोड होवून त्या प्रमाणे तडजोड हुकुमनामा करण्यात आला. मात्र, सुरेश नारायण कामत यांचे पश्चात श्रीमती महनाझ मोहम्मद अली हिने सदरहू मिळकतीस स्वतःचे नाव बेकायदेशीरपणे नोंदवून घेतले. त्यामुळे माझे आशिल यांनी श्रीमती महनाझ मोहम्मद अली यांचे विरूध्द मा. उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांचेसमोर आर. टी. एस. अपिल क्र. .../२०२४ चे प्रकरण दाखल केले असून त्या अपिलाचे कामी मा. उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी श्रीमती महनाझ मोहम्मद अली हिने वर नमुद केलेल्या संदर्भित मिळकती बाबत ''जैसे थे परिस्थिती ठेवावी'' असा आदेश पारीत करण्यात आला आहे.

सबब, या जाहीर नोटीशीने सर्व लोकांना कळविण्यात येते की, श्रीमती महनाझ मोहम्मद अली, मु.रूम नं. ४, तिसरा मजला, सोनावाला बिल्डींग, प्रोटेक्टर रोड, ग्रॅन्ट हॉटेल जवळ, ग्रॅन्ट रोड (पूर्व), मुंबई ४००००७ हिचा संदर्भित

मिळकतीशी कोणताही हक्क हितसंबंध पोहोचत नव्हता व नाही, याची नोंद घ्यावी. तसेच श्रीमती महनाझ मोहम्मद अली हिचेशी सदरहू मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. स्पेशल मुकदमा क. ४५/२०१७ चे निर्णयानुसार माझे आशिल यांचा सदरहू मिळकतीत हक्क आहे. कळावे.

अलिबाग
तारीख २९.०५.२०२४

**(ॲड.एस.वाय.बारटके)**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. सुरेंद्र धनाजी शिंदे, रा. बी २ - ११, रूम नं. ५, सेक्टर १६, बँक ऑफ इंडिया च्या समोर, वाशी, नवी मुंबई, ठाणे, ४००७०५, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे आंबिवली त. कोतलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३२/१/ब | ०.५५.९०<br>पो. ख ०.०२.३०<br>एकुण ०.५८.२० | २.६२ | श्री.नामदेव मनोहर झुगरे |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील . मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ३०/०५/२०२४.

सही /-
**ॲड.उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल '' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो. नं. ७३८५००४८०६.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे बोरघर तर्फे खरवली, ता. माणगाव, जि. रायगड येथील खालील वर्णनाची वर्कस जमिन मिळकत ही कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून व त्या आशयाची बोलणी व बयानापावती संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार पूजा निर्मलसिंग रंधावा, रा. माणगाव, जि रायगड यांच्या दरम्यान झालेली आहे.

संदर्भित मिळकत ही पूर्णतः निर्वेध, बोजाविरहीत व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व कब्जेदाराने माझ्या अशिलांना दिला आहे. या उपरही सदर मिळकतीत अन्य कोणाचाही, कसल्याही तऱ्हेचे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, फरोक्तखत असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या कालावधीत लेखी पुराव्यानिशी माझी खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल निम्नलिखीत मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**-: मिळकतीचे वर्णन : -**

| मौजे व तालुका | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांचे नावं |
|---|---|---|---|---|
| बोरघर तर्फे खरवली ता. माणगाव | १२३ | ०-२१-००<br>०-०३-००<br>०-२४-०० | ०-०९ | पूजा निर्मलसिंग रंधावा |

ठिकाण : अलिबाग,
दिनांक : ३०.०५.२०२४

**ॲड. सुधाकर पी. प्रभू**
'साईलिला' सी.एच.एस.,
'ए विंग' रूम नं. १०३, चेंढरे,
ता. अलिबाग, रायगड
मोबाईल नं. ९८२२७९६८३०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांनी मौजे- चेहेर, ता. मुरुड, जि. रायगड येथील श्रीमती. शीला श्रीकांत गुप्ते वगैरे ४, रा. मुंबई यांच्या खुद्द मालकीच्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

१) मौजे- चेहेर, ता. मुरुड येथील भूमापन क्रमांक ३३/१/ब, क्षेत्र ०-३४-३० हे.आर,+ पो.ख. ०-००-४० हे. आर. एकूण क्षेत्र ०-३४-७० हे. आर, आकार रु.१.५२ पैसे व २) मौजे- चेहेर, ता. मुरुड येथील भूमापन क्रमांक ३९/१०, क्षेत्र ०-८८-०० हे.आर,+ पो.ख. ०-१६-०० हे. आर. एकूण क्षेत्र १-०४-०० हे. आर आकार रु.०.६९ पैसे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकती विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतींसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हित संबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक :- २९/०५/२०२४

सही /-
**ॲड. समाधान रविंद्र पाटील**
मु.पो. वेश्वी, हनुमान मंदिर जवळ,
ता. अलिबाग, रा. रायगड
मोबा. नं. ८९८३०११९६९

महाराष्ट्र शासन
महसुल व वनविभाग
तहसीलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि.रायगड
दुरध्वनी क्रमांक -०२१४०-२६९३१७ फॅक्स-२६९०४२
Email ID tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/जाहीर नोटीस/४७६/२०२४ दि.२९/०५/२०२४

**जाहीर नोटीस मसुदा**

१. श्री. जलील हसन फटाकरे
रा. तळा, ता. तळा जि. रायगड — अर्जदार
विरुध्द
१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
नगरपंचायत तळा, ता. तळा जि. रायगड

तमाम जनतेस या जाहीर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांनी त्यांची आई कै. सोफिया हसन फटाकरे यांचा मृत्यू दि.२०/०४/१९९६ रोजी मौजे तळा, ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि. ०१/०२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांची आई कै.सोफिया हसन फटाकरे यांचा मृत्यू दि.२०/०४/१९९६ रोजी झाला असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार आई कै. सोफिया हसन फटाकरे यांचा मृत्यू दि.२०/०४/१९९६ रोजी मौजे तळा येथे मयत झाले असल्याचे गृहित धरुन सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी,

आज दि.२९ मे, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे- आसे ता.कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं. | हि. नंबर | क्षेत्र हे.आर.पा. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मदन चांगो वेहले | १८ | ३ | ०-०७.६० | १.०६ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विकी, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापूर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे मांडवणे, ता.कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक शैलेश माधव चांगले यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १५३ | १० | ०-१८-००<br>पैकी ०-०९-००<br>इतके लिहून देणार यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र | ०-१७ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ३०/०५/२०२४
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

जावक क्रमांक/ निधी नोंदणी १२५६/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, रायगड विभाग, कल्पतरू
इमारत, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, रायगड, रायगड, रायगड, रायगड
दि.२४/०५/२०२४

**चौकशीची जाहीर नोटीस**

एस.आर.एन.क्रमांक : RGD/01329/18/24
फेफार अहवाल/अर्ज क्रमांक : २९/२०२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री मारूती मंदिर न्यास बाबत।
न्यासाचा पत्ता : तांबाटी, पोस्ट-दोनवत, तांबाटी, रायगड, खालापूर, तांबटी
अर्जदार : बिपिन अशोक भोसले,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | CASH | 11000.00 |

(अ) जंगम मिळकत : रोख रू.११०००/- मात्र (अक्षरी रूपये अकरा हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | TAMBATI | ४२ | 713 SQUARE FOOT | ०० | MARUTI MANDIR | ०.०० |

(ब) स्थावर मिळकत : रोख रू.०/- मात्र (अक्षरी रूपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २२-०५-२०२४ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड**

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## TENDER NOTICE

Following Tender is invited from Eligible Bidders for Pen Circle Raigad District. The Details are as given below-

| Sr. No. | Tender No. | Particulars | Sale Opening, Sale Closing Dates & Bid Submission | Estimated Cost (Rs.) | Amount of EMD (Rs.) | Tender Cost Fee |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Tender No. SE/ PC/Tech/ 2024- 25/T-1 | Tender for the work of repair of transformers distribution boxes under Pen Circle. | Dt. 29/05/2024 To Dt. 5/06/2024 Bid Submission Date: 5.06.2024 upto 17:00 hrs. | Rs. 63,00,000/- | Rs. 63,000/- | Rs. 5900/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website **https://etender.mahadiscom.in/eatApp/**

PRO NO - 59

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN

## निवडक

### खेळाडूंना अतिरिक्त सुरक्षा

**लंडन :** इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या पाकिस्तानी खेळाडूंना इंग्लंड क्रिकेट बोर्डाने अतिरिक्त सुरक्षा पुरवली आहे. पाकिस्तान बोर्डाने केलेल्या मागणीनंतर दोन सुरक्षारक्षक खेळाडूंसोबत असणार आहेत. पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमचा चाहत्यासोबत झालेला वाद ताजा असताना इंग्लिश बोर्डाने हा निर्णय घेतला. पाकिस्तानच्या राष्ट्रीय संघातील खेळाडू फावल्या वेळात हॉटेल अथवा बाहेर कुठे गेल्यास त्यांच्यासोबत अतिरिक्त सुरक्षारक्षक असतील, अशी माहिती पाकिस्तानातील एका वृत्तसंस्थेने दिली.

### जर्सी बदलण्याचे आदेश

**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषकासाठीच्या तयारीत सर्वच संघ व्यस्त आहेत. २ जूनपासून सुरू होणाऱ्या विश्वचषकात एकूण २० संघ सहभागी झाले आहेत. त्यासह आयसीसीच्या या मोठ्या इव्हेंटसाठी प्रत्येक संघाने आपल्या जर्सीचेही अनावरण केले आहे. पण जर्सीच्या बाबतीत युगांडा संघाला थोडे बदल करण्यास सांगण्यात आले. युगांडाच्या जर्सीचा रंग पिवळा असून त्याच्या बाहुंवर पक्ष्यांच्या पिसाची डिझाईन होती, त्यामुळे प्रायोजक लोगो नीट दिसत नव्हता. यावरून आयसीसीने जर्सी बदलण्याचे आदेश युगांडा संघाला दिले.

### वेस्ट इंडिजच्या संघात बदल

**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषकासाठी सर्वच देशांनी आपले संघ जाहीर केले आहेत. पण आता स्पर्धा सुरू होण्यापूर्वी वेस्ट इंडिजच्या संघात मोठा बदल करण्यात आला आहे. वेस्ट इंडिजच्या अनुभवी खेळाडून विश्वचषकामधून माघार घेतली आहे. वेस्ट इंडिजचा महत्त्वाचा खेळाडू जेसन होल्डर दुखापतीमुळे २०२४ च्या टी-२० विश्वचषकातून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी ओबेड मॅकॉयचा वेस्ट इंडिज संघात समावेश करण्यात आला असल्याचे वेस्ट इंडिजने सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती दिली.

### पांड्या न्युयॉर्कमध्ये दाखल

**न्यूयॉर्क :** अगामी विश्वचषकासाठी भारतीय संघाचे जवळपास सर्व खेळाडू न्यूयॉर्कला पोहोचले आहेत. पहिल्या बॅचमध्ये रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत, शिवम दुबे, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव आणि अक्षर पटेल यांचा समावेश होता. भारतीय संघाला १ जूनला सराव सामना खेळायचा आहे. याआधी भारतीय संघाचा उपकर्णधार हार्दिक पांड्या संघात सामील झाला आहे. पांड्याने त्याच्या सोशल मीडियावर काही फोटो शेअर करून चाहत्यांना संघात सामील झाल्याची माहिती दिली.

### रोहितने सलामी देऊ नये


**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघ अमेरिकेत पोहोचला आहे. १ जूनपासून टी-२० विश्वचषकाचा आनंद लुटता येणार आहे. मात्र, वेळेतील फरकामुळे भारतातील ही स्पर्धा २ जूनपासून सुरू होणार आहे. यातच विश्वचषकापुर्वी भारताचा माजी फलंदाज वसीम जाफरने सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतीय संघाच्या सलामीच्या जोडीबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. कर्णधार रोहित शर्माने टी-२० विश्वचषक दरम्यान भारतीय संघासाठी सलामी देऊ नये, असे वसीम जाफरने म्हटले आहे.

# अल्टिमेट टेबल टेनिस नव्या रुपात

## या हंगामात ८ संघ जेतेपदासाठी भिडणार

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

भारताची प्रमुख टेबल टेनिस लीग, अल्टिमेट टेबल टेनिस २ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत चेन्नई येथे खेळवली जाणार आहे. अव्वल दर्जाच्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आकर्षित करणारी आणि भारतीय पॅडलर्सच्या जलद प्रगतीच्या क्षमतेसाठी ओळखली जाणारी ही लीग आणखी एका रोमांचक नवीन हंगामासाठी सज्ज झाली आहे.






भारतीय टेबल टेनिस फेडरेशनच्या विद्यमाने निरज बजाज आणि विटा दाणी यांनी प्रोत्साहन दिलेली फ्रँचायझी लीग २०१७ मध्ये स्थापन झाल्यापासून भारतीय टेबल टेनिससाठी एक गेमचेंजर ठरली आहे. अल्टिमेट टेबल टेनिस सारख्या उपक्रमांची भरभराट होईल आणि भारताच्या टेबल टेनिस इकोसिस्टममध्ये योगदान मिळेल याची खात्री करून संपूर्ण देशभरात या खेळाला प्रगत करण्यासाठी भारतीय टेबल टेनिस फेडरेशनने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.


यंदाच्या लीगमध्ये प्रथमच आठ संघांचा समावेश असणार आहे, जी युवा भारतीय पॅडलर्सना जगातील अव्वल खेळाडूंसोबत त्यांची प्रतिभा प्रदर्शित करण्यासाठी व्यासपीठ प्रदान करेल. स्पर्धेचा दर्जा वाढवणे आणि खेळातील उदयोन्मुख प्रतिभेच्या वाढीला चालना देणे हे, या महत्त्वपूर्ण विस्ताराचा उद्देश आहे. अतिरिक्त संघांच्या समावेशामुळे स्पर्धात्मक स्तरावर वाढ होईल. पॅरिस ऑलिम्पिकनंतर देशात निर्माण झालेले क्रीडामयी वातावरण कायम राखण्यात ही लीग महत्त्वाची भूमिका बजावेल. शिवाय, चेन्नईम ध्ये लीग आयोजित करण्याचा निर्णय शहराच्या प्रतिष्ठित क्रीडा वारशाला श्रद्धांजली अर्पण करतो, ज्याने असंख्य दिग्गज पॅडलर्स घडवले आहेत. त्यांच्या गौरवशाली वारशाचा सन्मान करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकटी दिली आहे, अशा भावनाअल्टिमेट टेबल टेनिस लीगचे सह-प्रवर्तक निरज बजाज यांनी व्यक्त केल्या.

टेबल टेनिसच्या वाढत्या लोकप्रियतेने, उल्लेखनीय भारतीय कामगिरीमुळे लीगचा विस्तार नवीन प्रदेशांमध्ये झाला आहे. त्यामुळेच अहमदाबाद एसजी पायपर्स आणि जयपूर पॅट्रियट्स या दोन प्रतिष्ठित फ्रँचायझींचा समावेश करण्याची अभिमानाने घोषणा ही लीग करते. लीगच्या २०२४ आवृत्तीसह सुरू होणारा हा एक आनंददायक नवीन टप्पा आहे. भारतातील टेबल टेनिसचा दर्जा वाढवणे, आमच्या खेळाडूंना जगातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंविरुद्ध स्पर्धा करण्यासाठी आणि भारतीय टेबल टेनिसला अभूतपूर्व उंचीवर नेण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हे यूटीटीच्या स्थापनेमागील मुख्य ध्येय होते. भारतीय खेळाडूंनी अलिकडे चीनच्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध मिळवलेला ऐतिहासिक विजय जागतिक सांघिक क्रमवारीद्वारे ऑलिम्पिकसाठी पात्र ठरलेले राष्ट्रीय पुरुष आणि महिला संघ या मिशनला अधोरेखित करतात.

# हायव्होल्टेज सामना मॉड्युलर स्टेडियमवर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल नंतर आता क्रिकेट चाहते आयसीसी टी-२० विश्वचषकाची आतुरतेने वाट पाहत आहेत. २ जून ते २९ जून या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेचे सामने अमेरिका आणि वेस्ट इंडिजच्या भूमीवर होणार आहेत. जागतिक स्तरावरील क्रिकेटचे आयोजन अमेरिकेत पहिल्यांदाच होत आहे. सामने सुरू होण्याआधीच न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमची बरीच चर्चा होत आहे. हे स्टेडियम जगातील पहिले मॉड्युलर क्रिकेट स्टेडियम तर आहेच, पण याच ठिकाणी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामनाही होणार आहे.



आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने या वर्षी जानेवारीमध्ये न्यूयॉर्कमध्ये ३४,००० आसन क्षमतेच्या मॉड्यूलर स्टेडियमचे अनावरण केले होते. येथे भारत-पाकिस्तानसह टी-२० विश्वचषकातील आठ सामने आयोजित केले जातील. मॉड्यूलर स्टेडियम म्हणजे जे अल्प मुदतीसाठी बांधले जाते. हे स्टेडियम कमी वेळेत बांधून तयार होते. कमी वेळ लागतो कारण ते ॲल्युमिनियम आणि स्टीलपासून बनवले जाते. हे स्टेडियम जोडता येणं आणि काम झालं की मोडून ठेवणं सोप्प आहे. जरी ते टिकाऊ असले तरी ते सामान्य स्टेडियमच्या ठिकाणाप्रमाणेच सुरक्षितता, आराम आणि सुविधा प्रदान करतात. कतार येथे आयोजित फिफा विश्वचषक २०२२ साठी स्टेडियम ९७४ नावाचे मॉड्यूलर स्टेडियम देखील तयार करण्यात आले होते.

## नागोठण्यातील कबड्डी स्पर्धेत
# चौडेश्वरी संघ विजयी

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठणे विभागीय अध्यात्मिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व सामाजिक संस्थेच्यावतीने आयोजित केलेल्या नागोठणे महोत्सवांतर्गत येथील आठवडा बाजार मैदानावर रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने रविवारी (दि.२६) जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत चौडेश्वरी कडसुरे संघाने धावीर पोस्ट रोहा या संघाचा अंतिम सामन्यात पराभव करून प्रथम क्रमांकाचे रु. ३३ हजार ३३३ चे रोख पारितोषिक व आकर्षक चषक पटकाविले. तर, धावीर पोस्ट रोहा संघाला द्वितीय क्रमांकाचे रु. २२ हजार २२२ रोख व चषकावर समाधान मानावे लागले. स्पर्धेतील तृतीय क्रमांक जय बजरंग रोहा व चतुर्थ क्रमांक प्राप्त जोगेश्वरी नागोठणे या संघांना प्रत्येकी रु. ११ हजार १११ चे रोख पारितोषिक व चषक देण्यात आले.

या स्पर्धेत उत्कृष्ट चढाईसाठी कडसुरेचा निखील शिर्के, उत्कृष्ट पकडीसाठी जय बजरंग रोहाचा राज मोरे, नागोठणे संघाचा सत्यानंद पिंगळे याला पब्लिक हिरो, तर गावदेवी पाटणसई या संघाला शिस्तबद्ध संघ म्हणून आकर्षक बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# ऑस्ट्रेलियाला मोठ्या विश्वविक्रमाची संधी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वेस्ट इंडिज आणि अमेरिकेमध्ये टी-२० विश्वचषक स्पर्धा खेळवली जाणार आहे. या स्पर्धेसाठीच्या सराव सामन्यांनाही सुरुवात झाली आहे. दरम्यान, या स्पर्धेत ऑस्ट्रेलिया संघाला एक मोठा विक्रम करण्याची संधी आहे. जर ऑस्ट्रेलियाने ही स्पर्धा जिंकली, तर जवळपास सर्वच आयसीसी स्पर्धांवर सध्या त्यांचे वर्चस्व प्रस्थापित होईल. तसेच, तिन्ही क्रिकेट प्रकारातील आयसीसी स्पर्धांमधील ते सध्याचे चॅम्पियन होतील.



म्हणजेच सध्या पुरुषांच्या क्रिकेटमध्ये कसोटी आणि एकदिवसीय चषक विजेतेपद ऑस्ट्रेलियाकडे आहे. ऑस्ट्रेलियाने पॅट कमिन्सच्या नेतृत्वात गेल्यावर्षी या स्पर्धांचे विजेतेपद जिंकले होते. तसेच, १९ वर्षांखालील पुरुष एकदिवसीय विश्वचषकाचे विजेतेपदही ऑस्ट्रेलियाकडे आहे. याशिवाय महिला क्रिकेटमध्येही एकदिवसीय आणि टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद ऑस्ट्रेलियाकडे आहे. त्यामुळे जवळपास सर्वच महत्त्वाचा स्पर्धांचे विजेतेपद सध्या ऑस्ट्रेलियाकडे आहे. त्यामुळे जर ऑस्ट्रेलियाने आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेचेही विजेतेपदही मिळवले, तर ते एकाचवेळी पुरुषांच्या कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० मधील विश्वविजेते होतील.

# भारतीय संघाचा अमेरीकेत मुक्काम

**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी सराव सामन्यांनाही सुरुवात झाली आहे. त्यामुळे सर्वच संघांची वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत या स्पर्धेच्या दृष्टीने अंतिम तयारी सुरू आहे. भारतीय संघातील अनेक खेळाडू आणि सपोर्ट स्टाफही न्युयॉर्कला पोहचले आहेत. काही भारतीय खेळाडू २५ मे रोजी, तर काही २८ मे रोजी भारतातून न्युयॉर्कला गेले आहेत. त्यानंतर आता एक दिवस विश्रांती केल्यानंतर भारतीय खेळाडूंनी हळुहळू सरावालाही सुरुवात केली आहे. न्युयॉर्कमध्ये पोहचल्यानंतर भारतीय संघाच्या पहिल्या सराव सत्राचा व्हिडिओ बीसीसीआयने शेअर केला आहे.

# गंभीर भारताचा नवीन प्रशिक्षक?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

## अधिकृत घोषणा होणे बाकी

मागील काही दिवसांपासून क्रिकेट वर्तुळात एकच चर्चा रंगली आहे ती म्हणजे भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक विद्यमान प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा लवकरच प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ संपणार आहे. त्यामुळे बीसीसीआयने या पदासाठी अर्ज मागवले आहेत. परदेशी शिलेदारांपासून भारतातील काही माजी खेळाडूंची नावे या पदासाठी घेतली जात आहेत. अशातच गौतम गंभीरला या पदाचा प्रबळ दावेदार मानले जात आहे.

गंभीरच्या मार्गदर्शनाखाली केकेआरच्या संघाने आयपीएल २०२४ चा किताब जिंकला. खरे तर केकेआर आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात अंतिम सामना झाला. या सामन्यानंतर बीसीसीआय सचिव जय शाह आणि गौतम गंभीर यांची मैदानात काही मुद्द्यांवर चर्चा झाली. ही चर्चा प्रशिक्षकपदाबद्दल असल्याचे कळते. एका वृत्तानुसार, आयपीएलमधील एका संघाच्या मालकाने गौतम गंभीर भारतीय संघाचा प्रशिक्षक असेल यावर शिक्कामोर्तब केला आहे. आता केवळ अधिकृत घोषणा होणे बाकी आहे.

# चॅम्पियन संघाला पाजले पराभवाचे पाणी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकाचा मेगा इव्हेंटला सुरुवात होण्याच्या काही दिवसाआधी नेदरलँड्स क्रिकेट संघाने चॅम्पियन श्रीलंकेचा पराभव करून मोठा अपसेट निर्माण केला. टी-२० विश्वचषकापूर्वी नेदरलँड्स आणि श्रीलंका यांच्यात सराव सामना खेळला गेला. या सामन्यात नेदरलँड्सच्या गोलंदाजांसमोर श्रीलंकेचा संघ १६१ धावांत गडगडला. आणि नेदरलँड्सने २० धावांनी सामना जिंकला. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी हा विजय नक्कीच नेदरलँड्स संघातील खेळाडूंचे मनोबलही उंचावेल.



दोन्ही संघांमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. पण त्याचा हा निर्णय चुकीचा ठरला. नेदरलँड्सच्या फलंदाजांनी चमकदार कामगिरी केली. प्रथम फलंदाजी करताना त्याने २० षटकांत ५ गडी गमावून १८१ धावा केल्या. यानंतर त्यांच्या गोलंदाजांकडून उत्कृष्ट गोलंदाजी पाहायला मिळाली. आणि श्रीलंकेचा संघ १८.५ षटकांत १६१ धावांत सर्वबाद झाला आणि नेदरलँड्सने २० धावांनी सामना जिंकला.

नेदरलँड्सने टी-२० विश्वचषकाच्या मुख्य स्पर्धेतही अनेक मोठ्या संघांना पराभूत केले आहे. २००९ मध्ये नेदरलँडने इंग्लंडचा ४ गडी राखून पराभव केला होता. त्यानंतर टी-२० विश्वचषक २०१४ मध्ये देखील इंग्लंडचा ४५ धावांनी पराभव केला होता. गेल्या टी-२० विश्वचषकात नेदरलँड्सने दक्षिण आफ्रिकेचा १३ धावांनी पराभव केला होता.

# विदर्भी खेळाडूंसाठी ‘थोडी खुशी जादा गम’

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

यंदाच्या आयपीएलमध्ये विदर्भाचे जवळपास अर्धा डझन क्रिकेटपटू विविध फ्रेंचाइसींकडून खेळले. मात्र, एका-दोघांचा अपवाद वगळता इतरांना समाधानकारक कामगिरी करता आली नाही. त्यामुळे यंदाची आयपीएल स्पर्धा विदर्भी खेळाडूंसाठी ‘थोडी खुशी जादा गम’ अशीच काहीशी ठरली आहे.



यावर्षीच्या आयपीएलमध्ये वेगवान गोलंदाज उमेश यादवसह यष्टीरक्षक जितेश शर्मा, सलामीवीर अथर्व तायडे, मध्यमगती गोलंदाज यश ठाकूर, दर्शन नळकांडे आणि आक्रमक फलंदाज शुभम दुबे यांनी विविध संघांचे प्रतिनिधित्व केले. परंतु, नजरेत भरेल अशी एकानेही कामगिरी बजावली नाही. यश लखनौकडून खेळताना एका सामन्यात पाच गडी बाद केले, तर जितेशला अनपेक्षितरित्या पंजाब किंग्जचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली, हीच समाधानाची बाब म्हणता येईल. आपल्या शानदार कामगिरीने गतवर्षी जगभरातील क्रिकेटप्रेमींची मने जिंकणारा अमरावतीचा जितेश यावर्षी अपेक्षावर खरा उतरू शकला नाही. त्याला १४ सामन्यांमध्ये १३१.६९ च्या सरासरीने केवळ १८७ धावांच करता आल्या. तर यष्टीमागे १३ झेल टिपले. हैदराबादविरुद्धच्या सामन्यात भूषविलेले कर्णधारपद ही एकमेव त्याच्यासाठी आनंदाची बाब ठरली.

क्रिकेट जगतात विदर्भ एक्स्प्रेस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उमेश यादवलाही छाप सोडता आली नाही. सुरवातीपासून आयपीएलमध्ये खेळत असलेल्या अनुभवी उमेशला गुजरातकडून सात लढतीमध्ये केवळ आठच बळी टिपता आले. गोलंदाजीत त्याला सुरच गवसला नाही. यश ठाकूरने गुजरातविरुद्धच्या सामन्यात पाच बळी टिपून आशा उंचावल्या खऱ्या, पण त्यानंतर त्यालाही सातत्य कायम राखता आले नाही. यश स्पर्धेतील दहा लढतीत केवळ अकरा फलंदाजच बाद करू शकला. गुजरातकडून खेळणारा अन्य एक गोलंदाज दर्शनची तीन सामन्यांमध्ये तीन बळी अशी निराशाजनक कामगिरी ठरली. तर, पंजाबचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अथर्वलाही दोन सामन्यांमध्ये केवळ ६१ धावाच काढता आल्या. त्यामुळे यंदाची आयपीएल स्पर्धा विदर्भी खेळाडूंसाठी आनंद कमी निराशाच जास्त राहिली.

राजस्थानने तब्बल ५ कोटी ८० लाख रुपये मोजून विदर्भाचा युवा फलंदाज शुभम दुबेला खरेदी केले होते. मात्र, तोदेखील संधीचे सोने करण्यात अपयशी ठरला. डावखुऱ्या शुभमला चार सामन्यांमध्ये फक्त ३१ धावा करता आल्या. तथापि पहिल्या आयपीएल अनुभवातून आपण खूप काही शिकल्याचे त्याने सांगितले. त्यामुळे पुढील वर्षी नक्कीच त्याच्याकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा करता येईल.

# खेळांमुळे निर्माण होणारी खेळाडूवृत्ती महत्वाची

## महावितरणचे संचालक अरविंद भादिकर यांचे प्रतिपादन

**। पुणे । प्रतिनिधी ।**

खेळांमुळे खेळाडूवृत्ती व संघभावना निर्माण होते व हेच गुण महत्त्वाचे आहेत. त्यामुळे कोणत्याही पराभवाला सामोरे जाऊन, त्यावर मात करून नवीन भरारी घेण्याची वैयक्तिक व सांघिक जिद्द निर्माण होते, असे प्रतिपादन बुधवारी (दि.२९) महावितरणचे संचालक (संचालन) अरविंद भादिकर यांनी केले.

बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४५ व्या राष्ट्रीय कबड्डी, कुस्ती व टेबल टेनिस क्रीडास्पर्धेला प्रारंभ झाला. संचालक अरविंद भादिकर यांच्याहस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून या स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी व्यासपीठावर महापारेषणचे संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर,




महानिर्मितीचे संचालक (मायनिंग) डॉ. धनंजय सावळकर, पुणे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे, आयोजन समितीचे अध्यक्ष व मुख्य अभियंता राजेंद्र पवार, मुख्य अभियंता अनिल कोलप (महापारेषण), मुख्य अभियंता सुनील पावडे (महावितरण) व अधीक्षक अभियंता संजय भागवत (महानिर्मिती), मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके (महावितरण) व पुरुषोत्तम वारजुरकर (महानिर्मिती), अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाचे अध्यक्ष जिग्नेश रे, सरचिटणीस नरेश कुमार, उपाध्यक्ष भारत पाटील, खजीनदार ललित गायकवाड यांची उपस्थिती होती.

या राष्ट्रीय स्पर्धेत गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, उत्तराखंड, पंजाब, राजस्थान, दिल्ली, हिमाचल प्रदेशातील तसेच इतर खासगी अशा १४ वीज कंपन्यांचे ३० संघ व सुमारे ३७५ खेळाडू सहभागी झाले आहेत. शुक्रवारी (दि.३१) या स्पर्धेचा समारोप होणार आहे. उद्घाटन कार्यक्रमात सर्व खेळाडूंनी संचलन करीत पाहुण्यांना मानवंदना दिली. तसेच, रवींद्र जगदाळे व सहकाऱ्यांनी शिवकालिन मैदानी खेळ सादर करीत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. आयोजन समितीचे अध्यक्ष व मुख्य अभियंताराजेंद्र पवार यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक मुख्य अभियंता अनिल कोलप तर सूत्रसंचालन संतोष पाटणी व रामगोपाल अहीर यांनी केले. संजय भागवत यांनी आभार मानले.

# दोन खेळाडूंनी लावला संघ मालकांना चूना

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

## एका धावेसाठी मोजावे लागले २.४ कोटी रुपये

यंदाच्या आयपीएलच्या हंगामात दोन खेळाडूंमुळे फ्रँचायझीचे मोठे नुकसान झाले आहे. कुमार कुशाग्राला आयपीएलच्या मिनी लिलावात दिल्ली कॅपिटल्सने ७.२० कोटी रुपयांना विकत घेतले. दिल्लीने त्याला एकूण तीन संधी दिल्या, ज्यात त्याने केवळ ३ धावा केल्या. अशाप्रकारे दिल्लीला कुशाग्रच्या प्रत्येक धावाची किंमत २.४ कोटी रुपये मोजावी लागली.

देवदत्त पडिक्कल गेल्या हंगामापर्यंत राजस्थानचा भाग होता. पण मिनी लिलावात त्याला लखनौच्या ताफ्यात दाखल झाला. तर, आवेश खान लखनौहून राजस्थानला आला. देवदत्त पडिक्कल याची फलंदाजी दमदार होईल या आशेने लखनौने त्याचा समावेश केला होता, पण तो पूर्णपणे फ्लॉप ठरला. देवदत्त पडिक्कलने आयपीएलमध्ये ७ सामने खेळले, ज्यात त्याने केवळ ३८ धावा केल्या. अशा प्रकारे देवदत्त पडिक्कलच्या एका रनसाठी लखनौने सुमारे २० लाख रुपये मोजले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)